आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

गुरुवार, २९ जून २०२३





MAULI


Metal Industries Pvt. Ltd.

Manufactures of Non- ferrous Metal Alloys & Die Castings

Regd. Off. & Factory : Plot No. M-59/60, MIDC Waluj, Aurangabad- 431 136 (M.S.)

Tel : 0240 - 2555110/111, 2554000, Telefax 2555111, Email : maulimetal@gmail.com

## उगवतीचे रंग



विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

## हशा आणि टाळ्या



आधुनिक केसरी


अख्ख्या महाराष्ट्राला पोट धरून हसायला लावणारी दोन व्यक्तिमत्वे महाराष्ट्रात होऊन गेली. एक म्हणजे पु.ल.देशपांडे आणि दुसरे म्हणजे आचार्य प्रल्हाद केशव अत्रे. अत्रेंच्याच शब्दात सांगायचे तर असे व्यक्तिमत्व येत्या दहा हजार वर्षांत होणार नाही. पु.लं. सारखेच अष्टपैलू व्यक्तिमत्व होते आचार्य अत्रेंचे. अत्रे काय नव्हते ? साहित्यिक, पत्रकार, शिक्षणतज्ञ, चित्रपट निर्माते, दिग्दर्शक, वक्ते, नेते या सगळ्या भूमिका त्यांनी उत्तम वठवल्या आणि शिवाय सगळ्यांना पुरून उरणारे व्यक्तिमत्व, शब्दात न मावणारे व्यक्तिमत्व म्हणजे आचार्य अत्रे. हजरजबाबीपणा हे अत्र्यांचे वैशिष्ट्य. कोणी त्यांना शब्दात पकडायचा प्रयत्न केला किंवा एखादा खोचक प्रश्न विचारला की ते असे काही उत्तर देत की बोलणारा गप्प होत असे. इथे त्यांच्या हजरजबाबीपणाचे दोन किस्से देण्याचा मोह आवरत नाही. "एकटा पुरतो ना ?"

एकदा आचार्य अत्रे विधानसभेत निवडून आले होते; मात्र ते विरोधी पक्षात होते. सत्ताधारी काँग्रेसचे संख्याबळ विरोधकांपेक्षा बरेच जास्त होते. अत्रे मात्र एकटे सरकारवर तुफान हल्ला चढवीत असत. एकदा अत्रे ग्रामीण भागाच्या दौऱ्यावर असताना पत्रकारांनी त्यांना छेडले. "अत्रेसाहेब, तुम्ही विधानसभेत सरकारला बरोबर कोंडीत पकडता खरे; पण त्यांच्या एवढ्या संख्याबळापुढे तुम्ही एकटे कसे पुरणार ? बाजुला वळून अत्र्यांनी ज्याच्या शेताला भेट द्यायला ते आले होते त्या मालकाला विचारले, "बळवंतराव, कोंबड्या पाळता की नाही ?" "व्हय तर!" "किती कोंबड्या आहेत ?" "चांगल्या शंभरएक कोंबड्या हायेत की!" "आणि कोंबडे किती ?" "कोंबडा फक्त एकच हाये." "एकटा पुरतो ना ?"

उपस्थितांमध्ये प्रचंड हशा उसळला आणि सर्व पत्रकारही त्या हशांत सामील झाले. त्यावेळचे राष्ट्रपती व्ही व्ही गिरी यांना आठ मुले होती त्यावर अत्र्यांनी केलेला विनोद चांगलाच गाजला. कर्तृत्ववान राष्ट्र-'पती'

भूतपूर्व राष्ट्रपती कै. व्ही. व्ही. गिरी यांना एकूण आठ मुले होती. त्याच्याबद्दल अत्र्यांच्या 'मराठा' वर्तमानपत्रात बरीच गमतीदार चर्चा होत असे. एकदा अत्र्यांनी श्री० गिरी, सौ. गिरी आणि त्यांच्या आठ मुलांचे एक छायाचित्र वर्तमानपत्रात प्रसिद्ध केले आणि त्याखाली शीर्षक दिले – गिरी आणि त्यांची 'कामगिरी'. त्यांचे विनोदी किस्से खूप आहेत. सगळे इथे देत नाही किंवा देता येणार नाहीत. पण केवळ विनोद म्हणजेच आचार्य अत्रे एवढाच कोणाचा समज असेल तर तो साफ चुकीचा आहे. विनोद हे त्यांच्या व्यक्तिमत्वाचे एक वैशिष्ट्य. पण ते उत्तम वक्ते आणि उत्तम लेखक होते. **क्रमशः**

## आनंदी पहाट



## मैत्र जपण्यासाठी अपेक्षा करणे टाळावे

आधुनिक केसरी



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

आपल्या मैत्रीचे नाते प्रत्येक सुख-दुःखांत मनापासून सहभागी होत असल्याने मनाला आश्वस्त करणारे ते एक निराळे समीकरण असते. आपल्या सर्वांच्या जीवनात अत्यंत महत्वाचे आणि जिव्हाळ्याचे नाते म्हणजे आपली परस्परांशी असलेली मैत्री. या मैत्रीचा थेट संबंध आपल्या भाव-भावनांशी आणि आपल्या आवडी-निवडीशी देखील असतो. अगदी लहानपणापासून आपले शिक्षण आपल्या बरोबर शिकणाऱ्या आपल्या जिवलग मित्र-मैत्रिणींबरोबर सुरु असते. त्यादरम्यान आपल्या आयुष्यांतील प्रत्येक क्षण अविस्मरणीय करण्यात त्या मित्र-मैत्रिणींचा खूप मोठा सहभाग असतो. आपल्या आयुष्यांत अनेक घडामोडी घडत असतात. कितीतरी लोक आपल्या आयुष्यांत येतात आणि जातात. पण सगळ्यांत अधिक लक्षात कोण रहात असेल तर, ते म्हणजे सगे-सोबती अर्थात आपले मित्र-मैत्रिणी. अगदी बालपणीच्या मित्र-मैत्रिणींची नावेही त्यांच्या स्वभावासहित लक्षात राहतात. अर्थात हे सगे-सोबती आपल्या आयुष्याच्या प्रत्येक टप्प्यावर आपल्याला भेटत असतात. पदोपदी आपण आपल्या आयुष्याची नवनवीन रांगोळी काढत असतो आणि त्यांत विविध रंग भरण्याचे काम आपले सगे-सोबतीच करत असतात. प्रसंगी आपले मन मोकळे करण्याची एक सुरक्षित जागा सुद्धा मित्र-मैत्रिणींपैकीच असते. आपल्या चुका हक्काने दाखवणे असेल अथवा आपले कौतुक करणे असेल, मित्रमंडळी शिवाय ह्यात सहसा पुढाकार इतर कोणी घेत नाही. थट्टा मस्करी करून आणि विनोद सांगून डोळ्यांत पाणी येईपर्यंत हसवणाऱ्या मित्रमंडळी शिवाय आपल्याला मनाने अधिक जवळ फारसे कोणी नसते. मैत्रीचे नाते अगदी दुध-पाण्यासारखे असते. दोन्ही एकत्र केले कि ते वेगळे करता येत नाही.



आधुनिक केसरी

**पिंपळ सोन्याचा | जन्म झाला ||**
गाथा-ज्ञानेश्वरी | आमुचे माहेर ||
आम्हा चराचर | पंढरी गा ||१||
निशीदिनी आम्हा | आषाढी कार्तिकी ||
म्हणूनिया मुखी | राम कृष्ण ||२||
होऊनी याचक | येता तुझ्या दारी ||
संसाराची वारी | धन्य झाली ||३||
आता न माघारी | जाणे भगवंता ||
लीन मी अनंता | चरणासी ||४||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## निरूपण


आधुनिक केसरी



डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

जयोऽस्ति ते कृपादेशः सुखं च ते
कृपाफलम् | अभीष्टफललाभाय दुर्गां देवीं
नमाम्यहम् || ३१ ||
तुझ्या कृपेचा आदेश म्हणजे जय होय
आणि तुझ्या कृपेचे फल म्हणजे सुख होय.
म्हणून तुला दुर्गा देवीला मी अभीष्टफलाच्या
प्राप्तीसाठी नमन करतो.

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !



स्वर्वेद रचनाकार
अनन्त श्री सद्गुरू
सदाफल देवजी
महाराज

राज काज सुख साज सब, धन व धाम
जग नाम । यह क्षण में छुटि जॉंयगें, नहिं आवे
तोहिं काम ।।४९।।(स्वर्वेद चतुर्थ मण्डल षष्ठ
अध्याय) ०४/०६/४९

**मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :**
राज्य आणि सर्व सुख-संपत्ती, धन, धाम, जगात झालेले नाव आणि प्रतिष्ठा सर्व एका क्षणात सुटून जाईल. हे कुठलंच आपल्या कामी येणार नाही. म्हणून या सर्व जग-ममत्वास सोडून परमेश्वराची भक्ती करा.

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सॲप करा ८५५४८८३१६६.

## काव्य-चरितावली



पुष्प ३३ वे

आधुनिक केसरी




अरुण वि. देशपांडे
संपर्क क्र. 9850177342

एके दिवशी गोंदवल्यात कळली
बातमी, ती कानोकानी पसरली
आलाय हो कुणी महात्मा मंदिरी
आहे त्याचा मुक्काम, बातमी दिली ।।१ ।।
श्रीमारुती मंदिर गजबजले
सारे गोंदवले दर्शना लोटले
रावजी, गीताबाई सांजेला आले
श्रीमहाराजांनी त्या दोघा पाहिले ।।२ ।।
माय गीताबाई गोसावीबुवास म्हणे
वर्षे आठ झाली, तो निघूनी गेला
सांगा, आमचा मुलगा कुठे दिसला ?
बघा, हा असा कसा घरा विसरला ।।३ ।।
गोसावीबुवा म्हणे माऊलीस, माय
काही खुणा सांगा मुलाच्या तुमच्या
माय गीताबाई ,सांगते मी तुम्हाला
चतुर, सुंदर तो,मुखी रामनाम त्याच्या ।।४ ।।
अरुणदास म्हणे- भेटीबद्दल या
सांगेन तुम्हा अधिक पुढचे ।।

## प्रपंच हे परमार्थाचे साधन

आधुनिक केसरी



फार दिवस नोकरी केली की माणसाच्या मनाला गुलामगिरीची सवय लागते; हे चांगले नाही. काही दिवस तरी माणसाने मालकीहक्काने राहायला शिकले पाहिजे. नोकरी करीत असतानाच अनुसंधानाचा अभ्यास करावा, म्हणजे पुढे नोकरी सुटल्यावर, जितका वेळ मिळेल तितका अनुसंधानात जाईल. प्रत्येक मनुष्य जन्माला आल्यापासून परमार्थाचा अभ्यास करतो आहे. प्रत्येक मनुष्याला आनंद किंवा समाधान हवे आहे, आणि त्यासाठी त्याची खटपट चालू असते. खरोखर, परमार्थाला दुसऱ्याची गरजच नाही; मग दुसरा कुणी आपला परमार्थ बिघडवील कसा ? जगात जे आहे ते सर्व चांगले आहे, आपणच तेवढे बरे नाही. दरवाजे, खिडक्या, हे जसे घराचे साधन आहे, किंवा आपल्या गावी जाण्यासाठी आगगाडी हे जसे साधन आहे, त्याप्रमाणे परमार्थ साधण्यासाठी, किंवा परमात्म्याच्या प्राप्तीसाठी प्रपंच हे साधन आहे. नाहीतर नुसत्या प्रपंचामध्ये सुख नाही. प्रपंच हा इथून तिथून सगळा सारखाच. गरीबाचा असो की अडाण्याचा असो, अधिकाऱ्याचा असो की कारकुनाचा असो, या देशातला असो की त्या देशातला असो, प्रपंचाचा धर्म जो उणेपणा, अपुरेपणा किंवा तात्पुरतेपणा, तो कधीही कुठेही बदलत नाही. म्हणून जे आपल्यापाशी नाही ते ज्याच्यापाशी आहे त्याच्या प्रपंचाला पाहून आपण भुलून जाऊ नये. आहे त्यात समाधान ठेवावे. परमार्थात अधिकार कुणी कुणाला देऊन येत नसतो; आपला अधिकार आपल्या कृतीवर अवलंबून असतो. परमार्थाची जाणीव जेवढी दुःखात होते, तेवढी सुखात असताना होत नाही. ते सुख शेवटी दुःखांतच लोटते. ज्या जाणीवेने आपण सर्व ज्ञान मिळवितो, ती काय आहे हे जाणण्याचा कुणी प्रयत्न करीत नाही. वैषयिक बुद्धी विकारांना सामील झाली म्हणजे ते प्रबळ होऊन घातक ठरतात. अशा वेळी, मनात येईल तसे वागण्याचे टाळले तर विकार दुबळे होतात. मी विकारवश होत असेन, तर अखंड प्रेमयुक्त नामस्मरण करणे जरूर आहे. विकारांना वश न होता, प्रारब्धाने आलेले विषय भोगावे म्हणजे त्यांचे काही चालणार नाही. थर्मामीटर ताप दाखवितो, घालवीत नाही. तद्वत शास्त्रे आपले कुठे चुकते ते दाखवितात, काय करावे ते दाखवितात, पण करणे आपल्याकडेच आहे. समर्थांना राम दिसला, आम्हांला का दिसू नये ? तर आम्ही समर्थांप्रमाणे श्रद्धा ठेवून उपासना सतत आणि आदराने करीत नाही म्हणून. कसेही करा, पण मी रामाचा आहे ही भावना जागृत ठेवा. नाम जाणून, अजाणून, श्रद्धेने, अश्रद्धेने, कसेही घ्या, राम तुम्हाला अन्नवस्त्राला कमी करणार नाही हे खास ! नाम श्रद्धेने घेतले तर विशेषच फळ. म्हणून अखंड नामात रंगून आनंदात राहू या. सुखाने प्रपंच करा पण त्यामध्ये भगवंताचे अनुसंधान ठेवा. हेच माझे तुम्हाला सांगणे आहे .

## निवडक सुभाषिते

आधुनिक केसरी

दुर्गमाण्यपि कार्याणि सिध्यन्ति कृपया तव |
अभीष्टफललाभाय दुर्गां देवीं नमाम्यहम् || ३२ ||
दुर्गम अशी कार्ये सुद्धा तुझ्या कृपेने सिद्ध होतात. म्हणून तुला दुर्गा देवीला मी अभीष्टफलाच्या प्राप्तीसाठी नमन करतो.

पं. महादेवशास्त्री जोशी, पुणे

गुरुवार, २९ जून २०२३
⊙ किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - ०२ ⊙ अंक -२८५
⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक

●MARATHI ●DAINIK ●CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) ●THURSDAY 29 JUNE 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ●YEAR-02 ●ISSUE-285 ●RNI : MAHMAR/2021/82566 ●PAGE-14 ●PRICE-5


# अवघी दुमदुमली पंढरी

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते होणार शासकीय महापूजा

आधुनिक केसरी न्यूज

**शांताराम मगर**

**पंढरपूर : आषाढीनिमित्त वारकऱ्यांनी पंढरपूरनगरी दुमदुमली आहे. शासकीय महापूजेसाठी मुख्यमंत्री शिंदे बुधवारी पंढरपुरात दाखल झाले आहेत. त्यांच्यासोबत राज्याचे अनेक मंत्रीही दाखल झाले आहेत. मध्यरात्रीनंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते आषाढीची शासकीय महापूजा संपन्न होणार आहे.**



गुरुवारी पहाटे मुख्यमंत्री विठुरायाच्या शासकीय महापूजेसाठी मंदिरात जाणार आहेत. शासकीय पूजेनंतर मंदिर समितीकडून होणार सत्कार स्वीकारून पहाटे साडे चार वाजता विश्रामगृहाकडे निघणार आहेत. सकाळी 10 वाजता विश्रामगृह येथे अनुकंपा तत्त्वावरील नियुक्ती पत्र वाटपाचा कार्यक्रम होणार आहे. सकाळी 11 वाजता तीन रस्ता येथे होणाऱ्या अन्नदान कार्यक्रमात उपस्थिती लावणार आहेत. दुपारी 11.30 वाजता तीन रस्ता येथे सुरु असलेल्या महाआरोग्य शिबिरात जाऊन वारकऱ्यांशी संवाद आणि महाशिबीराची पाहणी करणार आहेत. दुपारी 12 वाजता कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये असलेल्या कृषी प्रदर्शनाला भेट देणार असून तेथून पुन्हा मुख्यमंत्री हेलिकॉप्टरने सोलापूरकडे रवाना होतील. मुख्यमंत्र्यांसोबत मंत्रिमंडळातील महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, ग्रामविकास मंत्री गिरीश महाजन, आरोग्यमंत्री डॉ. तानाजी सावंत, शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर, कामगार मंत्री सुरेश खाडे, अब्दुल सत्तार अशी मंत्र्यांची फौज पंढरपूरमध्ये दाखल होणार झाली आहे. याचसोबत रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे हेदेखील आषाढी सोहळ्यासाठी पोचणार आहेत.

## वारी पंढरीची



वेध आषाढी वारीचे
मना लागे जेष्ठामधे..
म्हणे अंगणी तुळस
गडे टाकावा आळस...ll
माझ्या पंढरीची वाट
नाही आड वळणाची
नीट सुगम सुलभ
आहे वारी आनंदाची...ll
माझ्या पंढरीच्या वाटे
टाळ मृदुंगाचा घोष
नाद चिपळयांचा कानी
रामकृष्ण ध्यानी मनी...ll
माझ्या पंढरीच्या वाटे
मळे फुलले भक्तीचे
तुका-ज्ञानोबा नामाचे
जयघोष लक्ष वाचे...ll
माझ्या पंढरीच्या वाटे
मेघ धरी अब्दागिरी
खेळे पाऊस प्रेमाने
झिम्मा फुगडी नेमाने..ll
माझ्या पंढरीची वाट
आहे बुक्का चंदनाची
भावभक्तीच्या घागरी
टाळ, वीणा वाजे करी..ll
माझ्या पंढरीच्या वाटे
नाही जाती धर्म भेद
एकमेकाला वंदन
करीतसे थोर सान..ll
माझ्या पंढरीच्या वाटे
दिंड्या पताका सुंदर
हरीनामाचा कल्लोळ
गर्जे आभाळ पाताळ..ll
माझ्या पंढरीच्या वाटे
देह तुडवी काटेकुटे
मन कधीचे पोचले
तुझ्या पायाशी विठ्ठले..ll
भरे चंद्रभागा डोळी
भावभक्तीचा पाझर
केव्हा पाहीन सावळा
मना नाही आता धीर..ll
जीव शीव एकरूप
काय सांगू मी महती
पुन्हा पुन्हा जन्मा यावे
पंढरीच्या वारी साठी...ll

सौ. अनघा पतके.
खंडाळा. जि. सातारा.
9764860296.

# झणझणीत पिठलं भाकरीची भक्तीमय न्याहरी

आधुनिक केसरी न्यूज

**सदानंद माळी**

***कडेगाव : पंढरीला जाऊ ।रुखमादेवी वरा पाहू ।।डोळे निवतील कान ।मना तेथे समाधान ।।संता महंता भेटी होतील ।आनंदे नाचो वाळवंटी ।।ते तिर्थांचे माहेर ।सर्व सुखाचे भांडार ।।जन्म नाही रे आणिक ।तुका म्हणे माझी भाक ।। असे म्हणतच विठठल भक्तीची***

ओढ मनी धरतच ज्ञानोबा माऊली...सह विठ्ठल नामाच्या जयघोषात वटाळ मदृंगाच्या गजरात श्री विठ्ठल भेटीस आतूर झालेल्या वैष्णवांच्या वारीची मांदियाळी पंढरपूरकडे निघाली आहे आषाढी एकादशीला पंढरपूरला जावून विठ्ठलाचे दर्शन घेण्याची ओढ अनेकांना असते जे वारकरी मनोभावे विठ्ठलाच्या भेटीसाठी पायी वारी करतात त्यांची सेवा करून कणभर पुण्य आपल्या पदरात पाडून घेण्यासाठी काही विठ्ठलभक्त भक्तीमय अन्नदान करत असतात. सांगली जिल्ह्यातील तडसरचे विठ्ठलभक्त प्रदिप पवार ( खंडू काका ) व सहकारी स्नेही मित्राच्या सहकार्याने फाटा ( नातेपुते ) येथे सोमवारी वारकऱ्याना नुकताच दरवर्षीप्रमाणे यंदाही स्नेह भोजनाच आस्वाद दिला गेला. तडसर येथील भक्ती सेवा संस्था




व सूरजदादा मित्रमंडळाचे व पवार कुटुंबीयाच्या वतीने यांचे आयोजन केले जाते मंडळाचे सर्व कार्यकर्ते हे तडसर येथील पवार भावकी व अन्य समाजातील सर्व घरामध्ये भाकरीचे पीठ नेवून देतात अन् गावातील सर्व महिला उस्फुर्तपणाने, उत्साहात भाकऱ्या करुन देतात त्यांनी पीठ दिल असलं तरीही स्वतः जवळचही पीठ घालून भाकरी जास्तीत जास्त करुन देतात महिला विठ्ठलमय भक्तीत तल्लीन होवून म्हणतात की ***देव खाते देव पिते। देवावरती मी निजते ।।देव देते देव घेते ।देवासवे व्यवहारिते ।।देव येथे देव तेथे ।देवाविण नाही रिते ।।जनी म्हणे विठाबाई ।भरुनी उरली अंतरबाही ।।*** या संत जनाबाईच्या अभंगाप्रमाणे भक्तीभावाने प्रसन्न होवून भक्तीभावाचा भुकेल्या विठूरायाच्या माऊलीसाठी भाकऱ्या करत असतात. अक्षरशः तयार भाकऱ्या भक्ती सेवा संस्था व सूरज दादा मंडळाचे कार्यकर्ते एकत्रीत गोळा करत असतात थप्प्यावर थप्या भाकरी रचत असतात दहा हजार भाकऱ्या, झणझणीत पिठंल, खरडा, पाण्याची बाटली हे सर्व स्नेह भोजनाचे वाटप करण्यात आले आहे. प्रदिप पवार उर्फ खंडूकाका या बाबत भक्तीमय भावना व्यक्त करताना म्हणाले की वारकऱ्यांची सेवा म्हणजे माझ्यासाठी दिवाळी, दसरा! वारकऱ्यांची स्नेह भोजनाची सेवा करण्याची संधी मिळाली असल्याने तो एकप्रकारे विठ्ठल मय आनंदी सोहळाच म्हणावा लागेल. झणझणीत पिठंल भाकरीची भक्तीमय न्याहरी, वारकऱ्याची सेवा हाच तृप्तीचा श्रीहरी वारकऱ्याला सुखद आस्वाद देवून गेला. याचे आयोजन भक्ती सेवा मंडळ व सूरज दादा मित्रमंडळाचे सर्व कार्यकर्ते, अशोक कदम, मानस मिलिंद दातार, अर्जून गिडडे, मंगेश पाटगांवकर, उपसंरपच सूरज पवार, सागर पवार, राजकुमार जमखंडीकर, पुंडलिक बच्छावसह अन्य कार्यकर्ते सर्व महिला यांनी केलेल्या श्रमाचे चीज झाल्यावाचून राहणार नाही.

# धार्मिक ऐक्याचा मेळावा म्हणजे 'आषाढी वारी'

आधुनिक केसरी न्यूज

**बंडू खडांगळे**

**लखमापूर :**

***"चालिले न वाटे |***
***गाऊनियां जाता वाटे||***
***बरवा वैष्णवाचा संग |***
***येतो सामोरा श्रीरंग ||***

या तुकोबारायाच्या अभंग वचनाप्रमाणे वारकरी संप्रदाय एक महाराष्ट्रांचा अभिमान आहे .हे यातून स्पष्ट होते. कारण विश्वास आणि धार्मिक ऐक्य यांची सांगड घालणारा संप्रदाय म्हणून वारकरी संप्रदायाकडे पाहिले जाते. हे सांगणारा एक खास लेखाजोखा,

वारकरी संप्रदायाचा मुख्य सोहळा म्हणजे आषाढी एकादशी त्यामुळे आषाढ महिना सुरू झाला की समस्त वारकऱ्यांना वेध लागते ते विश्वास आणि धार्मिक ऐक्य यांची सांगड घालणारी पर्वणीचे वेध लागतात आषाढी वारीचे.

"पंढरीची वारी आहे माझ्या घरी" याप्रमाणे महाराष्ट्रास वारकरी संप्रदायाचा थोर वारसा लाभला आहे. वारकरी संप्रदाय हा भागवत संप्रदाय या नावानेही ओळखला जातो.जातीभेद विरहीत मानवतेच्या शिकवणीचा प्रचार आणि प्रसार करणाऱ्या वारकरी संप्रदायात अनेक थोर संताची परंपरा लाभली आहे. या संतांनी वेगवेगळ्या कालावधीत जन्म घेऊन तत्कालीन राजकीय, सामाजिक, आणि धार्मिक परिस्थितीत लोकांना लाखमोलाचे विश्वासाचे ऐक्य प्रबोधन केले. वारकरी संप्रदायाचे मुख्य दैवत म्हणजे पंढरपूर येथील विठुराया व रूक्मिणी .विठ्ठलास पांडुरंग परमात्मा या नावानेही ओळखले जाते. वारकरी संप्रदायासाठी तर ही साक्षात विठुमाऊलीच आहे.वारकरी संप्रदायाचा मुख्य सोहळा म्हणजे आषाढी एकादशी.त्यामुळे आषाढ महिना सुरु झाला की समस्त वारकऱ्यांना वेध लागते ते आषाढी एकादशीचे.आषाढ शुद्ध-११ यादिवशी येणाऱ्या आषाढी एकादशीला देवशयनी किंवा शयनी एकादशी या नावाने ओळखले जाते. कारण यादिवशी भगवान विष्णू शयन करतात व कार्तिक शुध्द एकादशीस ते शयनातुन जागे होतात. त्यामुळे कार्तिक शुद्ध एकादशीस प्रबोधिनी एकादशी या नावाने ओळखले जाते. वारकरी म्हणजे भागवत पंथाचे अनुसरण करून दरवर्षी आषाढी एकादशीस पायी चालत पंढरीस आपल्या लाडक्या विठुरायाच्या दर्शनास जात असतात. आषाढी एकादशीस पायी चालत पंढरपूरास जाण्याच्या प्रथेस वारी असे म्हणतात.ही वारी करणारे ते वारकरी .वारकरी पंथ ही इसवी सन १२९० पुर्वीपासून व त्याअगोदर ही मोठ्या प्रमाणावर प्रचलित होती. असे काही धार्मिक गं्थ सांगतात. वारकरी पंथामध्ये जी संतपरंपरा आहे.त्यातील अनेक विठ्ठलभक्त संताची पालखी त्यांच्या मुळ स्थानावरून पंढरपूरास नेण्याची परंपरा आहे. ही प्रथा फार वर्षांपुर्वी हैबतीबाबा नावाचे महान विभुती होऊन गेल्या जे संत ज्ञानेश्वर महाराजांचे निष्ठावान भक्त होते. त्यांचे मुळ गाव साता-याजवळील आरफळ हे होते.ते पुढे आळंदीत स्थायिक झाले. व त्यांनी संत ज्ञानोबारायांच्या पादुका पालखीत ठेवून त्या पंढरपूरापर्यंत भजने गात मिरवित नेल्या तेव्हा पासून ही परंपरा नेमाने सुरू झाली.



**वारकरी आणि श्रध्दा :**

तुळशी माळ गळा ! गोपीचंदन टिळा !!
ह्दयी कळवळा वैष्णवांचा !!

वारकरी हा श्रदाळु भाविक भक्त असुन तो कसली भेदभाव न करता विठुरायाची मोठ्या भोळ्या भावाने सेवा करतात . यामध्ये श्रध्दा हे एकच कारण समोर येते . त्यामुळे संत तुकोबारायांनी जगासमोर एका अभंगाचा दाखला दाखविला आहे . तो असा .

" आम्हा अळंकार मुद्रांचे शृंगार |
तुळसीचे हार वाही कंठी ||१||
लाडिके डिंगर पंढरिरायाचे |
निरतंर वाचे नामघोष ||ध्रु .||
आम्हां आणिकांची चाड चित्ती नाही |
सर्व सुख पायी विठोबाच्या ||२||
तुका म्हणे आम्ही नेघोंचि या मुक्ती |
एकाविण चित्ती दुजे नाही ||३||

त्यामुळे वारकरी बांधवामध्ये विश्वास आणि श्रध्दा मोठ्या प्रमाणावर का असते कारण तुकोबाराय देतात .

" काही न लगे एक भावची कारण !
तुका म्हणे आण विठोबांची !!"

त्यामुळे तुकोबारायांनी शपथ घेऊन सांगितले आहे की माझा पांडुरंग वारकऱ्यांमधील भाव, भक्ती, आणि श्रध्दा, विश्वास इ .चे उदाहरण आहे .


अर्जंट पाहिजेत
बॅक ऑफिससाठी महिला (कॉम्प्युटरचे ज्ञान आवश्यक), अनुभवी सुपरवायजर, मार्केटिंग प्रतिनीधी (स्वत:ची टू-व्हीलर आवश्यक) आणि अनुभवी सेक्युरिटी गार्ड पाहिजे.
संपर्क - 9822982958

# खडसेंचा खुलासा

आधुनिक केसरी

मागील काही दिवसांपासून उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार एकनाथ खडसे यांच्यात खडाजंगी पाहायला मिळत आहे. दोन्ही नेते एकमेकांवर टीका करताना दिसत आहेत. एकनाथ खडसेंनी जमिनीत तोंड काळं केलं नसतं तर ते आमच्याच परिवारात राहिले असते. त्यांना नवीन मालक शोधावा लागला नसता, अशी टीका फडणवीसांनी केली. यावर एकनाथ खडसे यांनी प्रत्युत्तर दिले आहे. मी मुख्यमंत्री पदाच्या शर्यतीत होतो, त्यामुळे त्यांनी (देवेंद्र फडणवीसांनी) मला अडकवण्याचा प्रयत्न केला. मला बदनाम करण्याचा प्रयत्न केला. मी जमीनच खरेदी केली नाही. मग जमिनीच्या व्यवहारात काळे तोंड करण्याचा काय संबंध आहे, असे प्रत्युत्तर एकनाथ खडसे यांनी दिली. ते 'एबीपी माझा'शी बोलत होते. फडणवीसांच्या टीकेला उत्तर देताना एकनाथ खडसे म्हणाले, "देवेंद्र फडणवीसांनी काल माझ्यावर टीका केली. मला वाटतंय फडणवीस अलीकडच्या काळात थोडं नैराश्यात आहेत. लहान मुलांप्रमाणे ते बालिश टीका करायला लागले आहेत. मुख्यमंत्री स्तरावरचा माणूस आणि माजी मुख्यमंत्री असलेल्या माणसाने काय शब्द वापरावे, काय बोलू नये, हे समजायला हवे. अलीकडच्या काळात विचित्र स्थिती पाहायला मिळतेय. ते कधी समोरच्याला म्हणतात तुमचे सांगाडे बाहेर काढेन. तर कधी काहीही बोलतायत. अशाप्रकारे त्यांचे बोलणे आहे. मला ते म्हणाले, तुम्ही जमिनीमध्ये तोंड काळे केले. पण तो जमिनीचा व्यवहार नियामानुसार झाला आहे आणि त्या जमिनीशी माझा काहीही संबंध नाही. उलट माझा आरोप नेहमीच राहिला आहे की, मी मुख्यमंत्री पदाच्या शर्यतीत असल्यामुळे त्यांनी (देवेंद्र फडणवीसांनी) मला अडकवण्याचा प्रयत्न केला. मला बदनाम करण्याचा प्रयत्न केला. हा माझा नेहमीचा आरोप आहे, हे संपूर्ण जगाला माहीत आहे. मी कोणताही गैरव्यवहार केला नाही, असे मी वारंवार सांगितले आहे. मी जमीनच खरेदी केली नाही, मग जमिनीच्या व्यवहारात तोंड काळे करण्याचा संबंध कुठे येतो, असेही खडसे म्हणाले. तुमच्याकडे पाहिले तर अनेकजण तोंड काळं करण्याच्या पलीकडे काळेकुट्ट चेहरे तुमच्या शेजारी बसतात. त्यांच्यावर भ्रष्टाचार आणि गैरव्यवहाराचे आरोप तुम्हीच केले आहेत. आज ते तुमच्या मंत्रिमंडळात आहेत. ते तुमचे सहकारी आहेत. अशा भ्रष्ट लोकांना घेऊन तुम्ही मंत्रीमंडळ तयार केले आहे. यामध्ये अनेक आमदारही आहेत. शा भ्रष्ट लोकांना घेऊन तुम्ही मंत्रीमंडळ तयार केले आहे.

# ऐका पंढरीचे महिमान...



प्रा. डॉ. विठ्ठल जायभाये
संपर्क क्र. 9158064068

आधुनिक केसरी

**आज देवशयनी-आषाढी एकादशी! महाराष्ट्राची ओळख असणारा एकमेव अलौकिक, सर्वांगसुंदर, दैदिप्यमान सोहळा म्हणजे पंढरपूरात टाळ-मृदंगाच्या निनादाने ओतप्रोत भरलेला वैष्णव वारकऱ्यांचा महोत्सव! महिनाभर पायी ज्ञानोबा-तुकोबांचा जयघोष करत पंढरीत आपल्या विठाईला भेटण्यासाठी भजन-भक्तीने भावविभोर झालेले वीर वारकरी आपल्या माहेरच्या अंगणात येऊन तुडुंब प्रेम कल्लोळात तल्लीन होऊन गाताहेत-नाचताहेत! वर्षभराच्या भेटीसाठी भावोत्कट वारकऱ्यांनी आज पंढरीला वेढा दिला असून भाव-भक्ती-भजन-प्रेमाची अक्षरशः लयलूट सुरु आहे! आजचा दिवस म्हणजे वारकऱ्यांसाठी महापर्वणी! मंदिरात पांडुरंगाचे दर्शन होणे शक्य नाही आणि त्यासाठी कुणी अट्टहास सुद्धा करत नाही.**

आज पंढरीत असणे म्हणजेच पांडुरंगाचे दर्शन! पंढरीरायाचा प्रेम भांडारी नामदेवराय आजचा आपला अनुभव ऐका पंढरीचें महिमान। राउळें तितुकें प्रमाण। तेथील तृण आणि **पाषाण। तेहि देव जाणावे॥१ ॥**
**ऐसी पंढरी मनीं ध्याती। त्यांसी तिहीं लोकीं गति। ते आनिका तीर्था जाती। तीं वंदिती तयांसी॥२ ॥**
**वाराणसी चालिजे मासा। गोदावरी एक दिवसा। पंढरी पाऊल परियेसा। ऐसा ठसा नामाचा॥३ ॥**
असा कथन करतात. आज श्री पांडुरंग मंदिराचा कळसच काय सगळे वारकरीच श्री विठ्ठल आहेत! एवढेच काय तेथील गवत, दगड हे सुद्धा आज विठ्ठलच झाले आहेत! आज पंढरपूर तीर्थांचेही तीर्थ झाले असून भारतातील सर्वच तीर्थे सुद्धा पंढरीत आले आहेत! आषाढीसाठी एक पाऊल घराबाहेर टाकणे हे काशीला जाण्यासाठी एक महिना, गोदातीरी एक दिवस चालण्याएवढेच आहे! आज खऱ्या अर्थाने पंढरपुरात सर्वत्र विठ्ठल जळी स्थळी भरला। रीता ठाव नाही उरला॥
आजी म्या दृष्टीने पाहिला। विठ्ठलची विठ्ठल॥
असं झालं आहे. त्यामुळेच कोणताही वारकरी कोणत्याही वारकऱ्याचे दर्शन घेतोय! हे दर्शन प्रत्यक्ष विठ्ठलाचेच दर्शन होय! हा अलौकिक सोहळा आज पंढरीत लाखो वारकरी याची देही याची डोळा अनुभवताहेत! हा नयनरम्य देखावा अंतर्मनाच्या कुपीत हृदयबंद करून ठेवताहेत! महाराष्ट्र आणि भारतच नव्हे तर संपूर्ण जगातून श्री विठ्ठलाचे वारकरी धावत पळत आज पंढरीत आलेत! जगातून अनेक पर्यटक पंढरीची वारी काय असते? यात्रा कशी भरते? आज दिवसभर-रात्रभर वारकरी पंढरीत काय करतात? हे पाहण्यासाठी-जपून ठेवण्यासाठी कॅमेरे घेऊन फिरताहेत!

भारतातच नाही तर संपूर्ण विश्वात देवशयनी-आषाढी एकादशी पंढरीच्या वारीचा हा नयनरम्य सोहळा जनमनात आणि प्रसिद्धीच्या सर्वोच्च शिखरावर का विराजमान आहे? याचे चिंतन-मंथन केले असता काही महत्वपूर्ण बाबी दृगोचर झाल्याशिवाय रहात नाहीत. अत्यंत महत्वाची बाब म्हणजे वारकरी सांप्रदाय जात-धर्म-पंथ-स्त्री-पुरुष-उच्च-नीच-श्रेष्ठ-कनिष्ठ-गरीब-श्रीमंत-ज्ञानी-अज्ञानी-लहान-मोठा असा कोणताही भेद मानत नाही. संत नामदेवांनी "या रे या रे लहानथोर। याति भलते नारी नर। करावा विचार। न लगे चिंता कोणासी॥" हा मूलमंत्र दिला आणि तेराव्या शतकांत कडेकोट वर्ण-लिंगभेद-जातीजातीत अडकलेल्या महाराष्ट्रातील सर्वसामान्य स्त्री-पुरुषांना कर्मकांड, स्पृश-अस्पृशता, उच्च-निचते शिवाय सामुहिक भोजन, भजन,भक्ती, अभंग लिहिण्याचा अधिकार प्राप्त झाला. यातूनच संत जनाबाई, संत सावतोबा, संत चोखोबा, संत जनाबाई, संत गोरोबा, संत निवृत्तीनाथ, संत ज्ञानेश्वर, संत कान्होपात्रा, संत सोयराबाई, संत बंका, संत चांगदेव, संत मुक्ताबाई, संत सोपान काका आदि आणि अन्य उपेक्षित, वंचित, पिडीत, बहिष्कृतांना आपले विचार बोलण्याचे आणि लिहिण्याचे स्वातंत्र्य वारकरी संप्रदायाने दिले. तेराव्या शतकांत या सर्वच संतांनी मोठी सामाजिक आणिवाङ्मयीन क्रांती घडवून आणली. तत्कालीन महार, मांग, शिंपी, ढोर, चांभार, कुंभार, माळी, वेशा, बहिष्कृत ब्राह्मण आदि सर्वांना एका छताखाली स्वातंत्र्य मिळाले.
**खटनट यावे । शुद्ध होऊनी जावे ॥ दवंडी पिटी भावे । चोखामेळा॥ किंवाउस डोंगा परी रस नोव्हे डोंगा । का भूललाशी वरलिया रंगा ॥**
असे मुक्तपणे आणि रोखठोक अभंग लिहून प्रबोधनाचे कार्य नेटाने पुढे नेले. या शिवाय संत सावतोबा महाराजांनी
**कांदा मुळा भाजी । अवघी विठाबाई माझी ॥ लसूण मिरची कोथिंबीरी । अवघा झाला माझा हरी॥**
असे कृषी संस्कृतीशी सांप्रदायाची नाळ जोडणारे अभंग



लिहिले. एवढेच काय संत नामदेवांनी भारतभ्रमण करून पंजाब पर्यंत वारकरी सांप्रदायाची पताका नेऊन पोहोचवली. याला जोडून मुळात नाथपंथी असणाऱ्या संत ज्ञानदेवादी भावंडांनी आपले महत्वपूर्ण योगदान देतांना ज्ञानेश्वरी, हरिपाठ, चांगदेव पासष्टी, अमृतानुभव सारखे अनमोल प्राकृत ग्रंथ लिहून सर्वसामान्य लोकांना लेखन-वाचन-भक्ती-ज्ञान आदि दुर्मिळ गोष्टी खुल्या केल्या. मधला काही काळ वारकरी सांप्रदायाचे काम मंदावले असतांना पुढे दिड शतकानंतर संत एकनाथांनी अभंग-गवळण-भारुड-हरिपाठ-रामायणासारखे ग्रंथ लिहून "संस्कृत देवे केले अन। प्राकृत काय चोरांपासोनी झाले॥" असा खडा सवाल करून परंपरावादी ग्रंथ-विचारांना नाकारले. सतराव्या शतकात संत तुकारामांच्या लोककल्याणकारी कार्य आणि लेखणीने वारकरी सांप्रदाय कळसावर गेला. कालबाह्य रूढी-परंपरा, थोतांड, कर्मकांड, बुवाबाजी, भोंदूपणा, दांभिकतेने शेतकरी-कष्टकरी समाज रसातळाला गेला असतांना "तीर्थी धोंडा पाणी। देव रोकडा सज्जनी॥, नवसे कन्या पुत्र होती। तरी का करणे लागे पती॥, अंतरी निर्मळ वाचेचा रसाळ। तया गळा माळ असो नसो॥, असाध्य ते साध्य करिता सायास। कारण अभ्यास तुका म्हणे॥" असे अनेक लोकजागृती आणि लोकोद्धार करणारे अभंग लिहून "तुझे आहे तुज पाशी। परी तू जागा चुकलाशी॥" असे सांगतांना लोकांना आपल्या शेतीमातीत, कामात, घरी, माणसात, आई-वडिलातच देव असून कुठेही जायची गरज नाही असे सांगितले. अवघड झालेले जीवन सोपे-सुकर झाले. जनामनातील देव मोकळा झाला. यात विशेषतः या सर्वच संतांनी पंढरीचा पांडुरंग हे आपले दैवत मोठ्या ताकदीने उभे केले. हा शेतकरी, कष्टकरी काळ्या लोकांचा काळा देव असून हा काहीही मागत नाही. आपल्या भक्तांसोबत दळतो, बाळंतपण करतो, शेती करतो, मेलेली गुरे-ढोरे ओढतो, पाणी भरतो, एवढेच काय एखाद्याची पत्नी सुद्धा होतो! तुमची आमची कामं करणारा, काहीही न मागणारा आणि कुणाच्याही मध्यास्तीविना "उराउरी" भेटणारा हा विठ्ठलच आपला देव आहे याची खात्री झाली! सर्वांनी हाच भक्ती-शक्तीचा उद्‌गाता आहे असे सांगितले. त्यातून हे सगळे संत आषाढी एकादशीला पंढरीच्या विठ्ठल दर्शनाला नित्यनेमाने यायचे. त्यातच तुकोबांचे धाकटे सुपुत्र श्री नारायण महाराजांनी एका पालखीत ज्ञानोबा-तुकोबांच्या पादुका एकत्र ठेऊन पंढरपूरला जायला प्रारंभ केला. ही पालखीच पुढे मोठी दिंडी झाली. सर्वच संतांचे अनुयायी त्या त्या भागातून देहूआळंदीकडे येऊन सामील होऊ लागले. भजन-कीर्तन करत महिनाभर संसारातील सुख-दुःख विसरून पंढरपूरला चालत जाऊ लागले. लोक सहभागामुळे वारीचे हे भव्य रूप आपल्यासमोर उभे आहे! अठरापगड जाती-धर्मातील लोकांना श्री विठ्ठल हा "भेदाभेद भ्रम अमंगळ" माणणारे दैवत असून तो सरळ कुणालाही भेटतो. ही खात्री झाली आणि त्यातूनच जनसमुदायाचा हा महालोंढा पंढरीकडे आनंदाने नाचत बागडत आलाय आणि विश्वाच्या अंतापर्यंत जात राहील! जय जय रामकृष्णहरी!

# महाराष्ट्रात महिला सुरक्षित आहेत का ?



माधव बैलकवाड
संपर्क 9545013082

आधुनिक केसरी

**महाराष्ट्रात महिला सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. पहाटे कामावरून घरी परतणाऱ्या एका संगणक अभियंता तरुणीवर रिक्षा चालकाने लैंगिक अत्याचार करण्याचा प्रयत्न केल्याची धक्कादायक घटना पुण्यातील वानवडी परिसरात घडली. अर्थात महिला अत्याचाराची ही राज्यातील ही पहिली घटना नाही दररोजच्या वर्तमानपत्रात महिला अत्याचाराची एक तरी घटना हमखास वाचायला मिळते याआधी मुंबईतील सावित्रीबाई फुले वसतिगृहातील विद्यार्थिनीची सुरक्षा राक्षकाने हत्या केल्याची बातमी आली ती बातमी ताजी असतानाच पुण्यात एमपीएससी परीक्षा उत्तीर्ण विद्यार्थिनींची हत्या झाल्याची बातमी आली.**

मुंबईतही छत्रपती शिवाजी टर्मिनसहुन वाशिकडे हार्बर रेल्वेने परीक्षेसाठी येणाऱ्या वीस वर्षीय तरुणीवर नवाजू करीम शेख या नाराधमाने मज्जीद बंदर जवळ धावत्या डब्यातच लैंगिक बळजबरी करण्याचा प्रयत्न केला. अन्य प्रवाशांच्या तक्रारीनंतर रेल्वे पोलिसांनी त्याला चार तासात अटक केली. याबाबत रेल्वे पोलिसांचे अभिनंदनच करायला हवे. रेल्वे पोलिसांनी देखील याबाबत स्वतःची पाठ थोपटून घेतली आहे. स्वतःचे कौतुक करून घेण्याचा त्यांचा अधिकारच आहे मात्र महिला अत्याचाराच्या घटना घडून गेल्यानंतर आरोपींना पकडून शिक्षा देण्यापेक्षा महिला अत्याचाराच्या घटना घडूच नये यासाठी पोलिसांनी प्रयत्न करायला हवेत. दिवसाढवळ्या महिलांची अब्रू लुटून त्यांची हत्या करण्याची नाराधमी प्रवृत्ती अलीकडे जोर धरू लागली आहे. दिवसाढवळ्या अशा प्रकारचे गुन्हे करण्याची हिंमत नराधमांमध्ये निर्माण होते याचाच अर्थ या नराधमांना कायद्याचा आणि राज्यातील सुरक्षा यंत्रणांचा धाक राहिला नाही. आपण कितीही मोठा गुन्हा केला तरी कायदा आपले काहीही करू शकत नाही. पैशाच्या जोरावर आपण कायदा आणि सुरक्षा यंत्रणांना आपण वाकवू शकतो अशीच धारणा या नराधमांची झाली आहे म्हणूनच ते असे मानवतेला काळिमा फासणारे कृत्य करत आहे. फुले, शाहू आंबेडकरांच्या पुरोगामी महाराष्ट्रात महिला अत्याचाराच्या घटना शोभणीय नाहीत. पुरोगामी महाराष्ट्राला खाली मान घालायला लावणाऱ्या या घटना आहेत. महिलांकडे उपभोगी वस्तू म्हणून पाहण्याची पुरुषी मानसिकता वाढू लागली आहे हीच मानसिकता यामागे कारणीभूत आहे. आज राज्यातील कोणत्याच महिला सुरक्षित नाही मग ती तीन वर्षाची चिमुरडी असो की सत्तर वर्षाची आजी. शाळा, कॉलेज, कामाचे ठिकाण, सार्वजनिक वाहन, स्वतःचे घर इतकेच काय तर पोलीस स्टेशन देखील महिलांसाठी सुरक्षित नाही असे दुर्दैवाने म्हणावे लागेल. महाराष्ट्रासारख्या पुरोगामी राज्यासाठी ही लाजिरवाणी बाब आहे. पूर्वी अशा घटनांसाठी बिहार आणि उत्तरप्रदेश ही राज्ये प्रसिद्ध होते आता त्यात महाराष्ट्राची भर पडते की काय अशी शंका येऊ लागली आहे. महाराष्ट्राचा बिहार उत्तरप्रदेश होऊ नये यासाठी सरकारने आणि पोलीस दलाने महिला अत्याचाराच्या वाढत्या घटना रोखण्यासाठी ठोस उपाययोजना करायला हव्यात तसेच संबंधित गुन्ह्यात दोषी आढळणाऱ्या नराधमांना कठोरात कठोर शिक्षा द्यायला हवी तसे झाले तरच राज्यातील महिला अत्याचाराच्या घटनांना आळा बसेल आणि पुरोगामी महाराष्ट्र ही महाराष्ट्राची ओळख कायम राहील.



हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. ( * पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत)आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# बाळापूर जिल्हा परिषद प्राथमिक शाळा येथे शाळापूर्व तयारी मेळावा

आधुनिक केसरी न्यूज



**बाळापूर :** शिक्षणाचा खरा पाया बालवयातच मजबूत केला गेला पाहिजे. यामुळे पुढच्या शिक्षणाची प्रक्रिया सहज आणि सोपी होते. शाळेत पहिल्यांदाच येणाऱ्या मुलांमध्ये शिकण्याची आवड निर्माण व्हावी. या विचाराने महाराष्ट्रात 'पहिले पाऊल- शाळापूर्व तयारी अभियान' राज्यसरकारने हाती घेतले आहे. या स्तरावर शाळा पूर्वतयारी अभियान राज्यस्तरीय मेळावा दुसरा धुळे तालुक्यातील बाळापूर जिल्हा परिषद शाळा या ठिकाणी आयोजित करण्यात आला आहे. मुलांच्या शारीरिक, बौद्धिक,सामाजिक आणि भावनात्मक,भाषा विकास व गणनपूर्व तयारी साठी आवश्यक कृतींचा सराव घेण्यात आला.

एक ते सहा स्टॉल या ठिकाणी शिक्षकांच्या वतीने लावण्यात आले होते. सदर हा उपक्रम डायटच्या प्राचार्य व गटशिक्षणाधिकारी सुरेखा देवरे, विस्ताराधिकारी घुगे, केंद्रप्रमुख झाल्टे, यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आला आहे. या कार्यक्रमासाठी शाळेतील मुख्याध्यापक मनोज देवरे, शिक्षिका जनाबाई मराठे, अलका पाठक, शिक्षक सचिन सोनवणे, तुषार महाले यांनी उपक्रमासाठी विशेष परिश्रम घेतले.तसेच या शिक्षकांनी पालक वर्गांना विशेष मार्गदर्शनही केलं. या कार्यक्रमाला नगरसेवक संजय पाटील, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष पंकज सोनवणे, पत्रकार दीपक वाघ, राहुल पाटील, माधवराव पाटील, दिनेश पाटील, तसेच अंगणवाडी सेविका मदतनीस गावातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# वैजापूरच्या जलतरणपटू व सायकलिस्टनी पटकावली पदके

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** व्यक्ती जीवनात विविध स्पर्धा व खेळात मिळणारी पदके, मेडल, प्रमाणपत्र, जीवनाला सदा सर्वदा उत्साह, स्फूर्ती व प्रेरित करणारी असतात. या बक्षिसांचा आनंद काही औरच असतो असे प्रतिपादन माजी शिक्षणाधिकारी धोंडीरामसिंह यांनी केले. शहरात नव्यानेच स्थापन झालेल्या जलतरण व सायकलिंग ग्रुपच्या सदस्यांनी अहमदनगर सायक्लोथा न ( सायकल राईड ),तसेच मराठवाडा पातळीवरील स्व,बि, एच,बिरादर स्मरणार्थ जलतरण स्पर्धा ,पंढरपूर वारी,नाशिक सायकल राईड स्पर्धा मध्ये सहभागी होऊन स्वर्ण,रौप्य,व कांस्य पदके जिंकून आपली क्षमता व योग्यता सिद्ध केली या विजयी स्पर्धकांना मिळालेल्या पदक, प्रमाणपत्र व स्मृती चिन्हांचे वाटप प्रसंगी ते बोलत होते, पोलीस निरीक्षक संजय लोहकरे व माजी शिक्षणाधिकारी तथा समाज कार्यकर्ते धोंडीरामसिंह राजपूत व कोटमगाव ( येवला ) येथील ए, के,कोटमे यांच्या हस्ते नुकतेच राजर्षी शाहू महाराज जयंती दिनी विजयी स्पर्धकांना मेडल व स्मृती चिन्ह प्रमाण पत्र प्रदान करण्यात आले,काही विशेष स्पर्धक दिव्यांग असलेले चरणसिंग काकरवाल, डॉ,ईश्वर अग्रवाल, योगेश गाढे,प्रदीप जाधव ( पंढरपूर वारी-३५०की, मी,सायकल राईड ), जलतरण स्पर्धा योगेश गाढे वेदिका गाढे,शिवाजी भसाळे,अहमदनगर सायकल राईड, योगिता गाढे,प्रियांका बोर्डे, बाबासाहेब वारकर,नाशिक सायकल रायडर सचिन वाणी,पारस अनर्थे,भावराव म्हस्के व ईतर ही विजेते, शेवटीं दिलीप अनर्थे यांनी आभार मानले.

# पैठणमध्ये 5 जुलैपासून शिव महापुराण कथेचे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** संभाजी नगरचे पालकमंत्री संदिपान भुमरे,तसेच विलासबापु भुमरे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधुन विलासबापु भुमरे प्रतिष्ठानच्या वतीने ५ ते १४ जुलै या कालावधीत संत एकनाथ महाराज समाधी मंदिरा समोरील भव्य मैदानावर भावविश्वरत्न ह.भ.प.समाधान महाराज शर्मा यांच्या अमृतवानीतुन श्री.शिव महापुराण कथेचे आयोजन करण्यात आले आहे. या निमित्ताने ५ जुलैला सकाळी ८.३० वाजता पैठण शहरातून भव्य कलश शोभायात्रा काढण्यात येणार आहे. ५ जुलै पासून प्रतिदिन दुपारी ४ ते सायंकाळी ७ पर्यंत ह.भ.प. समाधान महाराज शर्मा यांच्या सुश्राव्य आवाजात शिव महापुराण कथा होणार आहे. तसेच शुक्रवार १४ जुलै रोजी निवृत्ती महाराज देशमुख,इंदोरीकर यांचे किर्तन होणार आहे.

तरी भाविकांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन मुख्य आयोजक विलासबापु भुमरे प्रतिष्ठानचे शेखर शिंदे, सोमनाथ परदेशी,जनार्दन मिटकर,किशोर चौधरी,भुषण कावसानकर, दादा बारे, मनिषऔटे, राजेश मानधने, शहादेव लोहारे, राहुल कबाडी,पवन खराद, आबासाहेब गिरगे,गोविंद जगताप,संजय कस्तुरे,गणेश वाघमोडे,सौ.ज्योतीताई पठाडे यांनी केले.



## अर्जंट फ्लॅट विकणे आहे

नक्षत्रवाडी, छत्रपती संभाजीनगर, (महाराष्ट्र) येथील गट क्र. 8/1, समर्थ एलक्लेव्हमध्ये पहिल्या मजल्यावरील 2 बीएचके फ्लॅट अर्जंट विकणे आहे. एकूण क्षेत्रफळ 910 स्क्वेअर फूट, क्लिअर टायटल, सीएसएमएसएस कॉलेजपासून पाच ते सात मिनिटांच्या अंतरावर, रम्य वातावरणात, मेन रोडच्या अगदी जवळ.

संपर्क : मो. 7588818406



# चौका येथे मल्हार महासंघाचे मेंढपाळ संमेलन

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** तालुक्यातील चौका जिल्हा छत्रपती संभाजी नगर येथे संपन्न या वेळी उपस्थित मल्हार महासंघाचे संस्थापक अध्यक्ष श्री.रामदासजी दादा कोळेकर सहाय्यक पशुधन विकास अधिकारी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेळी मेंढी विकास महामंडळ पडेगाव, श्री.के.एम गिलबिले सर डॉ.प्रियंका तोंडे मॅडम प्रक्षेत्र व्यवस्थापक अधिकारी एडवोकेट मिर्झा जावेद एन बेग व मल्हार महासंघाचे प्रदेश उपाध्यक्ष श्री.संतोषजी थोरात प्रदेश संघटक श्री रामेश्वर लव्हाळे प्रदेश कार्याध्यक्ष श्री.संजय जी फटाकडे मराठवाडा प्रमुख श्री.आनिल वाढोणकर, सौ. मीराताई जानराव ,मेंढपाळ प्रमुख,शाहिनाथ मोरे, जिल्हा अध्यक्ष गजानन साबळे, आजीनाथ खिल्लारे , दत्तू नाना जेठे, गणेश गवारे, सुमित्रा दुधे, सविता शिंदे, सोमिनाथ बनसोड, अमोल तोगे, रामकीस्न सोरमरे, पांडुरग ढेपले,,रेवनाथ गोरे, रामनाथ वरदे, बकाल, शेकु काटकर, पंढरीनाथ धोंडकर, व सर्व जिल्हाध्यक्ष तालुकाध्यक्ष व आदी पदाधिकाऱ्यांची उपस्थिती होती.

महाराष्ट्र Business Katta













# कुंजबिहारी अग्रवाल : सामाजिक-आध्यात्मिक, राजकीय क्षेत्रातील अवलिया

आधुनिक केसरी

**ये माना जिंदगी है चार दिन की, बहुत होते है यारो चार दिन भी राजकारण हा बदमाशांचा शेवटचा खेळ आहे असे राजकारणाच्या बाबतीत म्हटल्या जाते.सज्जन लोकांचा राजकारणाकडे फारसा कल नसतो.आपण भले आणि आपले काम भले अशी भावना सज्जन लोकांची असल्याने चांगली माणसं राजकारणापासून अलिप्त राहण्याचा प्रयत्न करतात. व्यापारात जम बसलेली माणसं तर राजकारणापासून कोसो हात दूर राहत असल्याचे चित्र पूर्वीपासून दिसून येत असतांना सामाजिक, व्यापार आणि आध्यात्मिक क्षेत्रात वावर असलेल्या कुंजबिहारी अग्रवाल यांचा राजकीय जीवनातील सारीपाट देखील विशेष नोंद घेणारा ठरला आहे. कुंजबिहारी अग्रवाल हे व्यापारी क्षेत्रातील. भाऊ,चुलत भाऊ आणि अग्रवाल कुटुंबीय वेगवेगळ्या क्षेत्रात उत्तम व्यापार करणारे...**




सिद्धेश्वर राना पवार
संपर्क क्र.: 9422880080

मेहकर शहरात पूर्वी मुख्य बसस्थानक जिथे होते आणि आता मधले स्टॅण्ड किंवा जुने बस स्टॅण्ड म्हणून ओळख असलेल्या ठिकाणाला लागून अग्रवाल पेट्रोल पंप. आज जागोजागी पेट्रोल पंप उभे ठाकलेले असतांना त्यावेळी मेहकर शहरात दोनच पेट्रोल पंप अस्तित्वात होते. व्यवसाय जोमात असतांना तत्कालीन आमदार श्री. सुबोध सावजी यांच्या समवेत त्यांनी मेहकर नगरपरिषदेच्या राजकारणात आपला सहभाग नोंदवला.आणि विशेष म्हणजे तब्बल २२ वर्ष मेहकर नगर परिषदेचे अविरोध नगरसेवक म्हणून त्यांनी जनसेवा केली.लोकसभा- विधानसभा निवडणूक एकवेळ सोपी निवडणूक म्हणून ओळखल्या जाते,मात्र गावपातळीवरील ग्रामपंचायत असो की नगर परिषद निवडणूक असो,ह्या निवडणुकी कमालीच्या किचकट आणि बेभरवशाच्या व डोकेदुखीच्या असतात.
अशा किचकट निवडणुकीत तब्बल २२ वर्ष अविरोध विजयी होणे हे दिव्य कुंजबिहारी अग्रवाल यांनी पार पाडले. कुंजबिहारी अग्रवाल आणि त्यांच्या पत्नी शोभादेवी अग्रवाल हे दाम्पत्य मेहकर नगर पालिकेच्या इतिहासातील नगराध्यक्ष पद भुषविलेले पहिले जोडपे ...
१३ एप्रिल १९४५ रोजी शेतकरी व सर्वसामान्य कुटुंबात जन्मलेल्या व लोकांच्या मनावर अधिराज्य मिळविलेल्या ह्या अवलिया ने आपल्या कार्यकर्तृत्वाची अमिट छाप सर्वच क्षेत्रांवर उमटविली..
मागील ५० पेक्षा अधिक वर्षांपासून श्री संत गजानन





महाराज पालखी च्या निमित्ताने वारकरी व भक्तांसाठी भोजनरुपी प्रसादाचे आयोजन त्यांनी केले. ती परंपरा आजही त्यांची दोन्ही मुले रविकुमार अग्रवाल आणि विठ्ठल अग्रवाल पुढे चालवत आहेत.
मेहकर नगर परिषदेचे ते १३ ऑगस्ट १९९१ ते १६ डिसेंम्बर १९९१ पर्यंत अध्यक्ष,पत्नी सौ शोभादेवी अग्रवाल ह्या ११ जुलै १९८६ ते ५ फेब्रुवारी १९८७ या कालावधीत न.पा.च्या अध्यक्ष होत्या.शोभादेवी ह्यांना मेहकरच्या पहिल्या महिला नगराध्यक्षा हा बहुमान प्राप्त झालेला. 22 वर्ष अविरोध नगरसेवक पद मिळवून आपला राजकीय आलेख उंचावत असतांनाच दुसरीकडे समाजसेवा आणि व्यापार याकडे त्यांनी कधी दुर्लक्ष होऊ दिले नाही. व्यवसायावर त्यांची बारीक व करडी नजर. माशांच्या पिल्लाला पाण्यात पोहणे शिकविण्याची गरज नसते.त्याच उक्तीप्रमाणे कुंजबिहारी अग्रवाल यांनी आपल्या दोन्हीही मुलांना व्यवसायात निपुण केले. रविकुमार अग्रवाल आणि विठ्ठलसेठ अग्रवाल यांनी देखील पंचक्रोशीत व्यवसायात एक मानाचे स्थान मिळविलेले आहे. गजानन महाराज शेगाव पालखीच्या भोजन प्रसादाची सेवा स्वीकारत असतांनाच त्याकाळी श्री शारंगधर बालाजी मंदिराच्या विकासासाठी देखील कुंजबिहारी अग्रवाल यांचे भरीव योगदान राहीलेले आहे. १९७२ ते १९९५ पर्यंत अविरोध नगरसेवक आणि १३ ऑगस्ट १९९१ ते १६ डिसेंम्बर १९९१ पर्यंत नगराध्यक्ष राहीलेल्या कुंजबिहारी अग्रवाल यांचा २२ जून १९९७ रोजी एका अपघातात दुर्दैवी अंत झाला. त्यांच्या अकाली एक्झिट ने परिवाराची हानी तर झालीच,मात्र समाजाची देखील मोठी हानी झाली. जिल्हा अग्रवाल समाजाने त्यांना मरणोपरांत अग्रवाल भूषण पुरस्कार दिला. माणसाच्या हयातीत माणसाचं मोठेपण समाजाला दिसत नसते,त्यासाठी काळाच्या पडद्याआड जावं लागतं. कुंजबिहारी अग्रवाल यांची दोन्हीही मुलं राजकारणापासून अलिप्त राहली मात्र वडिलांचा समाजसेवेचा,व्यापाराचा आणि आध्यात्माचा वारसा अखंडितपणे चालवून त्यांच्या कार्याची त्यामाध्यमातून पूजा करत आहे आणि हीच त्यांना त्यांच्या मुलांनी दिलेली खरी श्रद्धांजली आहे.समाजसेवा ही रक्तात असावी लागते, ती रविकुमार अग्रवाल व विठ्ठल अग्रवाल यांच्या रक्तातच आलेली आहे.नाहीतर समाजात प्रसिद्धिपुरती समाजसेवा करणारे कित्येक दिसून येतात. अशा लोकांसाठी एक शेर आठवतो.. **बनावटी दुनिया में इंसानियत का तमाशा देखा है, सेल्फी के खातिर दूसरों की मदत करते देखा हैं।**

# विठ्ठलाचे अवघे गणगोत, जमले चंद्रभागेतिरी


प्रा. बी.एन.चौधरी
संपर्क क्र. ९४२३४९२५९३

आधुनिक केसरी

**आषाढी एकादशी, भागवत धर्मीयांची पर्वणीच.! आज चंद्रभागेचं वाळवंट वारकऱ्यांनी फुलून गेलं आहे. भीमातिरी भक्तीचं भगवं वादळ घोंगावत आहे. टाळ, मृदंग, चिपड्यांनी राम कृष्ण हरीचा ठेका धरला आहे. हाती भगव्या पताका घेवून वारकरी विठूनामात दंग झाला आहे. याचीसाठी केला होता अट्टाहास, शेवटचा दिस गोड व्हावा.! अशी तृप्ततेची भावना महिनाभर पायी चालणाऱ्या वारकऱ्यांच्या मनात ओसंडून वहात आहे. वारकरी आपल्या लाडक्या दैवताला, डोळेभरुन पहात आहेत. सुंदर ते रुप, उभे विटेवरी, कर कटावरी ठेवूनिया.! असं ते सावळं, परब्रम्ह रुप, जगाचा उद्धारासाठीच पंढरीत विसावले आहे. धन्य काया, वाचा. धन्य जन्म झाला. विठू आज पाहिला, डोळे भरुनी. हीच भावना समस्त वैष्णव भक्तांची झाली आहे. आषाढ महिन्याला प्रारंभ झाला म्हणजे सृष्टीला सृजनाचे वेध लागता.**

आभाळात मेघांची दाटी झालेली असते. मध्येच पावसाची एक छानशी रीमझिम हजेरी लागते. पेरण्या झालेल्या असतात. ढेकळांना फोडून नाजूक कोंब तरारुन वर आलेले असतात. सृष्टीने हिरवाईची चादर अंगावर ओढायला सुरवात केलेली असते. महाराष्ट्रातील कष्टकरी, शेतकरी, शेतमजूर, वारकरी पेरण्या करुन निवांत झालेले असतात. त्यांच्या मनात पांडुरंगाच्या दर्शनाची आस लागते. मुखात "राम कृष्ण हरी"चा मंत्र घुमतो. आणि गावागावात खुंटीला अडकवून ठेवलेले टाळ, मृदुंग, वीणा, भगवे ध्वज आणि पताका बाहेर काढले जातात. आपापल्या भागातील संतांच्या पालख्या सजतात. सारे वारकरी भक्तीमय वातावरणात पंढरीची वाट चालायला लागतात. नाचत, गात, किर्तन, भजन करत लाखो वारकरी एकत्र जमतात. माझ्या जीवाची आवडी, पंढरपूरा नेईन गुढी ! असं म्हणत त्यांची पाऊलं पंढरपूरकडे चालू लागतात. हीच ती वारी. वारी ही महाराष्ट्रात निव्वळ एक उत्सव, यात्रा एव्ढ्यापुरतीच मर्यादीत राहिलेली नाही. तर तो एक संस्कार बनला आहे. साडेसातशे वर्षांचा अखंड संस्कार. घरात साधा कार्यक्रम, देशात नेत्यांच्या सभा असतील तर किती मानपान, निमंत्रण, पत्र, पैसा लागतो. मात्र वारीत कुणीही कुणाला बोलवत नाही. आग्रह करत नाही. धमकी देत नाही. पैसा तर इथं व्यर्ज. तरीही लाखो माणसं एकत्र येतात. त्यांचा जनसमुह बनतो. जनसागर उधाणतो. खरंतर साऱ्या नद्या, या सागराला जावून भेटतात. मात्र आषाढी एकादशीला अघटीत घडतं. माणसांचा जनसागर, चंद्रभागेत जावून मिळतो. पांडुरंगाचे दर्शन घेतो आणि मुक्तीच्या वाटेला लागतो. अवघ्या वैष्णवांच्या मनाला एकच ध्यास असतो. वारीचा. हल्ली तर वारीत सुशिक्षित, तंत्रस्नेही आणि परदेशी भाविकांचीही संख्या लक्षणीय वाढली आहे. आजचे वर्तमान हे थेट ज्ञानेश्वर माऊलींशी जुळले आहे, ते वारीमुळे. संत ज्ञानेश्वरांनीही गुढी सहर्ष खांद्यावर मिरवली आहे. माझ्या जीवाची आवडी असं म्हणत त्यांनी आपल्या पूर्वजांच्या वारीच्या परंपरेची वाट प्रशस्त केली आहे. ते म्हणतातच.....

**माझे जिवाची आवडी, पंढरपूरा नेईन गुढी.**
**पांडूरंगी मन रंगले, विठ्ठलाचे गुणी वेधले.**

माऊलींनी निवृत्तीनाथांकडून दिक्षा घेवून ज्ञानयात्रेचा प्रवास सुरु केला. जगाला अमृतानुभव देणारी ज्ञानेश्वरी लिहली. संताच्या मेळा जमविला. स्वतः वारीत चालले. अनेकांना वारीची दिक्षा दिली. या परंपरेत ज्ञानेश्वरांपासून ते संत तुकारामांसह अनेकांनी अलौकीक योगदान दिले आहे. ते इतकं रुजलंय, की विठ्ठलाच्या, पांडूरंगाच्या भेटीला निघालेल्या प्रत्येक वारकऱ्यांच्या मुखी "ज्ञानेश्वर माऊली-तुकाराम" हा गजर चालू असतो. याचं कारण हे सर्व संत पांडूरंगाशी इतके एकरुप होवून गेले आहेत की देवात आणि त्यांच्यात द्वैतच उरलेलं नाही. त्यांचं नाव घेतलं की विठ्ठलाचं, पांडुरंगाचं नाव घेतल्याचं पुण्य मिळतं, अशी धारणा वारकऱ्यांमध्ये रुजली आहे. माऊलींनी हेच तर सांगितलं आहे. जे जे जीव आहेत, त्यातच देव शोधा. हे शोधणं म्हणजेच भक्ती योग आहे, असं ते म्हणतात.

**जे जे भेटे भूत, ते ते मानिजे भगवंत. हा भक्तीयोग निश्चित, जाण माझा.**

विठ्ठल हा सर्वसामान्य जनतेचा, कष्टकऱ्याचा देव आहे. वारकरी त्याच्यातच माय-बाप बघतात. त्याची भेट म्हणजे माऊलींची भेट. आणि विठ्ठलाची पंढरी म्हणजे त्यांचं माहेर. सासुरवाशीण स्त्री आपले कष्ट विसरण्या माहेरपणाला जशी दिवाळी - आखाजीला जाते. तसेच हे वारकरी मनाला विसावा भेटावा म्हणून आषाढी - कार्तिकीच्या वाऱ्या करतात. देवाला आपलं सुख-दुःख सांगतात. संत तुकाराम आपल्या अभंगात म्हणतातच.

**जावू देवाचिया गावा, देव देईल विसावा.**
**देवा सांगू सुख दुःख, देव निवारील भूख.**

संत चोखा मेळ्यालाही या पायी वारीचा ध्यास लागला होता. टाळी वाजवावी आणि गुढी उभारी हीच तर त्यांचीही वारीची संकल्पना.

**टाळी वाजवावी, गुढी उभारावी. वाट ती चालावी, पंढरीची.**

संताजी जगनाडे महाराज यांनीही संसाराला जड जोखड मानलं आहे. हे जोखड उतरावावं आणि भगवतभक्तीत रमावं असं सांगतांना ते म्हणतात रात्रंदिन त्या वनमाळीला म्हणजे विठ्ठलाला स्मरायला हवे.

**संतू तेली म्हणे, घाण्याचे जोखड. आहे फार जड, जगामाजी.**

तुकाराम महाराज तर वारीचं महत्व विषद करतांना, ती कोणत्याही तिर्थापेक्षा आणि व्रतापेक्षा मोठी श्रेयस्कर असल्याचं नमूद करतात.

**पंढरीची वारी, आहे माझे घरी.**
**आणिक न करी, तिर्थ व्रत.**

विठ्ठल चरणांची सेवा ही मला पुर्वापार मिळाली असून तीच माझी मिरासी आहे असं म्हणताना ते सांगतात.

**माझ्या वडिलांची, मिराशी गा देवा.**
**तुझिच चरण सेवा, पांडुरंग.**

संत एकनाथ महाराजांनीही आपले आई-वडिल हे विठ्ठल रुखमाई असून ते भीमेच्या तिरावर पंढरपुरी राहतात आहे. असा दाखला दिला

**माझे माहेर पंढरी, आहे भिवरीच्या तिरी.**
**बाप आणि आई, माझे विठ्ठल रखुमाई.**

पंढरपूर हे सर्व संतांना माहेर वाटतं. कारण तेथे गरीब, श्रीमंत हा भेद नाही. जात पंथ आडवा येत नाही. म्हणून तर चोखामेळ्यालाही पंढरी आपलं माहेर वाटतं. ते म्हणतात.

**चोखा म्हणे आमुचे, दीनांचे माहेर. ते पंढरपूर, भीमा नदी.**

अशिक्षित, अज्ञानी, दीनांना जे बळ मिळाले ते विठ्ठलाने दिलंय. ही भावना सर्वांचीच आहे. तिला अशिक्षित चोखामेळाने शब्द दिले.

**चोखा म्हणे मज, काहिच न कळे.**
**विठ्ठलाचे बळे, नाम घेतो.**

म्हणून संत एकनाथ या पंढरीच्या वाटेला भक्तीची सोपी पायवाट म्हणतात. ज्याला कुणाला ही वारी भेटल. त्याने तिचा पाठलाग करावा. वारीत चालावं आणि विठ्ठलाची पेठ गाठावी असा सल्ला ते देतात.

**करा करा लागा पाठ, धरा पंढरीची वाट.**
**पुंडलिकाची पेठ, सोपी आहे सर्वासी.**

ज्यांच्या सोबत देव जेवले ते संत नामदेवांनीही संसाराला सागर म्हटले असून पंढरीला माहेरच म्हटलं आहे. त्यांनी तर वारीला फक्त महाराष्ट्रापुरती मर्यादीत न ठेवता तीला पंजाब पर्यंत नेलं. म्हणूनच नामदेवांचा अभंगांना गुरु ग्रंथसाहेबांएव्हढंच महत्व मिळालं.

**संसार सागरी रे, माझे माहेर पंढरपुरी.**

तिर्थ, क्षेत्र, देव आणि देह देखील विठ्ठलमय झालेले नामदेव अत्र तत्र सर्वत्र विठ्ठलाचंच दर्शन घेतात. ते म्हणतात.

**तिर्थ विठ्ठल, क्षेत्र विठ्ठल, देव विठ्ठल, देव पूजा विठ्ठल.**

संत मांदियाळीतला प्रत्येक संत पांडुरंगमय झालेला आहे. गोरोबा कुंभाराला तर विठ्ठल त्यांचे सोबत मातीत नाचताय असा भास व्हायचा. हा त्यांचा अधिकारच होता.

**केशवाचे ध्यान, धरुनी अंतरी.**
**मृत्तिके माझारी, नाचतसे.**

संत सावता माळी कधी पंढरीला गेले नाहीत. वारीत चालले नाहीत. मात्र त्यांनी कामात राम पाहिला. वारकऱ्यात विठ्ठल पाहिला. कांदा, मुळाभाजी यांच्यात विठ्ठल शोधला. म्हणून विठ्ठल त्यांना भेटायला त्यांच्या शेतात आले. ते त्यांच्या ह्रदयीचे विसावले.

**कांदा मुळा भाजी, अवघी विठाई माझी.**
**लसूण मिरची कोथिंबीर, मोट नाडा विहीर**

शिव भक्त असणाऱ्या नरहरी सोनारांना त्या कृपाळू विठ्ठलाने सर्व देवळात तो एकच असल्याचा साक्षात्कार करुन दिला. जीवा शिवाची भेट घालून दिली. म्हणून ते नामाचा व्यवहार करु लागले.

**देवा तुझा मी सोनार, तुझे नामाचा व्यवहार.**
**देह बागेसी जाणे, अंतरात्मा नाम सोने.**

अश्या या कुटुंब वत्सल भगवंताच्या भेटीसाठी तुकोबा सासरी जाणाऱ्या लेकीची व्याकुळता विदित करतात. तशीच व्याकुळता त्यांना विठ्ठल दर्शनाचा लागते.

**कन्या सासुरासी जाये, मागे परतुनी पाहे.**
**तैसे झाले माझ्या जिवा, केव्हा भेटसी माधवा.**

माय आणि बाळाची चुकामुक व्हावी आणि ते भांबावून जावे किंवा मासोळी पाण्यातून बाहेर काढावी आणि पाण्याशिवाय ती तळमळावी इतकी व्याकुळता सर्व संतांमध्ये विठाईसाठी आहे.



जनाबाईला तर पंढरपुराच्या वाळवंटात जमलेला संतमेळा बघून ते सारे विठ्ठलाच्या अंगाखांद्यावर खेळताय असेच चित्र दिसते. हा देव लेकुरवाळा आहे असं त्या म्हणतात.

**विठू माझा लेकुरवाळा, संगे गोपाळांचा मेळा.**

यात निवृत्ती खांद्यावर, सोपान हातधरुन, ज्ञानेश्वर पुढे, मागे मुक्ताई, मांडीवर गोरा, चोखा जिवात, बंका कडेवर, नामा करंगळीधरुन चालतायेत. आणि जनाबाई हे मनोहारी दृष्य साक्षात अनुभवतेय. यांसह संत सेना न्हावी, सखूबाई, बहिणाई, दामाजी पंत यांनीही वारीची परंपरा जीवापाड जपली.
हे सर्व संत वारकरी चंद्रभागेच्या वाळवंटात जमतात. तेथे हा भक्तीचा खेळ मांडला जातो. येथे दिंड्या, वाऱ्या येतात. तळ ठोकतात. सारेच येथे वैष्णव असतात. त्यांना त्यांची जात आठवत नाही. धर्म लक्षात रहात नाही. सारे विठू नामात धुंद होतात. देहभान विसरतात. नाचायला लागतात.

**खेळ मांडिला, वाळवंटी घाई. नाचती वैष्णव, भाई रे.**

या पवित्र भूमीत क्रोध, अभिमान, वर्णाभिमान गळून पडतो. मन निर्मळ होते. चित्त प्रभू चरणी लागते. आणि सर्वत्र फक्त आनंद ओसंडून वाहतो. चंद्रभागेला वारकऱ्यांचा पूर येतो. आणि वारकऱ्यांमध्ये आनंद दुथडी भरुन वाहतो. वारीत असतांना तुकोबांना वेळापूर टेकडीवरून पांडूरंगाच्या मंदिराचा कळस दिसला होता. ते आनंद विभोर झाले. धावतच पांडूरंग भेटीला गेले. हाच तो धावा. आजही वारकरी येथूनच धावा करतात. जणू ते म्हणतात.

**आनंदाचे डोही, आनंद तरंग. आनंदची अंग, आनंदाचे.**

केशवाचे नामस्मरण आणि विठ्ठलाचंच प्रासादिक दर्शन हेच या भूतलावरचे अलौकीक सुख आहे असं तुकाराम महाराज म्हणतात आणि स्वतःला धन्य मानतात.

**तुका म्हणे सुख, झाले माझे जिवा. रंगलो केशवा, तुझ्या सवे.**

अत्यंत हीन कुलात जन्म घेवूनही केवळ विठूनामाच्या पवित्र संस्काराने आपलं जीवन धन्य करणारी कान्होपात्राही या सर्वापेक्षा कां वेगळी आहे ? दुष्ट यवनांपासून तिचं रक्षण करुन, आपल्या चरणी विसावा देणारा पांडुरंग, दीनांचा तारणहारच नाही कां. ? कान्होपात्रा म्हणते.

**धन्य भाग आज, डोळीया लाभले. म्हणोनी देखले, विठ्ठल चरण.**

भागवत धर्माचा हा वसा, जो घेतो तो गळ्यात तुळशी माळ घालतो. शाकाहारी होतो. सत्याचा आग्रह धरतो. त्याचं जगणं, वागणं हे सदाचारी, परोपकारी होतं. त्याचं जगणं तर सुधारतंच शिवाय त्याचा मृत्यूनंतरचा मार्गही मुक्तीकडे जातो. आपल्या सर्वंकश हिताचा हा मार्ग ज्याला सापडतो, त्याचे मायबाप धन्य होतात असं संत म्हणतात.

**आपुलिया हिता, जो होय जागता. धन्य माता पिता, तयाचिया**

ज्या काळात असे कन्या-पुत्र जन्माला येतात ते कुळ, तो वंश धन्य होतो. अश्या लेकरांचा त्या परमपित्या परमेश्वराला, पांडूरंगाला देखील हेवा वाटतो.

**कुळी कन्या पुत्र, होती जे सात्विक. तयांचा हरीक, वाटे देवा.**

आपल्या वागण्या, बोलण्याचा, जगण्याचा आणि कामाचा देवालाही आनंदच वाटायला हवा. अशी शिकवण सर्व संत देतात. हा संस्कार वारीत मिळतो म्हणून प्रत्येक सश्रद्ध नागरीकांनी किमान एकदा किंवा काही पाउलं पंढरीची पायी वारी चालायलाच हवी. तुकाराम महाराज म्हणतातच हा भवसागर सुखेनैव पार करायचा असेल, तर ही वारीची पायवाट धरायला हवी.

# तुका म्हणे माझे हेचि सर्व सुख | पाहिन श्रीमुख आवडीने ||



भगवान राईतकर
संपर्क क्र. ९७३०३३२१५१

आधुनिक केसरी

**भूतलावरील प्रत्येक व्यक्ती सुखाच्या शोधात आहे. प्रत्येकाचं सुख एक वेगळ आहे. काहींचे सुख संपत्तीमध्ये आहे ,काहींचे सुख वस्तूमध्ये आहे, काहींचे सुख संपत्तीच्या संचयामध्ये आहे, तर काहीच सुख रिकामा वेळ घालविण्यामध्ये आहे. थोडक्यात सुखाची संकल्पनाही व्यक्तीनुसार आणि काळानुसार बदलणारी आहे. परंतु सर्व सुखाचे साधन जर, आपल्याला शोधावयाचे झाले तर, सर्व सुख हे विठ्ठल परमात्माच्या मुखकमलाच्या दर्शनामध्ये आहे. या सुखाला काळ आणि वेळ याचे कुठलेही बंधन नाही. हे सुख कालमर्यादीत किंवा संपणारे नाही. सुखाचा आगर असणाऱ्या पांडुरंग परमात्मा चे वर्णन करतांना जगद्गुरु संत तुकाराम महाराज अभंगाच्या पहिल्या चरणामध्ये म्हणतात की,**

**सुंदर तें ध्यान उभें विटेवरी | कर कटावरी ठेवूनियां ||**

पांडुरंग परमात्मा सुंदर अशा ध्यानावस्थेमध्ये विटेवर उभा असून त्यांनी कमरेवर हात ठेवलेले आहे. कुठे आणि कशा पद्धतीने भगवान पांडुरंग उभे आहेत ? याचं वर्णन जगद्गुरु संत तुकाराम महाराज करताना... पुढे पांडुरंग परमात्माच्या गळ्यामध्ये तुळसीची माळ असल्याचे सांगतात आणि त्यांनी पितांबर परिधान केलेला आहे , असे वर्णन करतात. असे हे भगवान विठ्ठलाचे रूप मला नेहमी आवडते. भगवान पांडुरंग हे विष्णूचे अवतार असल्याच्या खुणा या अभंगांमध्ये आपल्याला सापडतात. जसे आपणास माहित आहे की, पितांबर, तुळशीचा हार , मकरकुंडले कौस्तुभमणी ह्या वस्तू भगवान विष्णूलाही अतिप्रिय आहे.असं हे रुप जगद्गुरू संत तुकाराम महाराजांना आवडते. असे संत तुकाराम महाराज अभंगाच्या दुसऱ्या चरणात सांगतात की ,

**तुळसीहार गळां कासे पितांबर | आवडे निरंतर तेंचि रुप ||**

जगद्गुरु संत तुकाराम महाराज यांनी भगवान विठ्ठलाच्या रूपामध्ये आणि भगवान विठ्ठलाच्या नामस्मरणामध्ये सर्व सुख असल्याचे म्हटले आहे. एखाद्या सुंदर वस्तूचे मनापासून आपण जर वर्णन केले तर, मनाला आनंद प्राप्त होतो. त्याचप्रमाणे भगवान विठ्ठलाचे रूप पाहून या रूपाचे वर्णन करताना सुखाची अनुभूती आपल्याला आल्याशिवाय राहणार नाही. भगवान पांडुरंग परमात्म्याच्या रूपाचे वर्णन करतांना पांडुरंगाच्या कानात माशाच्या आकाराची कुंडले चमकत असून त्यांच्या गळ्यामध्ये कौस्तुभमणी विराजमान असल्याचे वर्णन जगद्गुरु संत तुकाराम महाराज अभंगाच्या तिसऱ्या चरणात करतात की,

**मकरकुंडले तळपती श्रवणीं | कंठी कौस्तुभमणी विराजीत||**

असे हे सुंदर ध्यान अवस्थेमध्ये विटेवर उभे असलेले, कटेवर हात असलेले, पितांबर परिधान केलेले, माशाच्या आकाराची कुंडले कानांत असलेले , आणि ज्यांच्या गळ्यात कौस्तुभमणी आहे , असे हे भगवान पांडुरंग परमात्मा हेच माझे सर्व सुख असून त्यांचे मुख नित्यनियमाने आवडीने पाहीन असे जगद्गुरु संत तुकाराम महाराज अभंगाच्या शेवटच्या चरणामध्ये म्हणतात की,


**तुका म्हणे माझे हेचि सर्व सुख | पाहिन श्रीमुख आवडीने ||**

संसारामधील सर्व सुख परिपूर्ण असतील असे नाही परंतु पारमार्थिक सुख हे परिपूर्ण असून शाश्वत स्वरूपाचे असते. संसारातील क्षणभंगुर सुख उपभोगताना शाश्वत सुखाचे वारकरी होण्यासाठी आपल्याला नित्यनियमाने भगवान विठ्ठल परमात्म्याच्या नामस्मरणातून आणि विचार दर्शनातून जीवनरुपी वारीची वाटचाल करावी लागेल.





# भक्तीचा महिमा



उद्धव भयवाळ
संपर्क क्र. ८८८८९२५४८८

आधुनिक केसरी

**भक्ती म्हणजे काय? केवळ देव देव करणे म्हणजे भक्ती नव्हे. देवावरील प्रेम म्हणजे भक्ती. संत तुकाराम महाराजांच्या भाषेत सांगायचे झाले तर, भक्ती ते कठीण । सुळावरची पोळीनिवडी तो बळी । विरळाशू**

वेदपुराणात आपण बघितले की, धाडसी व्यक्तीनेच भक्ती केली आहे. याचे सर्वात मोठे उदाहरण म्हणजे भक्त प्रल्हाद. त्याचे वडील हिरण्यकाश्यपू यांना देवही घाबरायचे. अशा भक्त प्रल्हादाने भगवान श्री विष्णूंची भक्ती केली. त्याने आपल्या वडिलांना पटवून सांगितले की, भक्ती काय असते.

भक्ती आणि व्यवहारातील लौकिक प्रेम यांतील फरक असा :- लौकिक प्रेम हे सापेक्ष, सहेतुक, दुतर्फी व कार्य-कारणांनी युक्त असते. भक्ती ही मात्र निरपेक्ष, निर्हेतुक, व अखंड असते. प्रेमाची पराकाष्ठा हीच भक्ति. नारायणास /देवास आवडेल तेच करणे हेच त्याचेवरचे प्रेम होय. भगवंताचे प्रेम अखंड हवे. देवाच्या नामाचा प्रेमाने उच्चार म्हणजे भक्ती. देवाला स्मरणे हीच भक्ती. एका दृष्टीने भक्ती ही सोपी तर एका प्रकारे ती कठिण आहे. जीवनातील सर्व गोष्टी भगवंताला अर्पण करणे म्हणजे भक्ती. श्रवण, कीर्तन, स्मरण, अर्चन इत्यादी भक्तीचे नऊ प्रकार आहेत. त्यांना नवविधा भक्ती म्हणतात. भक्तीचे आकर्षण असे आहे की ते भगवंतालाही खेचते; आणि न घडे ते घडते असा अनुभव येतो. प्रभू रामचंद्रही भिल्लिणीच्या उष्ट्या बोरांना भुलले. असे भक्तिप्रेमाचे माहात्म्य आहे. भक्ति-भावाचे धन पदरी असले की सुखाला तोटा नाही. भक्तीचे रूपांतर अद्वैतात म्हणजे एका ब्रह्मस्थितीतच होते. भक्तीचा हिशोब करता येत नाही. भक्ती कधी कमी-अधिक होत नाही.

व्यवहारात काय, परमार्थात काय सदा चैतन्याचे स्मरण असावयास हवे. आपली वृत्ति चैतन्याकडे वळविणे हीच भक्ती. चैतन्याशी तादात्म्यस्थिति हीच भक्ती. चैतन्याचे द्वारा चैतन्याशी तादात्म्य होऊन चैतन्याची अनुभूति घेणे हीच निखळ भक्ती आहे. चिद्वायूचे लहरीकडे व लहरीचे वायूकडे आकर्षण हीच शुद्ध भक्ती किंवा भक्तिप्रेम. भक्ती जीवास सुख प्राप्त करून देणारे उत्तम रसायन आहे.

या शब्दात मोठी गंमत आहे. मुळात भक्त म्हणजे काय ? तर जो विभक्त नाही. म्हणजे म्हणजेच दूर गेलेला, तर भक्त याचा अर्थ एकरूप झालेला असा होतो. अर्थात भक्ती म्हणजे एकरुप होण्याची प्रक्रिया. एकरुप होण्याकरता जवळ येण्याची गरज असते किंवा जवळ येणं ही एकरुप होण्याची पहिली पायरी समजू. अर्थात हे जवळ येणं म्हणजे काय ? तर अंतर नाहीसं करणं. हे अंतर दोन प्रकारचं असतं. एक जे डोळ्यांना दिसतं, ज्याला फिजिकल डिस्टन्स असं म्हणतात. देवळासमोरच्या रांगेतला शेवटच्या टोकाचा माणूस आणि गाभाऱ्यातली मूर्ती यांच्यात अंतर आहे. रांग संपली, तो गाभाऱ्यात पोहोचला. शारीरिक अंतर कमी झालं. पण आंतरिक अंतर ? ज्याला आपण;इनर स्पेस म्हणतो, त्याचं काय ? रांगेच्या शेवटच्या टोकाला येऊन तो उभा राहिला तेव्हा त्याचं साध्य होतं गाभाऱ्यात पोचण्याचं, देवाला पाहण्याचं. तो त्या टोकाला उभा होता, पण मनाने मात्र गाभाऱ्यात होता. मग रांगेत रमला. तिथल्या लोकांशी रुळला, राजकारणावर चर्चा केली. रांगेतला एकजण त्याचा व्यवसायबंधूच निघाला. मग काय! एक महत्त्वाचा व्यवहार ठरला.. तासाभरात जर बाहेर पडलो, तर आजच हा व्यवहार साध्य होईल. आता तो घड्याळाकडे पाहतो. गाभाऱ्यातल्या देवाला विनवतो, रांग संपू दे! लवकर हा व्यवहार, हे डील होऊ दे! पाच किलो पेढे देईन! साध्य बदललं !!!

मघाशी त्याचं साध्य होतं देव. आता साध्य आहे व्यवहार! देव हे फक्त साधन आहे. म्हणजे शरीराने जेव्हा तो गाभाऱ्यात पोहोचलाय, तेव्हाच मनाने तिथून कित्येक किलोमीटर दूर असलेल्या त्या व्यवहाराच्या ठिकाणी पोहोचलाय. भेट झाली, पण भक्त आणि भगवंताची नाही. कारण भक्त त्यापूर्वीच विभक्त झाला... रेम आणि भक्ती यातलं हेच साम्य आहे. दोन्हीचं अंतिम रूप हे विरघळून जाणं आहे. मीपण टाकल्याशिवाय विरघळता येत नाही.

# संतांचे माहेरघर पंढरपूर



सुधीर कोर्टीकर,
संपर्क क्र. 9765553312

आधुनिक केसरी

**पांडुरंगाची पंढरी म्हणजेच भारतातील सर्व संतांचे माहेरघर महाराष्ट्राचं आध्यात्मिक आणि सांस्कृतिक केंद्र असणारे हे पंढरपूर. या पंढरपूरचा महिमा प्रत्येक संताना आपल्या अभंगातून.. ओव्यातून.. भारुडातून.. स्वमुखातून गायलेला आहे. संतांच्या आलोकिक कार्याचे कार्यक्षेत्र असणार हे पंढरपूर प्रत्येक संतांनी आपलं प्रेरणास्थान मानून या पांडुरंगास आपल्या अंतरंगात साठवलं.**

मग याच पांडुरंगाच्या प्रेरणेतून भक्ती रसाचे हे अमृत समाजातील सामान्य पर्यंत पोहोचविले... तेच हे अनंत कोटी ब्रम्हांडनायक असणाऱ्या पांडुरंगाचे पंढरपूर.

पंढरीच्या या पांडुरंगाच्या भक्तीरसा मधून लाखो वारकरी जाती धर्माची बंधन दूर सारत माणसांची हृदय जोडली आहेत .हजारो वर्षांच्या या वारीच्या परंपरेतून लाखोंच्या संख्येने वारकरी या पंढरपुरी येतात आणि विठ्ठल भक्तीत स्वतःचे देहभान विसरून विठ्ठलाची एकरूप होऊन जातात.

पंढरपुरात चैत्र वारी.. माघवारी.. आषाढीवारी.. कार्तिकवारी.. संपूर्ण वर्षात या चार वाऱ्यामध्ये विठ्ठल भक्तांच्या भक्तीचा जणू महापूर येतो.

आपल्या विठ्ठलाचं.. पांडुरंगाचं ते सावळे सुंदर रूप पाहण्यासाठी हे सर्व वारकरी एकात्मिक ओढीनी या पंढरपुरी नगरीत येतात. अनेक मैलांची ही पायपीट करीत ऊन ..वारा ..थंडी..पाऊस ..अशा कशाचीही तमान बाळगता केवळ मनात विठ्ठल भक्तीची ओढ त्या वारकऱ्याच्या मनामध्ये असते. विठ्ठल नामाचा गजरात टाळ मृदुंगाच्या तालावर हे सारे वारकरी आपलं देहदान विसरतात . मुखातून ग्यानबा तुकाराम च्या घोषणा देत स्त्री पुरुष , मुलं वृद्ध पालखीबरोबर चालत असतात .आपला काम क्रोध मद मत्छर विसरून ..ऊच नीच भेद दूर सारत विविध जाती धर्मांचे लोक या वारकरी संप्रदायात विठ्ठल भक्तीने एकत्रित येतात . पंढरीच्या वाटेवर हाती दिंड्या पताका घेऊन देहभान विसरून नाचत ..नाचत पंढरीच्या पांडुरंगालाभेटण्यासाठी पंढरपुरात दाखल होतात.

पांडुरंगाचं हे पंढरपूर म्हणजे या भूतलावरील भक्तीचे वैभव .भक्ती संप्रदायाचे तत्त्वज्ञानाचे धर्मपीठ आहे. भक्ती पंथाच्या पहिल्या प्रवर्तकाचं भक्त पुंडलिकाचं परमदैवताचं मूळ स्थान म्हणजे पंढरपूर. भक्त पुंडलिक आपल्या आई-वडिलांच्या सेवेत रममाण झालेला असताना प्रत्यक्ष पंढरीचा पांडुरंग त्या चंद्रभागेच्या तीरावर येऊन उभा राहिला. त्यावेळी आपण आई-वडिलांच्या सेवेत आहोत हे सांगत त्या चैतन्याच्या राजस सुकुमारास भक्त पुंडलिकांनी एक वीट दिली.

त्या वीटेवर आपले कर कटीवर ठेवत हे सावळ सुंदर रूप उभे राहिलं. आई-वडिलांच्या सेवेत रममाण झालेल्या त्या भक्त पुंडलिकास पांडुरंग न्याहाळत उभा राहिला. गेल्या २८ युगांपासून तो पांडुरंग आजही तसाच उभा आहे तो आपल्या परमप्रिय भक्तांना दर्शन देण्यासाठी.

भक्त पुंडलिकामुळे हे परब्रम्ह सावळ्या सुंदर विठ्ठलाचे दर्शन आज आपणां सर्वास होत आहे.

आपल्या या आराध्य दैवतास भेटण्यासाठी हजारो लोक रोज पंढरपुरात येत असतात. कोणताही गाजावाजा न करता हजारो मैलावरुन एका आत्मिक ओढीनं. पालख्या.. दिंड्या.. पताका.. टाळ.. मृदुंग.. घेऊन या पंढरीत वर्षांनूवर्ष दिंड्या घेऊन वारीसाठी येत असतात. महाराष्ट्राच्या अनेक गावातून हे वारकरी पांडुरंगाच्या भेटीसाठी येत असतात ते एका आत्मिक ओढी मधूनच.

संत ज्ञानेश्वरांच्या काळापासून असे वारकरी या पंढरपुरी नगरीमध्ये वारीसाठी येत असतात.

प्रत्येक वारकरी संप्रदायाचे पंढरपुरात मठ आहेत. या मठात त्यांची संपूर्ण व्यवस्था करण्यात येते.

वाढत्या वयाबरोबर वडीलधारी मंडळी वारीचा भार आपल्या मुलांच्या खांद्यावर सोपवतात.

नवीन तरुण पिढी ही वारकरी संप्रदायाची पताका आपल्या खांद्यावर घेत विठ्ठलाच्या भक्तीच्या अनामिक ओढीनी .त्याची त्या सर्वांची पावलं पंढरपुरांच्या दिशेने पडू लागतात.

महाराष्ट्रामध्ये भक्ती संप्रदायाचा उदय झाला तो या पांडुरंगाच्या वारकरी संप्रदाया मधूनच.

महाराष्ट्रातील अनेक संतांची आपल्या बोलीभाषेतून ही भक्तीची ओढ प्रत्येक गावातील अशिक्षित जनमानसात देखील निर्माण केली. ज्ञानदेवाने आपल्या ओव्या मधून.. तुकोबांनी आपल्या अभंगातून.. तर नाथांनी आपल्या भारुडातून ..या भक्तीरसाची बीज महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातील खेड्या खेड्यांच्या भूमी मधून पेरली. वारकरीचे संप्रदायातील प्रत्येक वारकऱ्यांना ही भक्तीची परंपरा खेड्यांपाड्यांतून पोहोचवली. त्या काळातील संतांनी पेरलेल्या भक्तीच्या बीजां मधून ..गावातून वृक्षवल्ली बहरली ..फुलली याच भक्ती रसाचा सुगंध प्रत्येकाच्या हृदयापर्यंत आज पोहोचलेला आहे.

वारकरी अत्यंत निस्वार्थी वृत्तीनी वर्षानुवर्ष विठ्ठल वरील अनामिक प्रेमाने पंढरपुरात येत असतात. विठ्ठलाच्या नामाचा गजर कर्नाटक मधूनही तितक्याच भक्ती भावाने केला जातो. विठ्ठलाच्या या भक्तीचा मार्ग मुळात दक्षिणेकडूनच आपणाकडे आल्याचा उल्लेख आळ भागवत महात्म्यातून आढळतो. म्हणूनच विठ्ठलाला कानडा विठ्ठला असं संबोधलेलं आहे.

महाराष्ट्रातील भागवत संप्रदायांनी समाजाला एक वेगळी दिशा दिली. आपल्या सामाजिक कार्यातून समतेची शिकवण दिली. धार्मिक मूल्यांची जपणूक करत समाजामध्ये एकोपा ..एकता निर्माण केला. भक्तिभावातून वैचारिक शक्ती या वारकऱ्यांमुळे समाजाला मिळाली. समाजातील कलह दूर करत परम सहिष्णूतेची.. विचारांची.. भावपूर्णतेची नवी दृष्टी या संताने आपल्या अलोकिक शिकवणी मधून साऱ्यांना दिली. महाराष्ट्रात वारकरी संप्रदायांना विठ्ठलाच्या या भक्ती बरोबरच महाराष्ट्राच्या सांस्कृतिक नीती मूल्याची जपणूक करण्याचे साऱ्यांना शिकवलं.

एक ओळ विनम्रपणे लिहावीशी वाटते... माझं गाव पंढरपूर आणि पंढरीच्या या, नगरीतच माझा जन्म झालेला आहे. बालपणापासून वारकऱ्यांच्या सहवासातून संस्कारातून मी मोठा झालो. ही गोष्ट मला अभिमानानी नमुद कराविशी वाटते....



# वारकरी पंथ: एक अक्षय संप्रदाय



डॉ. नीता पांढरीपांडे
संपर्क क्र. 7659064555

आधुनिक केसरी

**गुजरातचे भक्तिमार्गाचे संस्कार अशा सर्व प्रवाहांना मिळून महाराष्ट्रात त्यांनी एक नवी सुष्लीष्ठ प्रेरणा निर्माण केली. हे सर्व संग्राहक उपासनापीठ आहे. सगळ्या पंथातील संस्कारक्षम आणि चिंतनशील भक्तीचे हे सांस्कृतिक केंद्र आहे. जातीव्यवस्थेला धक्का न लावता गरीब श्रीमंत, उच्च नीच हा भेदभाव विसरून सर्वांना येथे स्थान प्राप्त झाले आहे. ज्ञानदेवांमुळे वारकरी संप्रदायाचे द्वार स्त्रीशुद्रांबरोबरच अस्पृश्यांनाही उघडले गेले आणि खऱ्या अर्थाने वारकरी पंथ समृद्ध झाला. ज्ञानेश्वरांच्या व्यक्तित्वाचा ठसा वारकऱ्यांवर पडला. त्यांच्या तत्त्वज्ञान आणि आचारधर्माची जोड मिळाल्यामुळे वारकरी संप्रदायाची संघटना अधिक मजबूत झाली. ईश्वराजवळ भेदभाव नसतो. पण त्यावेळी कर्मठ रुढीमुळे अस्पृश्यांना मंदिरात प्रवेश नव्हता.**

कर्मठ लोकांनी अस्पृश्यावर ही बंधने लादली होती. वारकरी पंथांनी लोकांमध्ये समतेचे आणि ममतेचे संस्कार केले. हजारो शुद्रातिशूद्रांना बंधूभावाचे शिक्षण दिले. त्यांना आत्मोद्धाराचा मार्ग दाखवला. लोकांमध्ये श्रद्धा होतीच संतांनी त्याला डोळसपणा आणला. संकुचित सांप्रदायिकता त्यांनी कधीही बाळगली नाही, दैवतांची रणे माजवली नाही की विशिष्ट प्रकारच्या प्रतिकांचा आग्रह धरला नाही. संपूर्ण बहुजन समाज आणि स्त्री शुत्रांना मंदिरात स्थान मिळवून देण्यासाठी त्यांनी बौद्ध, जैन, लिंगायत यांच्याबरोबरच लोक भाषेचाही पुरस्कार केला. ज्ञानेश्वरी, एकनाथी भागवत, तुकाराम गाथा देश भाषेत लिहिलेली वाचायला सोपी, विस्तृत आणि स्फूर्तीदायक आहे. लोकांना समजेल, रुचेल, पचेल अशा तऱ्हेचे लेखन या संतांनी केले. लोकभाषा मराठीचा अभिमान बाळगला आणि सर्वसामान्यांची भाषा मराठीला साहित्यात महत्त्वाचे स्थान मिळवून दिले.

अंतर्जीवनाचा साक्षात्कार घडविल्यामुळे लक्षावधी शुद्रांच्या जीवनात एक नवीन आशा निर्माण झाली. त्यांना आपल्या सामर्थ्याचा प्रत्यय आला आणि त्यांच्या विकासाचे एक नवीन दालन उघडल्यासारखे त्यांना वाटले. समतेच्या आणि बंधुत्वाच्या तत्त्वांचा पाठपुरावा करून सामाजिक विषमतेची धार कमी करण्याचा वारकरी संतांचा हा प्रयत्न खरोखरीच स्तुत्य होता. माणसाचे मोठेपण हे त्याच्या सामाजिक प्रतिष्ठेवर अवलंबून नसून वैयक्तिक चारित्र्यावर आहे ही गोष्ट त्यांनी पुन्हा पुन्हा आवर्जून सांगितली. सामाजिक विषमतेमुळे निर्माण झालेला बहुजन समाजातील न्यूनगंड नाहीसा करून त्यांच्या प्रगतीला उपकारक होतील अशी नवी मूल्ये आचरणात आणण्याचा संतांचा प्रयत्न होता. वारकरी संतांनी भक्तीला अग्रस्थान दिले होते



हे जरी खरे असले तरी ज्ञानालाही त्यांनी तितकेच महत्त्व दिलेले होते. नामदेवांची परीक्षा करून त्यांचे 'मडके' कच्चे असल्याची साक्ष गोरोबाकाकांकडून काढून नामदेवांच्या भक्तीला ज्ञानाची जोड देण्याचे काम ज्ञानदेवांनी केले. विसोबा खेचरांचा अनुग्रह झाल्यानंतर 'डोळियांचे डोळे, उघडले जेणे' या नामदेवांच्या उद्‍गारावरून वारकरी संप्रदायात ज्ञानाचे महत्त्व किती आहे हे स्पष्टपणे दिसून येते.

वारकरी संतांनी केवळ धार्मिक क्षेत्रातील भेदभाव दूर केला. देव भावाचा भुकेला आहे ही भावना त्यांनी सर्वसामान्य जनमनात खोलवर रुजवली. आपण सर्वच ईश्वराची लेकरे आहोत ही विश्वबंधुत्वाची भावना अंगी बाणवली. त्यामुळे सामाजिक व्यवहारातील कटूता पुष्कळ अंशी कमी झाली. देवळातील देव न बघता माणसातील देव त्यांनी पाहिला आणि सर्वांना दाखविला ही या पंथाची विशेषता आहे. तुकाराम महाराज आपल्या अभंगात हा विचार सुंदरपणे मांडताना दिसतात –'जे का रंजले गांजले, त्यासी म्हणे जो आपुले, तोचि साधू ओळखावा, देव तेथेचि जाणावा!'

समाज घटनेच्या दृष्टीने माणसाचा आत्मविश्वास वाढवून त्याला कर्माकडे प्रवृत्त करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य वारकरी पंथाने केले. ही गोष्ट अत्यंत महत्त्वाची आहे. जातीभेद हा नैसर्गिक आहे तेव्हा मोठेपणाने त्याचा स्वीकार करून सर्व जातीच्या लोकांना निरहंकारपणे स्वधर्माचे पालन करण्याचे धडे त्यांनी दिले. महाराष्ट्राला वारकरी संप्रदायाचा मोठा वारसा आहे. जातीभेद विरहित मानवतेच्या शिकवणीचा प्रसार व प्रचार करणाऱ्या वारकरी संप्रदायाला अनेक थोर संतांची परंपरा लाभली आहे. या सांप्रदायातील संतांनी वेगवेगळ्या कालावधीत जन्म घेऊन वेळोवेळी तत्कालीन राजकीय आणि सामाजिक परिस्थितीत लोकांचे प्रबोधन केले. वारकरी संतांची प्रवृत्ती लोकाभिमुख होती. दिवस रात्र बहुजन समाजात राहून नवचैतन्य आणण्याचा प्रयत्न वारकरी संप्रदायाने केला व प्राप्त परिस्थितीला कणखरपणे सामोरे जाण्याचे बळ त्यांच्यात निर्माण केले.

या संप्रदायाने प्रपंच आणि परमार्थाचा समन्वय साधला आहे. एकनाथ महाराज, गोरा कुंभार, चोखामेळा, सावता माळी असे अनेक संत गृहस्थाश्रमी, कुटुंब वत्सल होते. आपापले व्यवसाय निर्वेधपणे सांभाळत ते लोकात मिसळत होते. निष्ठा, त्याग, धैर्य, सहिष्णुता, उदारता इत्यादी गोष्टींनी त्यांनी लोकांची मने जिंकली होती. आत्मशुद्धी आणि सदाचार यावर वारकरी पंथांनी भर दिलेला आहे. माणसं वासनाविकारांच्या लोंढ्या बरोबर अगतिकपणे वाहत चाललेली आहे अशावेळी स्वस्थ बसून राहणे एक सामाजिक अपराध आहे याची जाणीव संतांना होती. सकल जीवात्म्याचे हितचिंतन आणि कल्याण साध्य करणे त्यांना महत्त्वाचे वाटले आणि म्हणूनच काया वाचा मनसा या तिन्ही प्रकारे वारकरी पंथाच्या संतांनी लोककल्याणार्थ आपले आयुष्य घालवले.

जगाच्या कल्याणा संतांच्या विभूती देह कष्टविती उपकारे' जगाच्या हितासाठी, त्यांच्या कल्याणासाठी, सुखासाठी आपले सर्व आयुष्य ओवाळून टाकणं हेच वारकरी संतांचे उद्दिष्ट होतं. मानवतावादी विचारधारा हीच त्यांना प्राधान्याने अभिप्रेत होती. धनसंपत्तीपेक्षा माणूस आणि त्याचे जीवन हे सर्वाधिक मोलाचे असते हा विचार त्यांनी समाजाला दिला. भौतिक संपत्तीपेक्षा वैचारिक आणि आत्मिक संपत्ती जास्त श्रेष्ठ असते ही शिकवण वारकरी संतांनी समाजाला दिली. या पंथात उपासकांची भावनाच मुख्य आहे, प्रतिमा गौण आहे याची जाणीव असल्यामुळे वारकरी संतांनी ऐक्यावर अधिक भर दिलेला दिसून येतो. वारकरी पंथाचे कार्य सामाजिक दृष्ट्या निश्चितच व्यापक आणि मौलिक स्वरूपाचे आहे. निकोप जीवनदृष्टीचा पाया खणून संतांनी त्यावर सामाजिक कार्याचे मंदिर उभारले. ज्ञानेश्वर- एकनाथांच्या ग्रंथांनी या पंथाला तात्विक अधिष्ठान मिळवून दिल्यामुळे वारकरी पंथाचे महत्त्व द्विगुणित झाले. वारकरी पंथाद्वारे संतांनी विघटित आणि त्रस्त समाजाला एक नवीन संबल प्रदान करून साऱ्या विश्वाला त्याद्वारे ज्ञानरूपी प्रकाशात आलोकित केले. म्हणूनच ८०० वर्षानंतर आजही वारकरी पंथाचे महत्त्व टिकून आहे. वारकरी पंथाला मरण नाही, हा एक अक्षय संप्रदाय आहे.

# दर्शन विठोबाचे



श्रीकृष्णदास
निरंकारी (बापू)
संपर्क क्र. 9423714883

आधुनिक केसरी

**असे म्हटले जाते, की पंढरपूर यात्रा ही जगातील सर्वात मोठी आणि सर्वात जुनी यात्रा आहे. ज्यात भक्तगण या विशेष प्रसंगी जमतात आणि दिंडीमध्ये भाग घेतात. हा प्रवास सुमारे अडीचशे किमी आहे. या पंढरपूर आषाढी एकादशी वारी- पंढरपूर वारीचे नावही लंडनच्या वर्ल्ड बुक ऑफ रेकॉर्डमध्ये समाविष्ट झाले आहे.**

विठ्ठलभक्तांचे माहेर पंढरपूर ही अशी जागा आहे, जेथे जगातील बहुतेक भक्त एका दिवसात देवाला भेटायला येतात. या कारणास्तव या अनोख्या वारी अर्थात दिंडीचे नाव वर्ल्ड बुक ऑफ रेकॉर्डमध्ये नोंदले गेले आहे. या दिंडी यात्रेच्या सुरूवातीपासूनच ही यात्रा दरवर्षी सातत्याने होत असते, इतकी वर्षे गेली पण ही यात्रा कधीच कमी झाली नाही. या प्रवासात कोणताही अडथळा येत नाही. दरवर्षी पन्नासहून अधिक संतांच्या पालख्या पंढरपूरला विठोबाच्या दर्शनासाठी येतात. जून-जुलै महिन्यात- आषाढी शुक्ल पक्षातील आषाढी एकादशीचा सण महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात साजरा केला जातो. हा महाराष्ट्राचा धार्मिक उत्सव आहे. या उत्सवाच्या वेळी परमेश्वराच्या पालखीची अतिशय सुंदर सजावट केली जाते. त्यानंतर परमेश्वराची पादुका ठेवली जाते, त्यानंतर सर्व लोक एकत्र जमून बाहेर निघतात आणि या प्रवासादरम्यान ते परमेश्वराच्या नावाची सर्व गाणी, भजन व भक्तिगीते गात त्यांच्या तालावर नाचतात. या सर्वांनी बनवलेल्या गटाला दिंडी असे म्हणतात. बघा गौळण-

**"चुंबळ मोत्यांची, वर पाण्याचा घडा गं|**
**कृष्ण देवाने, हळुच मारला खडा गं||"**

असे म्हटले जाते, की पंढरपूर यात्रा ही जगातील सर्वात मोठी आणि सर्वात जुनी यात्रा आहे. ज्यात भक्तगण या विशेष प्रसंगी जमतात आणि दिंडीमध्ये भाग घेतात. हा प्रवास सुमारे अडीचशे किमी आहे. या पंढरपूर आषाढी एकादशी वारी- पंढरपूर वारीचे नावही लंडनच्या वर्ल्ड बुक ऑफ रेकॉर्डमध्ये समाविष्ट झाले आहे. जेव्हा ही अनोखी दिंडी पंढरपूरच्या दिशेने काढली जाते, तेव्हा या दिंडी दरम्यान काही लोक गरीब आणि गरजू



लोकांची सेवा करतात, यावरून आपण हे देखील समजतो, की देव सर्व स्वरूपात आहे. कारण देव सर्वव्यापी आहे. या प्रकारची सेवा या प्रवासामध्ये केली जाते, म्हणून त्याला सेवा दिंडी असेही म्हणतात. या दिंडी दरम्यान लोक सर्व प्रकारच्या सेवा करतात. ज्यात अमृत कलश, नारायण सेवा, रूग्णांची सेवा, खेड्यांच्या इमारतींची दुरुस्ती आदी. या आषाढी एकादशी आणि सेवा दिंडीमध्ये भाग घेणाऱ्या यात्रेकरूंचे आरोग्य पूर्णपणे निरोगी राहते, त्यांचे आयुष्य शांती आणि आनंदाने भरलेले असते. म्हणूनच-

**"फुलांमध्ये फूल या गुलाबाचं|**
**वेड मला लागलं या पांडुरंगाचं||"**

महाराष्ट्रात वारकरी लोकांचा खुप मोठा समुदाय आहे आणि त्यातील बहुतेक शेतकरी मोठ्या संख्येने शेतीची कामे करणारे आहेत. शेतीत पेरणी झाल्यानंतर सर्व शेतकरी २१ दिवसांच्या या प्रवासात निघाले. सर्व धर्म आणि जातींचे लोक या यात्रेमध्ये भाग घेतात. शहाणे वयस्क सुद्धा या प्रवासाचा अनुभव घेतात. जेव्हा पंढरपूरकडे जाणारा प्रवास सुरू होतो, तेव्हा सर्व यात्रेकरू म्हणजेच वारकरी बाह्य जगाला विसरतात आणि परमेश्वराच्या नावावर गातात आणि नृत्य करतात, केवळ परमेश्वराची आठवण करतात. या संपूर्ण प्रवासादरम्यान लोक केवळ ईश्वराच्या नावात मग्न असतात, की ते बाह्य जगास पूर्णपणे विसरतात आणि फक्त परमेश्वरावर लक्ष केंद्रित करतात. यावेळी ते आपले मन, शरीर आणि आत्मा पूर्णपणे शुद्ध ठेवतात. आत्मा पूर्णपणे एकजुटीने शुद्ध होतो आणि परमेश्वराचा आशीर्वाद प्राप्त करतो. या प्रकारचा अनुभव घेतल्यास एखादी व्यक्ती पूर्ण विकसित होते व तिला आपल्या जीवनाचे योग्य उद्देश कळते. त्यासाठी हा जीवाचा आटापिटा-

**"खेळ मांडियला वाळवंटी ठाई!**
**नाचती वैष्णव भाईरे!!"**

पंढरपूरच्या विठोबा मंदिरास बरेच लोक श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर म्हणून ओळखतात आणि हे मंदिर महाराष्ट्रातील पंढरपुरात आहे. हे महाराष्ट्राचे सर्वात महत्वाचे मंदिर आहे व प्रत्येकजण या मंदिरात विठोबा आणि त्यांची पत्नी देवी रुक्मिणी यांचे दर्शन घेण्यासाठी भेट देतो. विठोबा हा भगवान विष्णू आणि भगवान कृष्ण यांचा अवतार आहे. महाराष्ट्राच्या या मंदिराला लाखो भाविक येतात आणि भेट देतात. या मंदिरात आषाढी एकादशी व कार्तिकी एकादशीनिमित्त मंदिरात जाण्यासाठी एक भाविक गट तयार करतात. त्यांच्या गटाला दिंडी आणि भक्त संबोधित करून सर्वांना वारकरी म्हणतात, नव्हे तर सिद्ध होतात-

**"पाऊले चालती पंढरीची वाट!**
**सुखी संसाराची तोडोनिया गाठ!!"**

पंढरपूर चंद्रभागा नदीच्या काठावर वसलेले आहे आणि असे म्हणतात, की या नदीत स्नान केल्याने एखाद्या व्यक्तीची सर्व पापे धुवून जातात. या मंदिरात गेल्यानंतर प्रत्येक भक्तास डोळे भरून अगदी जवळून प्रभुदर्शनाची संधी मिळते. भक्त परमेश्वराच्या श्रीचरणाला स्पर्श करू शकतो. मे २०१४पासून या मंदिरात महिलांना परवानगी देण्यात आली असून मागासवर्गीय लोकांनाही पुजारी होण्याची संधी देण्यात आली आहे. हे भारतातील पहिले मंदिर आहे ज्यामध्ये मागासवर्गीय लोकांना प्रथमच मंदिराचा पुजारी होण्याची संधी देण्यात आली आहे. या मंदिराच्या काही वस्तू व इमारती पाहिल्यानंतर कळते, की हे मंदिर बाराव्या ते तेराव्या शतकापर्यंत अस्तित्त्वात आहे, परंतु आता आपण जे मंदिर पाहतो ते सतराव्या शतकानंतर डेक्कन शैलीत बांधले गेले आहे. या मंदिरास मोठे घुमट आणि कमानी दिसतात. यात्रेत आपल्याला वारीचा अनुभव, संतदर्शन, परब्रह्म विठ्ठलदर्शन आणि भक्तीचा आनंद भरभरून मिळतो, अशी इश्वरभक्तांची श्रद्धाळू धारणा आहे. त्यांना अडविण्यात कुणाची बिशाद ? चला, आपणही गाऊ-

**"माझे माहेर पंढरी। आहे भिवरेच्या तीरी।।"**

# विठ्ठलाचा महिमा



रमेश लांजेवार, नागपूर
संपर्क क्र. 9921690779

आधुनिक केसरी

**पांडुरंग हे विष्णुचा अवतार आहे.त्यामुळे ते संपूर्ण सृष्टीचे पालनहार आहेत.परंतु महाराष्ट्रातील मराठी माणसासाठी विष्णू हे पांडुरंगाच्या(विठ्ठलाच्या)रूपात खरं तर महाराष्ट्राचे कुल दैवत आहे.**

आषाढ महिना हा विठ्ठलाच्या गजरात तल्लीन असतो.जनुकाय साक्षात विठ्ठल प्रगट झाल्याचे आपल्याला संपूर्ण महाराष्ट्रात दिसुन येते. महाराष्ट्रातील संतांच्या ह्रुदयात स्थान असणारे अवघ्या महाराष्ट्राचे दैवत म्हणजे पंढरपूरचा विठोबा.मराठी वर्षांच्या आषाढ महिन्याच्या शुद्ध पक्षात जी एकादशी येते तिला आषाढी किंवा देवशयनी एकादशी असेही म्हणतात. याच एकादशीला महाएकादशी असेही म्हणतात. त्यामुळे या एकादशीला घरातील प्रत्येक लहान-मोठे व्यक्ती उपवास करून विठुरायाच्या चरणी पुजा-अर्चना करून नतमस्तक होऊन आपली मनोकामना पूर्ण करण्यासाठी आराधना करतात.वर्षातील एकूण २४ एकादशी पैकी आषाढी एकादशीला आगळेवेगळे महत्व आहे. कारण याच एकादशीला महाराष्ट्रातील लाखो भाविक, वारकरी वारी घेऊन पंढरपूरला जातात व प्रत्येकांना वाटते की जीवनात एकदा तरी वारी अनुभवावी म्हणजे आपण समजू शकतो की वारीचे दर्शन म्हणजे साक्षात पांडुरंगाचे दर्शन.

महाराष्ट्राला संतांची भूमी संबोधले जाते.कारण महाराष्ट्रात संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत नामदेव, संत एकनाथ, संत जनाबाई, संत मुक्ताबाई यांच्या सारख्या महान संतांनी संत परंपरेचा वारसा जोपासला आहे. कोणी लहान नाही,कोणी मोठा नाही, सगळे समान व सारखे अशी समतेची भावना सर्व संतांनी लोकांच्या मनात रूजवीली आहे. त्यामुळेच आज संपूर्ण भारतात महाराष्ट्राला संतांची भूमी म्हणून संबोधले जाते. आजही संपूर्ण महाराष्ट्रात संतांचा वारसा दिसून येतो. ही महाराष्ट्रासाठी स्वाभिमानाची गोष्ट आहे. असेही म्हणतात की आषाढी एकादशी पासून चातुर्मासाची सुरूवात होते व आषाढी एकादशीला भगवान विष्णू शेष नागावर निद्रास्थ होतात आणि चातुर्मासानंतर कार्तिकेय एकादशीला जागे होतात.आषाढी एकादशीला आळंदीवरून ज्ञानेश्वराची, देहू वरून तुकारामाची, त्र्यंबकेश्वर येथुन संत निवृत्तीनाथांची, उत्तर भारतातून संत कबीर यांची, तर पैठणवरून एकनाथ महाराजांची पालखी पंढरपूरला विठोबाच्या दर्शनासाठी येतात.या पालख्यांबरोबर सर्व भाविक पायी विठू नामाचा गजर करत पंढरपूरला पोहचतात.एकादशीच्या दिवशी भाविक पहाटे उठून चंद्रभागेच्या तीरी स्नान करतात व तुळस वाहून विठ्ठलाची पुजा-अर्चना करतात.विठ्ठल म्हणजे साक्षात विष्णूचाच अवतार आहे. विठ्ठलाच्या चरणी मस्तक ठेवुन संपूर्ण भाविक मानवजातीच्या कल्याणासाठी आणि येणारे विघ्न दूर व्हावे यासाठी साकडे घालतात व राज्य सुजलाम सुफलाम होण्याची मनोकामना करतात. पौराणिक कथांमध्ये सुध्दा आषाढी एकादशीचा उल्लेख दिसून येतो.मृदुमान्य नावाच्या एका राक्षसाने भगवान शंकराची उपासना करून त्यांना प्रसन्न केले व मला मरण येणार नाही असा वर शंकरजी जवळुन मागुन घेतला. अशा परिस्थितीत मृदुमान्य राक्षसाने संपूर्ण देवतांवर विजय मिळविण्याचा निश्चय केला.अशा परिस्थितीत मृदुमान्य राक्षसाने ब्रम्हा, विष्णू आणि महेश यांचा शोध घेणे सुरू केले. अशावेळी ब्रम्हा, विष्णू, महेश एका गुहेत तीन दिवस लपून बसले. या तिघांच्या एकवटलेल्या श्वासापासून एकादशी देवता उत्पन्न झाली व तिने मृदुमान्य राक्षसाचा वध केला. हीच ती आषाढी एकादशी होय. या दिवसांपासून चातुर्मास सुरू होतो.असा उल्लेख आपल्याला पुराणांमध्ये पहायला मिळते. विदर्भाचे पंढरपूर म्हणून धापेवाड्याची २८२ वर्षांची ओळख आहे. आजही आपल्याला आषाढी एकादशी पासून तर गुरूपौर्णिमेच्या दुसऱ्या दिवशी पर्यंत (आखाडीच्या दुसऱ्या दिवसांपर्यंत) धापेवाड्याला भव्य यात्रा दिसून येते.धापेवाड्याचे पांडुरंगाचे परमभक्त श्रीसंत कोलबाजी महाराज दरवर्षी पंढरपूरची वारी करून पांडुरंगाचे दर्शन घ्यायचे. त्यानंतर वृद्धापकाळाने कोलबाजी महाराज पंढरीची वारी करून शकले नाही याची खंत त्यांना वाटु लागली. ते विठ्ठलाचे परमभक्त असल्याने पांडुरंगाला आपल्या परमभक्ताची चिंता वाटायला लागली.अशा परिस्थितीत पांडुरंग श्रीसंत कोलबाजी महाराज यांच्या स्वप्नात येऊन पांडुरंगाने सांगितले की हे माझ्या परम भक्ता तु माझ्यापर्यंत येवू शकत नाही हे मला समजते. त्यामुळे मी स्वतः तुझ्या भेटीसाठी धापेवाड्याला येत आहे. असे पांडुरंगाचे बोलने ऐकुण श्रीसंत कोलबाजी महाराजांनी स्वतःला धन्य मानले व पांडुरंग धापेवाडास्थित चंद्रभागेच्या काठाच्या विहीरीत स्वयंभू विठ्ठलमूर्तीच्या रूपात गुरूपौर्णिमेच्या दुसऱ्या दिवशी म्हणजे आषाढी पौर्णिमेच्या प्रतिपदेला प्रकट झाले, अशी आख्यायिका आहे.

# पंढरीची वारी आहे माझे घरी...

**पंढरीची वारी आहे माझे घरी ।। आणिक न करी तीर्थवृत्त ।।**

पंढरपूरच्या पांडुरंगाची ' आषाढी वारी ' जगप्रसिद्ध आहे.प्रतिवर्षी विना आमंत्रण मोठ्या संख्येने भाविक जेष्ठ शुद्ध एकादशीला



ह.भ.प. आनंद महाराज काकडे

म्हणजेच आषाढी किंवा देवशयनी एकादशीला पंढरपूरला येतात वेगवेगळ्या भागातून वेगवेगळ्या संतांच्या दिंड्या जवळपास महिनाभर पायी चालून पंढरपूरला येतात.यामध्ये प्रामुख्याने महाराष्ट्र , कर्नाटक , आंध्रप्रदेश च्या भाविकांचा मोठा सहभाग असतो . त्याचबरोबर देशाच्या इतर राज्यांतून तसेच इतर देशांतून देखील बरेच लोक या वारीला येत असतात . म्हणून ही वारी कुतूहलाचा विषय ठरलेली आहे. नियमितपणे येत जात राहणे किंवा येरझार करणे म्हणजेच " वारी " होय. " पंढरीसी जारे आल्यानो संसारा ।दिनाचा सोयरा पांडुरंग । ।" हाच उपदेश शिरोधार्य मानून " गात जा गा गात जा गा ।प्रेम मागा विठ्ठला । । " या एकमेव नियमाचं पालन करत " ज्ञानोबा तुकाराम " च्या जयघोषात हे वारकरी अगदी आनंदाने गात , नाचत , भारूड , फुगड्या तसेच विविध खेळ खेळत रात्रीस कीर्तन करत शेकडो मैलांच अंतर अगदी बेमालूमपणे पार करतात .

पौराणिक कथांचा विचार केला असता असे लक्षात येते की देवासूर संग्रामाच्या पार्श्वभूमीवर आषाढ शुद्ध एकादशी या तिथिला एका शक्तीचा जन्म झाला आणि याच शक्तीच्या जोरावर देवतांचा विजय झाला. म्हणजेच थोडक्यात दुर्जन शक्तीवर सज्जन शक्तीने मिळविलेल्या विजयाचे प्रतीक म्हणजेच आषाढी एकादशी होय. देवशयनी एकादशी असे देखील या एकादशीस संबोधले जाते. कारण अशी मान्यता आहे की या दिवसापासून भगवान थकवा घालवण्यासाठी क्षीरसागरात संपूर्ण चातुर्मास योग निद्रेस जातात. या करिताच या एकादशीस "देवशयनी एकादशी " असे म्हणतात. म्हणूनच वारकरी संपूर्ण चातुर्मास पहाटेच्या काकड आरतीच्या माध्यमातून देवाला झोपेतून उठण्याची विनंती करतात . हे या दिवसाचे महत्त्व आहे. म्हणूनच आषाढी वारी ही सर्वाधीक महत्त्वाची समजली जाते.

वारी ही पंढरपूरचीच असते असे नाही तर छत्तिस कोटी म्हणजेच १२ आदित्य , ११ रूद्र , ८ वसू आणि २ अश्विनीकुमार अशा छत्तिस प्रकारच्या सर्व देवीदेवतांची वारी असते. तसेच आजकाल बुवा बाबांच्या देखील वार्या केल्या जातात. परंतु पंढरपूरच्या आषाढी वारीचे अनन्यसाधारण महत्त्व हे त्रिकालाबाधीत आहे.

पंढरपूरच्या अस्तित्वाचा नेमका काळ ठरविता येणार नाही

***जेंव्हा नव्हते चराचर ।तेंव्हा होते पंढरपूर । ।जेंव्हा नव्हती गोदा गंगा ।तेंव्हा होती चंद्रभागा । ।***

अशी वारकरी सांप्रदायामध्ये मान्यता आहे . इ . स . ५१६ पासून पंढरपूराचे विविध नावांनी लिखित पुरावे सापडतात . " पुंडलिका भेटी परब्रम्ह आलेगा ।चरणी वाहे भिमा उद्धरी जगा । । " थोर मातृ पितृ भक्त पुंडलिकाच्या भेटीसाठी भगवान पंढरपूरात आले ते नेहमीसाठीच . अशी वारकरी सांप्रदायामध्ये मान्यता आहे.
हीच इथल्या शिकवण आहे . धर्म, वंश, वर्ण, जात, लिंग , योनि असा कुठलाही भेद वारकरी सांप्रदायामध्ये मानला जात नाही . पंढरपूरात देवाच्या अगोदर चोखोबाराय , नामदेवराय आणि कान्होपात्रेचं दर्शन घेतलं जात . भगवान पांडुरंग स्वतः संत जनाबाई या नामदेवरायांच्या दासीला दळन दळू लागतात , चोखोबारायांच्या पत्नी सोयराबाईंचे बाळंतपण करतात , सज्जन कसायास मांस विकू लागतात तर सावतोबांस खुरपू लागतात , गोरोबांस मडकी घडवू लागतात तर नरसी मेहत्याची हुंडी भरतात.जगाच्या पाठीवर कुठेही अशी समरसून जाणारी विविधतेतील एकता पहावयास मिळणार नाही . म्हणूनच उत्तर भारतातील सर्व संतांनी देखील वेळोवेळी पंढरपूरच्या वारीला आल्याचे पुरावे सापडतात . संत कबीरांनी देखील पंढरपूरच्या वारीचा आनंद घेतल्याचे पहावयास मिळते .

***चंद्रभागा बालबंटपर कबीरा धूम मचायी ।संत महंत की हो गई गरदी भजन कुटाई खूब खाई । । "यावरून वारीतील समता ही प्रकर्षाने जाणवते . "गौळियांची ताकपिरे ।कोण पोरे चांगली । । "परंतु त्याना देखील भगवंत "याल तरी यारे लागे ।अवघे माझ्या मागे मागे । । "अशी हाक देतात . आपल्या अर्धोन्मिलित डोळ्यांतून भगवान माझ्या नजरेरेच्या टप्यात येण्याइतपत जे जे माझ्या जवळ येतील त्या सर्वांचा मी उद्धार करीन असे आश्वासनच जणू देत आहेत असा भास होतो.समदृष्टी हे भगवान पांडुरंगाचे स्वभाव वैशिष्ट्य आहे . तुकोबाराय "समचरणदृष्टि विटेवरी साजिरी "या शब्दांत पांडुरंगाच्या मुर्तीच वर्णन करतात . त्या भगवान पांडुरंगाच केवळ डोळे भरून दर्शन व्हाव एवढी एकच अपेक्षा घेऊन प्रत्येक वारकरी हा पंढरपूरला जात असतो. "डोळे भरोनिया पाहिन तुझे मुख ।हेचि मज सूख देई देवा । ।*** "एवढीच माफक अपेक्षा इथं येणाऱ्या वारकर्याची असते .

वारीच्या इतिहासाचा विचार केला असता , जेंव्हापासून पंढरपूर तेंव्हापासून वारी असेच म्हणावे लागेल . कारण जेवढे संत आपल्याला पहावयास मिळतात त्या सर्व संतांच्या कुळामध्ये पंढरपूरची वारी ही परंपरागत सेवा याच रूपात चालत आलेली आहे.त्यामुळे अमुक एका संतांनी अमुक एका दिवशी वारीची सुरूवात केली असे म्हणता येणार नाही.

संत ज्ञानेश्वर महाराजांचे आजोबा गोविंदपंत कुलकर्णी यांच्या घराण्यात पंढरपूरची वारी ही परंपरेन चालत आलेली होती.
तीच माऊलींनी पुढे चालू ठेवली . तसेच जगद्गुरू तुकोबारायांचे दहा पिढ्या अगौदरचे पूर्वज विश्वंभर बाबा हे थोर भगवद्भक्त होते. त्यांच्या साठीच भगवान पांडुरंग हे देहूस आले. या विश्वंभर बाबांचे वडिल निवर्तल्यानंतर पंढरपूरची वारी बंद पडू नये म्हणून त्यांच्या मातोश्रींनी आठवण करून दिली की आपल्याला कुळामध्ये पंढरपूरच्या पांडुरंगाच्या वारीची सेवा परंपरेने वाडवडिलांपासून चालत आलेली आहे तरी ती बंद पडू देवू नकोस अशी नोंद महिपतीबाबा ताहराबादकर यांच्या साहित्यात आढळते ती पुढीलप्रमाणे -

**"तो विश्वंभराची माता जाण ।पुत्रासी देते आठवण ।आता पंढरीसी जावयाकारणे ।सिद्ध होणे सत्वर । । तुझ्या वडिलोंवडिली निर्धारी । चालविली पंढरीची वारी ।त्यासी सर्वथा अंतर न करी ।तरीच संसारी सुफळपण । ।"हीच वारी** विश्वंभर बाबांच्या काळात नेटाने सुरू राहिली. आणि जेंव्हा विश्वंभरबाबांना वार्धक्यामुळे वारी करणे अशक्य होऊ लागले तेंव्हा स्वतः भगवान पांडुरंग देहूगावात अवतरले. वरील विवेचनावरून वारीची प्राचीनता आपल्या लक्षात येईल . या वारीमध्ये काळानुसार राजकीय , भौगोलिक कारणांवरून वेळोवेळी अडथळे जरी येत राहिले असले तरी वारी बंद पडली नाही . त्यानंतर संत ज्ञानोबाराय आणि नामदेवराय यांनी देशभरातील संतांना एकत्र करून वारकरी सांप्रदायाची स्थापना केली आणि वारीला सामाजिक स्वरूप यायला खर्या अर्थाने सुरूवात झाली.

संत ज्ञानेश्वर महाराजांनी उघडपणे

***"सर्व सुखाचे आगर ।बाप रखुमा देवीवर । । "***

या शब्दांत सांगितले की तुम्हाला जर सुखाची अपेक्षा असेल तर पंढरपूर शिवाय पर्याय नाही. कारण पूर्ण जगातील सुख हे पंढरपूरात एकवटलेलं आहे. म्हणून पंढरीची वारी करा आणि जे जे सोबत येतील त्यांना घेवून पंढरपूरला जाण्यास सुरूवात केली.

जगद्गुरू तुकोबारायांनी हीच वारी पुढे चालू ठेवली . माऊलींच्या पादुका सोबत घेऊन देखील तुकोबांनी वारी सुरू ठेवली.
तुकोबारायांच्या नंतर राजकीय अराजकतेमुळे वारीत खंड पडला परंतु पुढे त्यांचे थोरले चिरंजीव नारायण महाराज एकाच पालखीत ज्ञानोबाराय व तुकोबाराय यांच्या पादुका ठेवून " ज्ञानोबा तुकाराम " च्या गजरात पंढरपूरास येत असत. बर्याच काळापर्यंत असा संयुक्त पालखी सोहळा होता. याला छत्रपती संभाजी महाराजांनी संरक्षण दिले होते. पुढे समाज वाढत गेला आणि दोन्ही पालखी सोहळे वेगवेगळे निघायला लागले तरी नियमाप्रमाणे तुकोबारायांची पालखी एक दिवस अगोदर निघते.

तुकोबारायांचा सोहळा पुढे परंपरेने चालत राहिला आणि माऊलींचा सोहळा हैबतबाबा आरफळकर यांनी औंध संस्थानाकडून मदत घेऊन मोठ्या स्वरूपातील सोहळ्यास सुरवात केली. त्यानंतर अंकलीचे सरदार शितोळे यांच्या मदतीने सोहळा पुढे चालू ठेवला. आजतागायत ही सेवा सुरू आहे.
एक एका संतांनी आपल्या कुळाची परंपरा म्हणून पुढे चालू ठेवलेली ही वारी आज कोटी कुळांची परंपरा होत असताना आपण प्रत्यक्ष पहात आहोत.इतकी प्राचीन आणि इतक्या विशाल स्वरूपात चालणारी ही एक जगाच्या इतिहासातील आश्चर्यच आहे. असे म्हणावे लागेल . ही वारी मराठी माणसाच्या अंतःकरणात इतकी खोलवर रुजली आहे की ती वारकरी सांप्रदायाची प्रमुख उपासनापद्धतीच बनली आहे. " वाढावया सूख भक्तिभाव धर्म । कुळाचार नाम विठोबाचे । । " हा संतांचा उद्देश खर्या अर्थाने सफल झाला असून आज वारी हा महाराष्ट्राचाच कुळाचार झाला आहे. अशा या महानतम् सांप्रदायाचे पाईक होण्याचे भाग्य आपल्याला लाभले आहे.म्हणून आपण खरोखरीच धन्य आहोत .




# कोणाही जीवाचा न घडो मत्सर...

वारकरी संतांनी जात, धर्म, लिंग, वंश या पलिकडे जाऊन माणूस म्हणून सर्वांना एक झाले पाहिजे, अशी शिकवण दिली. त्यातूनच सर्व जाती- धर्मांच्या संतांनी एकत्र येऊन वारकरी परंपरा समृध्द केली. वेगवेगळ्या वातावरणात वाढलेले, वेगवेगळी संस्कृती असलेले, वेगवेगळ्या सामाजिक स्थरातून आलेले, वेगवेगळी आर्थिक परिस्थिती असलेले संत एकत्र आले. या संतानी पाहिलेल्या समताधिष्टित समाजाचे देखणे रूप आपल्याला पंढरपूरला जाणा-या विविध संतांच्या आषाढीच्या पालखी सोहळ्यात पहायला मिळते. ज्ञानेश्वर महाराज, तुकाराम महाराज आदी संतांच्या पंढरपूरच्या दिशेने निघालेल्या दिंड्यामध्ये सुमारे चार - पाच लाख लोक सहभागी झालेले असतात. या सहभागी झालेल्यांमध्ये कुणी कुणाला जात विचारीत नाही, कुणी कुणाला धर्म विचारित नाही, कुणी कुणाला कोणत्या भागातून आला आहेस हे विचारित नाही, कुणी कुणाला गरीब आहेस की श्रीमंत आहेस म्हणून विचारित, कुणी कुणाला त्याचे पद विचारित नाही. कुणी कुणाला स्त्री किंवा पुरुष आहे म्हणून वेगळी वागणूक देत नाही. मंत्रालयात मंत्रीपदावर बसलेले मंत्री आणि त्यांच्याच कार्यालयात असणारा सफाई कामगार किंवा शिपाई एकाच दिंडीत चालतात. एकाच पंगतीला बसतात. 22 ते 30 दिवसांच्या प्रवासात. ( काही संतांच्या दिंड्या 22 दिवसांत पोहचतात तर काही दूरवरून येणा-या संतांच्या दिंड्याना 30 दिवसांपर्यंतचा कालावधी लागतो. ) कोणत्याही यंत्रणेत पोलिसांना हस्तक्षेप करावा लागत नाही. अलिकडे 31 डिसेंबरच्या मध्यरात्री महानगरामध्ये नववर्ष साजरे केले जाते. मुंबईत लोक समुद्र किणारी एकत्र येऊन नववर्षाचे स्वागत करतात. त्यावेळी अनेकजणांनी मद्यपान केलेले असते. नववर्षाचे स्वागत करण्यासाठी पाच पन्नास हजार लोक दोन-तीन तास एकत्र येतात तर तेथे बंदोबस्तासाठी शेकडो पोलिसांना तैनात करावे लागते. गेट वे ऑफ इंडिया, जुहू, शिवाजी पार्क, गिरगाव हे समुद्र किनारे ज्या पोलीस ठाण्याच्या हद्दीत येतात त्या प्रत्येक पोलीस ठाण्यात 31डिसेंबरच्या रात्री आणि 1 जानेवारीच्या पहाटेपर्यंत पंचवीस-तीस तरी गुन्हे दाखल होतात. 100 तक्रारी येतात. त्यात चोरी आणि विनयभंगाच्या तक्रारीचे प्रमाण मोठे असते. म्हणजे केवळ पाच पन्नास हजार लोक दोन-तीन तास एकत्र आले तर शे-दिडशे गुन्हे दाखल होतात. मात्र चार ते पाच लाख लोक सलग 22 दिवस एकत्र प्रवास करतात, एकत्र मुक्काम करतात. या काळात अनेक महिला उघड्यावर आंघोळ करतात. पण या काळात एकही गुन्हा दाखल होत नाही. एकही माता-भगिनी माझ्याकडे कुणी वाईट नजरेने पाहिले, चूकीचा स्पर्श केला अशी तक्रार करीत नाही. दिंड्याना जो क्रम लाऊन दिलेला आहे, तो क्रम कुणी बदलत नाही. एक शहर रोज आपला मुक्काम बदलत. रोज नव्या मुक्कामी बाजार भरतो. या बाजारात या बाजारात हिंदू स्त्रीयांचे सौभाग्य लेणे असणा-या बांगड्या, कुंकवाची दुकाने मुस्लिम दुकानदार लावतात. तिथे कुणाला त्यांचा धर्म दिसत नाही. कशाच्या बळावर हे सगळं इतकं सहज आणि सुरळीत चालत. ते बळ आहे बंधुत्वाचं. प्रेमाची, जिव्हाळ्याची आणि बंधुत्वाची भावनाच 22 दिवस एकमेकांच्या माणुसपणाला सन्मान देत वाटचाल करते. माणूसपणाला उन्नत करण्याची भावना ही बंधुत्वातून निर्माण होते. म्हणूनच महामानव, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी समता, स्वातंत्र्याबरोबरच बंधुत्वाचा समावेश संविधानाच्या प्रास्ताविकेत केला आहे.
संविधानाचा मसुदा तयार करताना, प्रस्ताविकेची मांडणी करताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी बंधुत्वाला विशेष महत्त्व दिले आहे. म्हणूनच संविधान सभेतील आपल्या शेवटच्या भाषणात त्यांनी बंधुत्वाचे महत्व विशेषत्वाने पटवून देण्याचा प्रयत्न केला आहे. भारतीय संविधानाचा पाया असणारे समता, स्वातंत्र्य आणि बंधुत्व या मूल्यांचा एकसंघपणाच लोकशाही बळकट करील, असा विश्वास डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना वाटत होता. समता, स्वातंत्र्य आणि बंधुत्व यांच्या परस्पर एकसंघतेची गरज प्रतिपादित करताना बाबासाहेब म्हणतात, सामाजिक लोकशाही म्हणजे काय ? तो एक जीवन मार्ग आहे, जो स्वातंत्र्य, समता आणि बंधुता यांना जीवनतत्वे म्हणून मान्यता देतो. स्वातंत्र्य, समता आणि बंधुता ह्या तत्वांचा एका त्रयीची स्वतंत्र अंगे म्हणून विचार करता येणार नाही. ते त्रयीचा एक संघ निर्माण करतात, ते या अर्थाने की, त्यापैकी एकाची दुसऱ्यापासून फारकत करणे म्हणजे लोकशाहीचा मूळ उद्देशच पराभूत करणे

ही



ह.भ.प.शामसुंदर महाराज सोन्नर

होय. समतेपासून स्वातंत्र्य वेगळे करता येत नाही. समतेशिवाय स्वातंत्र्य म्हणजे काही लोकांचे बहुतांश लोकांवर प्रभुत्व निर्माण करणे होय; स्वातंत्र्याशिवाय समता वैयक्तिक कर्तृत्वाला मारक ठरेल. बंधुत्वाशिवाय स्वातंत्र्य आणि समता स्वभाविकरित्या आस्तित्वात राहणार नाहीत, त्यांच्या अंमलबजावणीसाठी पोलिस यंत्रणेची गरज भासेल. बंधुत्व म्हणजे नेमके काय हे स्पष्ट करताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, जर भारतीय लोक एक असतील तर सर्व भारतीयांमध्ये बंधुत्वाची समान भावना असणे हे होय. हे तत्व सामाजिक जीवनाला एकता आणि एकजिनसीपणा प्राप्त करुन देते. वारीत दिसणारा बंधुत्वाचा अविष्कार जेव्हा समजात रुजेल तेव्हा ख-या अर्थाने लोकशाही साकार झाली, असे म्हणता येईल.
पालखी सोहळ्यात संत वचनांचा सतत जागर होतो. त्यातूनच बंधुत्व प्रत्येकाच्या कृतीतून पाझरते. बंधुत्व-बंधुत्व म्हणजे तरी काय ? तर प्रत्येकाच्या मनात परस्पर प्रेम, जिव्हाळा निर्माण होणे. संत परंपरेने प्रेमाचाच जागर केला आहे. प्रेमापुढे इतर कशाचीही अपेक्षा संतानी केलेली आहे. संत भगवंताकडेही प्रेमाचीच मागणी करतात.

***प्रेम सूख देई प्रेम सुख देई। प्रेमावीन नाही समाधान ॥***

खरं तर सगळीकडे ज्ञानाची अपेक्षा केली जाते. मात्र संत प्रेमाच्या भक्तीत ज्ञान आडवे येत असेल तर ते ज्ञान नाकारून प्रेमाची अपेक्षा करतात. ***भक्ती प्रेमावीन ज्ञान नको देवा। अभिमान नित्य नवा तयामाजी ॥*** बरं आपण प्रेमाची मागणी करत असताना ज्या भगवंताला अधिष्ठान मानून त्याच्या भक्तीच्या आधारे बंधुत्वाची रुजवात करायची आहे, तो भगवंतही प्रेमासाठीच भुकेलेला आहे. याची जाणीव संत करून देतात. किंबहुना तो भगवंत प्रेमासाठी भुकेला असल्याचे तुकाराम महाराज सांगतात -

***थोर प्रेमाचा भुकेला। हाचि दुष्काळ तयाला।***

हाच प्रेमाचा विचार संत साहित्यातून पाझरत राहिला. प्रचंड बळाचा वापर करून एखादी दुष्ट शक्ती मोठा विनाश करते. मात्र तीच शक्ती प्रेमात पडली तर आपले बळ विसरून त्या प्रेमाशी इतकी एकरूप होते की कोवळ्या बंधनातही अडकून राहते, हे पटवून देण्यासाठी तुकाराम महाराज भुंग्याचे उदाहरण देतात.

**नाही कास्टाचा गुमान। गोवी भ्रमरा सुमन॥**

मोठ मोठी लाकडे भुंगा सहज पोखरून काडतो. मात्र तोच भुंगा कमळाच्या फुलाच्या मकरंद सेवनात दंग होतो. सूर्य मावळल्यानंतर कमळाच्या पाखळ्या मिटतात आणि भुंगा अडकून पडतो. जो भुंगा मोठमोठे लाकडं कोरतो, तो भुंगा कमळाची कोवळी पाखळी पोखरू शकत नाही. याचे कारण देताना तुकाराम महाराज म्हणतात-

***प्रेम प्रितीचे बांधले। ते न सूटे काही केले।***


प्रेमाची ही ताकद आहे. समाजातील द्वेष, मत्सर हे बंधुत्वामुळेच दूर होऊ शकतात. अशा बंधुत्वाचा सर्वोत्कृष्ट अविष्कार आपल्याला ज्ञानेश्वर महाराज यांच्या पसायदाना मधून पहायला मिळतो. ज्ञानेश्वर महाराज यांचे पसायदान जवळपास सर्व मराठी येणाराला माहिती आहे. मग ती व्यक्ती धार्मिक असो अथवा नसो. पसायदान हे ज्ञानेश्वर महाराज यांच्या भावार्थ दीपिका अर्थात ज्ञानेश्वरी या ग्रंथातील समारोपाच्या ओव्या आहेत. ग्रंथ लिहून पूर्ण झाल्यानंतर विश्वात्मक देवाकडे जे मागणे ज्ञानेश्वर महाराज यांनी मागितलेले आहे, ते मागणे म्हणजे पसायदान आहे. खरं तर ज्ञानेश्वरी हा काही स्वतंत्र ग्रंथ नाही. ते गीतेवर केलेले भाष्य आहे. संस्कृत 700 श्लोकाचे स्पष्टीकरण करण्यासाठी ज्ञानेश्वर महाराज यांनी 9000 ( नऊ हजार ) ओव्या मराठीतून लिहिल्या. मात्र गीतेमध्ये जो विचार आलेला आहे, त्याच्याहीपेक्षा बंधुत्वाचा उन्नत्त विचार पसायदानामध्ये आलेला आहे. गीतेमध्ये भगवान श्रीकृष्ण सांगतात- मी साधूचं, सज्जनाचं रक्षण करण्यासाठी आणि धर्माची संस्थापना करण्यासाठी प्रत्येक युगात आवतार घेतो. भगवंत सज्जनांचे रक्षण करण्यासाठी दुर्जनांचा विनाश करतात. परित्राणाय साधूनां

***विनाशाय च दुष्कृताम् । धर्मसंस्थापनार्थाय सम्भवामि युगे युगे ॥*** म्हणजे गीतेचे तत्वज्ञान काय आहे ? तर सज्जनांचे रक्षण आणि दुर्जनांचा नाश करणे. पण त्याच गीतेवर भाष्य केल्यानंतर ज्ञानेश्वर महाराज जेव्हा पसायदान मागतात, तेव्हा त्यात कुणाचाच नाश करण्याचा विचार करीत नाही. दुर्जनांना मारायचे नाही, तर त्यांच्यामध्ये असलेला दुष्ट विचार संपवून त्यांचे मन सदविचारांमध्ये रत करायचे. दुष्ट विचार संपून सुविचारांची रुजवात झाली तर प्रत्येक माणसाचेच नाही तर प्रत्येक जीवाचे परस्परावर प्रेम वृद्धींगत होईल, हे सांगताना ज्ञानेश्वर महाराज म्हणतात-

***जे खळांचि व्यंकटी सांडो। तया सत्कर्मी रती वाढो।***
***भुता परस्परे पडो। मैत्र जिवांचे॥***

# वारी: द्वेत अद्वैताचा सोहळा

वारी म्हणजे महाराष्ट्रातील विविध गावांपासून सुरू होऊन पंढरपूर येथे संपणारी सामुदायिक एक पदयात्रा होय.वारी ही महाराष्ट्रातील एक धार्मिक व सांस्कृतिक परंपरा आहे.ही वारी आषाढ



शशिकांत कुलथे
बीड

आणि कार्तिक महिन्यातील शुद्ध एकादशी अशा दोन्ही वेळा होते. आळंदी येथून संत ज्ञानेश्वर यांच्या पादुका आणि देहू येथून संत तुकाराम यांच्या पादुका पालखीत ठेवून ती पालखी रथातून पंढरपूर येथे मार्गस्थ होते. संत ज्ञानेश्वर, संत एकनाथ, संत तुकाराम हे वारकरी संप्रदायातील महत्त्वाचे संत होत. वारकरी संप्रदायात लहान मोठा हा भेद नाही. तसेच नामजपाने पुण्य मिळते हा भाव आहे. एकादशी आणि इतर पवित्र दिवशी नित्यनेमाने पंढरपूरला जाणे म्हणजेच वारी होय. जो नियमित वारी करतो तो वारकरी. वारकरी जो धर्म पाळतात त्याला वारकरी धर्म असे म्हणतात. वारकरी धर्मालाच भागवत धर्म म्हटले जाते. 'पंढरीचा वास, चंद्रभागेस्नान, आणिक दर्शन विठोबाचे' या इच्छेपोटी वारकरी वारी चुकवत नाहीत, अशी भागवत संप्रदायाची धारणा आहे. त्यामुळेच आषाढी वारी ही प्रत्येक वारकरी महिलापुरुषांच्या मनात आदराचे आणि श्रद्धेचे स्थान बाळगून आहे असे मानले जाते.पायी केल्या जाणाऱ्या पंढरीच्या वारीची परंपरा बरीच जुनी आहे. तेराव्या शतकात ही परंपरा असल्याचे उल्लेख सापडतात. संतश्रेष्ठ ज्ञानदेवांच्या घराण्यात पंढरीच्या वारीची परंपरा होती. त्यांचे वडील वारीला जात असल्याचा उल्लेख आढळतो. ज्ञानदेवांनी भागवत धर्माची पताका खांद्यावर घेऊन सर्व जातीपातींच्या समाजाला एकत्रितपणे या सोहळ्यात सामील करून घेतले.हेच व्यापक स्वरूप जपत पुढे एकनाथ महाराज, तुकाराम महाराज, मल्लप्पा वासकर यांसारख्या संतांनी वारीची परंपरा चालवली. संत तुकाराम महाराज यांच्याही कुटुंबात वारीची परंपरा होती.

हा संप्रदाय नेमका केव्हा उगम पावला, हे सांगता येत नाही. संत बहिणाबाईनी ( १६२८-१७०० ) 'संतकृपा जाली ।इमारत फळा आली' ह्या आपल्या प्रसिद्ध अभंगात म्हटले आहे,

***ज्ञानदेवें रचिला पाया ।उभारिले देवालया***
***नामा तयाचा किंकर ।तेणे रचिले तें आवार***
***जनार्दन एकनाथ ।खांब दिधला भागवत***
***तुका जालासे कळस ।भजन करा सावकाश***

तथापि पंढरपूरची वारी ही ज्ञानदेवांच्या पूर्वीही चालू होती, असे दिसते. ज्ञानदेवांचे वडील बरीच वर्षे पंढरीची वारी करीत असत, असे म्हटले जाते. पंढरपूर येथे विठ्ठलाचे देवस्थान केव्हापासून अस्तित्वात आले ह्याचा निश्चित निर्णय होऊ शकला, तर ती बाब वारकरी सप्रंदायाच्या आरंभाचा काल निश्चित करण्यास साहाय्यभूत होऊ शकेल, आईवडिलांची परमभक्ती करणाऱ्या पुं डलिकाच्या भेटीसाठी वैकुंठीचा देव पंढरपूरला आला, तेव्हा पुं डलिक आईवडिलांची चरणसेवा करीत होता, ती पुर्ण होईतो देवाने थांबावे, अशी विनंती त्याने केली आणि देवाला उभे राहण्यासाठी एक विट फेकली. ह्याच विटेवर कटी कर ठेवून देव विठ्ठलरूपाने उभा राहिलेला आहे, अशी सर्व संतांची श्रद्धा आहे. श्रीविठ्ठलाच्या कमरेवर हात ठेवण्याचे स्पष्टीकरण असे देतात, की भवसागर हा कमरेइतक्या पाण्यातून तरून जाता येईल इतका सोपा आहे, असे आश्वासन पांडुरंग आपल्या भक्तांना देत आहे. श्रीविठ्ठल पंढरपुरात कसा प्रकट झाला, ह्यासंबंधीची पुंडलिकाशी संबंधित अशी कथा हेमाद्रीपूर्व स्कांद पांडुरंगमाहात्म्यात आलेली आहे, परंतु अभ्यासकांनी खूप धडपड केल्यानंतरही हा पुं डलिक त्यां ना इतिहासात सापडलेला नाही. त्यामुळे विठ्ठलमंदिराच्या उभारणीचा कालनिर्णय करण्यासाठी पुंडलिकाची कथा उपयोगी पडत नाही . पंढरपूरची तीन संस्कृत स्थळपुराणे आज उपलब्ध आहेतः अधिष्ठान त्यांनी प्राप्त करून दिले, तसेच त्यांच्या रूपाने ह्या संप्रदायाला चैतन्याचा एक महास्त्रोत येऊन मिळाला, असा घेता येईल. वर्णाश्रमधर्माच्या चिवटपणाचा अत्यंत कटू अनुभव ज्ञानेश्वरांना, त्यांच्या आईवडिलांना आणि भावं डांना आलेला होतो. समाजाने झिडकारणे किती दुःखद असते, ह्याचा अनुभव ह्या सर्वांनी घेतला होता आणि ह्यातूनच समाजातील शुद्रातिशूद्रांबद्दल त्यांच्या मनात अपार करूणा निर्माण झाली. वारकरी संप्रदायाला प्रमाणभूत असलेला आणि 'ब्रह्मविद्येचा सुकाळू' करणारा ज्ञानेश्वरी हा ग्रंथ त्यांनी सर्वांसाठी मराठी भाषेत लिहिला. अध्यात्मविद्या ही काही मूठभरांची मक्तेदारी नसून सामान्यांतला सामान्य माणूसही ती आत्मसात करू शकतो, असा आत्मविश्वास त्यांनी पारंपरिक समाजव्यवस्थेच्या तळाशी असलेल्या माणसांतही निर्माण केला. ज्ञानेश्वरांची गुरूपरंपरा नाथपंथीय होती. अद्वयानंदाचे वैभव, अष्टांगयोग, दलितांच्या उद्धाराची प्रेरणा आणि देशी-मराठी-भाषेचा पुरस्कार, हा नाथपंथाचा प्रभावशाली वारसा होय. शांकर वेदान्त आणि काश्मिरी शैवमताचे संस्कारही त्यांच्यावर होते. तथापि ह्या संस्कारांतून त्यांनी स्वतःचा स्वतंत्र जीवनाविषयक दृष्टिकोण निर्माण केला. ज्ञानदेवांचेच समकालीन नामदेव हे वारकरी पंथाचे आद्य प्रचारक होत. महाराष्ट्राबाहेरही त्यांचा शिष्यपरिवार निर्माण झाला. ज्ञानेश्वरांनी वारकरी संप्रदायाला तत्वज्ञानाचा भक्कम पाया मिळवून दिला. नामदेवांची भूमिका तत्वचिंतकाची नसली, तरी लडिवाळ लेकराने मातेवर प्रेम करावे, तशी ईश्वरभक्ती करण्याचा आदर्श त्यांनी निर्माण केला. ज्ञानदेव-नामदेवांनी बहुजनसमाजा च्या आध्यात्मिक आकांक्षांना जागे केले. त्या समाजातील माणसांना आत्माविष्काराची वाट मोकळी करून दिली.

# सामाजिक न्याय संघर्ष समितीचा भव्य एल्गार मोर्चा

## बौद्ध, मातंग, चर्मकार, आदिवासी जमातीवरील जातीवाचक अन्याय बंद करा

आधुनिक केसरी न्यूज

**मंठा :** राजर्षी छ.शाहू महाराज यांच्या जयंतीचे औचित्य साधून मंठा तालुक्याच्या सामाजिक न्याय संघर्ष समितीच्या वतीने डॉ.बाबासाहेब आंबेडकर 'यांच्या विचारासाठी एक दिवस समाजासाठी' हे घोषवाक्य घेऊन भव्य एल्गार मोर्चा चे आयोजन करण्यात आले होते. मंठा तालुक्यातील बौद्ध, मातंग, चर्मकार,आदिवासी समाज चाळीस वर्षापासून कसत असलेल्या गायरान जमिनीचे पट्टे १९९१ च्या शासन निर्णयानुसार कसणारांच्या नावे करण्यात यावेत.

तीन पिढ्यांपासून इथला गायरानधारक माणूस गायरान जमिनीचे पट्टे नावावर करण्यासाठी धरणे धरतोय, मोर्चे, आंदोलने करतोय; परंतु आजपर्यंत या गरीब कष्टकरी गायरान धारकांची कोणत्याच सरकारने दखल घेतलेली नाही, हा तीस वर्षापासून भिजत ठेवलेला गायरान जमीन धारकांचा प्रश्न निकाली काढावा. तो प्रश्न आजपर्यंतच्या कोणत्याही सरकारने निकाली काढलेला नाही, खरेतर तो मुद्दाम सोडवलेला नाही, म्हणूनच बौद्ध, मातंग, चर्मकार, आदिवासी या अनुसुचित जाती-जमातीवर मुद्दामच जातीवाचक अन्याय होतोय. ही पुरोगामी महाराष्ट्राला लाजवणारी बाब आहे. हा जातीवाचक अन्याय बंद व्हावा म्हणून आजही अनुसूचित जाती जमातीच्या गरीब लोकांवर धरणे, आंदोलने, मोर्चे करण्याची वेळ येत आहे.

या मोर्चाचे नेतृत्व करणाऱ्या सर्व तरुण कार्यकर्त्यांनी आपल्या भाषणातून व घोषवाक्यातून सरकारच्या नाकर्तेपणावरही ताशेरे ओढले. शासन प्रशासनाच्या रद्दाड कार्यप्रणालीचा खरपूस समाचार घेतला. हा एल्गार मोर्चा मंठा शहरातील राजे छत्रपती संभाजीराजे चौकातून डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून पुढे छत्रपती शिवाजी महाराज चौकात मोर्चाचे रुपांतर जाहीर सभेत झाले होते. या सभेत सुरुवातीला राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून उपस्थित कार्यकर्त्यांनी पत्रकामध्ये नमूद असलेल्या विषयावर परखडपणे विचार मांडले.

दलित, अल्पसंख्यांक समाजातील लोकांना सुरक्षा देण्यात यावी. गोरगरिबांना आपल्या हक्कासाठी रस्त्यावर उतरण्याची वेळ देऊ नये. निरपराध दलितांच्या मुलांच्या हत्या, छळ होऊ नये यासाठीं सरकारने सुरक्षा व्यवस्था कडक करण्याची गरज आहे. भारतात गोरगरिब लोकांना न्याय मिळत नसेल, त्यांना सुखाने जगण्याची हमीच नसेल... तर भारत हा विश्वगुरू होणार असल्याच्या जाहिराती करणे थांबवले पाहिजे.

या मोर्चात अनेक मुद्यावर भाषणातून रोष व्यक्त करण्यात आला या भाषणातील काही मुद्यांचा सारांश इथे देत आहे. महाराष्ट्रात दलित ,आदिवासी अल्पसंख्यांक यांच्यावरील हल्ले व क्रूर पद्धतीने




खून करण्याच्या घटना सुरू आहेत. उदाहरणार्थ खैरलांजी, खेड, जातेगाव, मुंबई लातूर आणि आता नांदेड...बोंडार हवेली येथील अक्षय भालेराव याने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी का केली ? म्हणून खून करण्यात आला. असे हल्ले करण्याची हिम्मत का होते ? आमच्या समाजाबद्दल द्वेश पसरवण्याचे काम काही जातीयवादी संघटना करत आहेत व त्या द्वेषातून आज देशात मॉबलिंचिंग होत आहे. इतर धर्माबद्दल द्वेष पसरवणाऱ्या संघटना त्या सरकार पुरस्कृत आहेत. त्या संघटनांनी भिमा कोरेगावची दंगल घडवून आणली. आमच्या समाजावर भीमा कोरेगाव येथे दगडफेक करून शांतता भंग करण्याचे काम केले. त्या घटनांचे सर्व आरोपी मोकाट फिरत आहेत व ज्यांनी काहीच केलेले नाही, असे लोक सरकारने जेलमध्ये टाकले...म्हणून सरकारने तरुणाची माथी भडकावयला लावणाऱ्या संघटनावर बंदी घालून त्यांना जेलमध्ये टाकावे तरच देशात व महाराष्ट्रात शांतता निर्माण होईल.

मोर्चाचे नेतृत्व करणारे नगरसेवक अरुणभाऊ वाघमारे, भीमशक्तीचे जिल्हाध्यक्ष प्रकाश अण्णा घुले, नगरसेवक राजेश खंदारे, कॉम्रेड मारोती खंदारे, कॉम्रेड सरितााताई शर्मा, कॉम्रेड नंदकिशोर प्रधान, माजी सभापती दत्ता बनसोडे, नगराध्यक्ष बाळासाहेब बोराडे, माजी नगराध्यक्ष नितीनभैय्या राठोड, उपनगराध्यक्ष जे.के.कुरेशी, अचितनाना बोराडे, विकास सूर्यवंशी, पं.स. सदस्य, अरुणराव प्रधान, बाळासाहेब वांजोळकर, कॉम्रेड भगवान कोळे, तळणीचे सरपंच गौतम सदावर्ते, भगवान लहाने, वंचितचे सुभाष जाधव, मोहन सदावर्ते, कॉम्रेड सचिन थोरात, सुनील तुरेराव,मा.सभापती बाळासाहेब अंभिरे, सर्जेराव मगरे, ॲड अनिल मोरे, असंघटित कामगार संघटनाच्या जिल्हाध्यक्षा सौ.सारिका वरणकर, सौ.शीलाताई वाघमारे, संगीता ताई मधुकर मोरे, कासाबाई शिरगुळे, शेषाबाई जाधव, सरोदे, शिल्पा बनसोडे, यांच्या पुढाकारातून हा मोर्चा यशस्वी झाला. मोर्चात अनेक मान्यवरांची उपस्थिती होती. यामध्ये ज्येष्ठ कार्यकर्ते रंगनाथ बापू वटाणे, डॉ.धोंडोपंत मानतकर, वंचितचे भारत उघडे, भीमशक्तीचे दादाराव हिवाळे, चर्मकार संघटनेचे महादेव वाघमारे. दत्ता वाघमारे, अंबादास घायाळ, सुरेश कोळे, ॲड सिद्धार्थ अवसरमोल, सुरेश वाव्हळे, अचितराव खरात, रमेश प्रधान, कय्युमभाई कुरेशी, शगीर पठाण, रावसाहेब खरात, नगरसेवक बाजभाई पठाण, शबाबाभाई कुरेशी, शेख एजाजोद्दीन, ताहेर बागवान,व शरदराव मोरे, अच्युतराव साबळे, विष्णू अण्णा मोरे, नाना वाघमारे, नामदेव देशमाने, नितीन मोरे, रमेश आवारे यांचा सक्रीय सहभाग होता.

# पुरवठा विभागाचा हलगर्जीपणा

## रेशनधारक धान्यापासून वंचित

आधुनिक केसरी न्यूज

**बाबुराव गोणारकर**

**धर्माबाद :** शहर व तालुक्यात ५७ स्वस्त धान्य पुरवठाधारक असून १७ हजार ४४४ शिधाधारक आहेत. विद्यमान गोदामपाल यांची बदली झाली आणि ज्यांची नियुक्ती झाली तो रुजू झाला नाही या कारणाखाली मे महिन्याचा शिधाच वाटप झाला नाही.पुरवठा विभागाच्या हलगर्जीपणामुळे लाभार्थीकडून संतप्त भावना व्यक्त होत आहेत. धर्माबादच्या स्वस्त धान्य गोडाऊनचे गोदामपाल भालेराव यांची १ जूनला नायगाव येथे बदली झाली.मात्र पंचवीस दिवस उलटून गेले तरी नवा गोदामपाल रुजू झाला नाही. नवे गोदामपाल म्हणून नेहरकर ह्यांच्याकडे चार्ज देण्यात येणार असल्याची सूत्रांनी माहिती दिली. पण खरा प्रश्न हा आहे की, जर जुना गोदामपाल जाऊन एक महिना होत आला तरी नवा गोदामपाल का रुजू झाला नाही ?पुरवठा विभागाच्या गोदामपालाला दर महिन्याला वितरित धान्य व शिल्लक धान्य या संदर्भातील अहवाल वरिष्ठ अधिकारी यांना सादर करावा लागतो. पुरवठा विभागाला स्वतंत्र नायब तहसीलदार आहे या संधर्भात त्यांनी काय कारवाई केली व वरिष्ठाणा काही आवाहल सादर केले आहे का ? माहे मे चा अहवाल तहसीलदारांना सादर झाला का? जर मे महिन्याचा शिधाच वितरित झाला नाही. तर पुरवठा विभागाचे नायब तहसीलदार काय करत आहेत? जर मे महिनातले काही गावामध्ये धान्य वाटप करण्यात आले नसेल तर जून महिना चे धान्य कधी वाटप करणार याला जबाबदार

धर्माबाद तालुक्यात २४५५ अंत्योदय कार्डधारक, १०८१८प्राधान्य योजना,तर ४१७१ केशरी रेशनकार्डधारक आहेत .यातील लाभवंचित घटकांना अन्नधान्य मिळवून देण्यात नवे तहसीलदार व पुरवट्याचे नायब तहसीलदार अपयशी ठरल्यामुळे काही दिवसापूर्वीच मनसेने आंदोलनाचा इशारा दिला होता .

कोण? तसेच स्वस्त धान्य दुकादार वारंवार गोदामाचे चकरा मारून व प्रशासकीय अधिकाऱ्यांना वारंवार सांगून कुठलीच व कसल्याच प्रकारची दखल घेतल्या जात नाही. याला जबाबदार कोण ?त्याचे परिणाम सर्वसामान्य गोरगरीब कुटुंबावर होत आहेत.धर्माबाद तालुक्याचे नूतन तहसीलदार एस. के. हांदेश्वर ह्यांची प्रमोशन पूर्वी बरीच सेवा येथेच झाल्यामुळे त्यांना येथील खडा न खडा माहिती आहे.

तरी सामान्य गोरगरीब लोकांना त्यांच्या हक्काचा शिधा मिळत नसेल तर ह्यांची नेमकी काय भूमिका आहे? जर गोदामपाल रुजू होत नसल्याने धान्य वितरित होत नसेल तर जिल्हा पुरवठा विभागाकडे त्यांची तक्रार करण्यात आली का? नसेल तर त्यात काय हितसंबंध दडले आहेत? स्वस्त धान्य दुकानातुन मिळणारे राशन उशिराने मिळाल्याने अधिकारी व कर्मचाऱ्यांना काही फरक पडत नसेल पण राशनवर ज्या लोकांचा उदरनिर्वाह अवलंबून असतो.त्यांना यामुळे निश्चितच फरक पडतो.तहसीलदारांची निष्क्रियता आणि पुरवठा विभागाचा नायब तहसीलदार यांच्या हलगर्जीपणा यामुळे लाभार्थी गोरगरीब कुटुंबावर उपासमारीची वेळ आलेली आहे अशी संतप्त भावना जनतेतून व्यक्त होत आहे.

# बहुजन समाज पार्टीच्या वतीने राजर्षी शाहू महाराज महाराज यांची जयंती

आधुनिक केसरी न्यूज



**खामगाव :** रयतेचे राजे राजश्री शाहू महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली सर्वप्रथम बसपाचे मार्गदर्शक तथा ज्येष्ठ कार्यकर्ते गोपाल मेश्राम साहेब यांच्या हस्ते शाहू महाराज यांच्या प्रतिमेला हार घालून अभिवादन करण्यात आले सर्वांनी शाहू महाराजांच्या प्रतिमेला पुष्प अर्पण करून पेढे वाटण्यात आले यावेळी आरक्षणाचे जनक शाहू महाराज यांच्या बद्दल मान्यवरांनी आपले विचार व्यक्त केले शाहू महाराजांच्या कारकिर्दीत शाहू महाराजांनी हिंदू मुस्लिम जैन यांच्यासाठी शिक्षण रुपी मंदिरे बांधली शिक्षणाचा प्रचार प्रसार केला आंतरजातीय विवाह घडवून आणली शेतकऱ्यांच्या शेतीचा विकास केला अंधश्रद्धा याच्यावर जोरदार टीका केली व समाजाला विज्ञानाकडे आकर्षित करणारा राजा जातीभेद नष्ट करून सर्वांना समानतेची वागणूक देणारा राजा आपल्या राज्यात बहुजनांना आरक्षण देऊन विकास करणारा राजा राजश्री शाहू महाराज म्हणून डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी म्हटले आहे शाहू महाराजांची जयंती दिवाळी दसरा सणासारखी बहुजन समाजाने साजरी करावी असे मत मान्यवरांनी मांडले कार्यक्रमाचे अध्यक्ष गोपाल मिश्रा साहेब होते कार्यक्रमाला उपस्थित जिल्ह्याची माजी अध्यक्ष एडवोकेट डी एम भगत साहेब जिल्ह्याचे उपाध्यक्ष देवराव निंबाळकर साहेब जिल्हा सचिव आबाराव हिवराळे साहेब विधानसभा अध्यक्ष विजय वाघमारे विधानसभा उपाध्यक्ष अमोल गवांदे विधानसभा महासचिव रवींद्र वाकडे साहेब विधानसभा सचिव विकास शेगोकार साहेब उपस्थित होते. मान्यवरांनी आपले विचार व्यक्त केले.

# नांदेड खूनप्रकरणी आक्रोश मोर्चा

आधुनिक केसरी न्यूज

**लोणंद :** नांदेड जिल्ह्यातील अक्षय भालेराव या युवकाचा खून करण्यात आला होता.भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी केली.म्हणून त्याचा खून करण्यात आल्याने राज्यात या निर्घृण खुना बद्दल विविध आंबेडकर वादी संघटनांकडून आंदोलन व मोर्चा काढून निषेध व्यक्त करण्यात आला.खंडाळा येथे भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारक समिती आणि तालुक्यातील बौद्ध समाज बांधवांच्या वतीने अक्षय भालेराव खून प्रकरणी मारेकऱ्यांचा निषेध आणि त्यांना फाशीची शिक्षा व्हावी म्हणून दि.२७ जून रोजी भव्य जन आक्रोश मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी खंडाळा तालुक्यातून बहुसंख्येने सहभागी झालेल्या बौद्ध बांधवांच्या उपस्थितीत जनआक्रोश मोर्चा संपन्न करण्यात आला.रिक्षा स्टॉप ( तलाठी ऑफिस,पारगाव खंडाळा ) येथून सकाळी ठीक साडे अकराच्या सुमारास




हातात निळे झेंडे आणि पंचशील झेंडे तसेच निषेध व्यक्त करणारे आणि संविधान सन्मान करणारे फलक घेऊन पावसाच्या रिमझिम मध्ये मोर्चास सुरुवात करण्यात आली.अक्षय भालेरावच्या मारेकऱ्यांना फाशी झालीच पाहिजे या प्रमुख मागणी साठी मोर्चेकऱ्यांनी आवाज उठविला. तसेच यावेळी भारतीय संविधानाचा विजय असो, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेकरांचा विजय असो,जब तक सुरज चांद रहेगा बाबा तेरा नाम रहेगा व महापुरुषांचा जयघोष करणाऱ्या घोषणा देण्यात आल्या. संविधानावर निष्ठा,हीच प्रत्येक व्यक्तीची प्रतिष्ठा,कर्तव्य आणि जबाबदारीचे भान ठेवा जन आक्रोश मोर्चा मध्ये सहभागी व्हावे आदी फलक झळकण्यात आले होते. संविधान बचाव,देश बचाव असा नारा ही देण्यात आला.






# नूरानी मस्जीदमधील चोरी उघड

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील फर्दापूर जवळील ठाणा येथील गावातील नुराणी मज्जीत मधे काही दिवसांपूर्वी चोरी झाली होती. मा. पोलीस अधिक्षक मनिष कलवानिया यांनी जिल्हयातील चोरी करणा-याचा चोरटयांचा शोध घेवुन त्यांना जेरबंद करण्याबाबत सुचना सर्व प्रभारी अधिकारी यांना दिल्या आहेत.

यावरुन सिल्लोड उपविभागिय पोलीस अधिकारी डॉ. दिनेश कुमार कोल्हे साहेब यांनी अशा गुन्हयांचा जलद गतीने तपास करण्याबाबत मार्गदर्शन करुन गुन्हे उघडकिस आणुन अशा घटनांना आळा बसणे कामी मार्गदर्शन केले. यावरुन फर्दापुर पोलीस स्टेशनचे सपोनि भरत मोरे फर्दापूर व पोलीस कर्मचारी हे त्यांचे तपास पथकासह फर्दापुर शिवारातील ठाणा गांवामध्ये गु.र.नं. 64/2023 कलम 379 मध्ये फिर्यादी नामे अमजद उस्मान पठाण वय 30 व्यवसाय शेती व नुराणी मज्जीद ठाणा येथील अध्यक्ष रा. ठाणा ता. सोयगांव यांचे फिर्यादवरुन 23000 रुपये किंमतीची ऑटोमॅटीक नमाज टायमिंग इंडीकेटर असलेली इलेक्ट्रोनिक घडयाळ अब्दुल्लाह सलात कपंणीची व त्याच्यासोबत 6000 रुपये किमतीचे केंट केएसएल कंपणीचे वेट ऍन्ड ड्राय व्हॅक्युम क्लीनर सिल्वर येलो रंगांचे चोरी झालेली आहे म्हणुन गुन्हा नोंद करण्यात आला होता. त्यांचा तपास मध्ये सपोनि भरत मोरे व त्यांचे पोलीस पथकास गोपणीय बातमी मिळाली की, धावडा ता. भोकरधन जि. जालना येथील एक इसम नामे शेख जाकिर शेख आशक हुसेन वय 33 वर्षे रा. धावडा हयाने त्यांचे सासरी ठाणा या गांवामध्ये राहण्यास गेला असता त्या दरम्यान चोरी केली होती असी बातमी गुप्त खबऱ्या मार्फत सपोनि भरत मोरे यांना मिळाली असता एक तपास पथक धावडा ता. भोकरधन जि. जालना येथे पाठविले असता वरील इसमास अत्यंत चालाखीने ताब्यात घेवुन त्यांचे कडुन खालील वर्णणांचा 100 टक्के मुददेमाल जप्त करण्यात आला त्यांचे वर्णण खालील प्रमाणे.. 23000 रुपये किंमतीची ऑटोमॅटीक नमाज टायमिंग इंडीकेटर असलेली इलेक्ट्रोनिक घडयाळ,अब्दुल्लाह सलात कपंणीची, 6000 रुपये किमतीचे केंट केएसएल कंपणीचे वेट ऍन्ड ड्राय व्हॅक्युम क्लीनर सिल्वर व येलो रंगांचे एकुन 29 हजार रुपये किंमतीचा मुददेमाल जप्त करण्यात येऊन अटक करण्यात आली आहे. सध्या आरोपी पोलीस कस्टडी मध्ये असुन त्यांचे कडे सदर गुन्हयात त्यांचे आनखी कोणी साथीदार आहे. काय तसेच त्यांने सदर ची चोरी करुन वरील मुददेमाल कोणाला विकला होता काय यांचा अधिक तपास करणे बाकी आहे. सपोनि भरत मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली मसुद अब्दुल तडवी, निलेश लोखंडे, पंकज व्यवहारे, प्रकाश कोळी, योगेश कोळी, भरत कोळी, सतिश हिवाळे, प्रदिप बेदरकर,कल्पना चाथे, कविता चाथे यांनी केली.





# कोब्रा चावलेल्या महिलेचा डॉक्टरांनी वाचवला जीव

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** तालुक्यातील मोर्डा गावातील छोटीबाई राठोड वय 60 वर्ष यांना शेतातिल राहत्या घरी विषारी कोब्रा नाग चावल्याने प्रकृती चिंताजनक होती. त्यांना लगेचे कन्नड़ येथील पिशोर रोडवरील मल्टीस्पेशालीटी हॉस्पिटल येथे उपचारासाठी दाखल करण्यात आले डॉक्टरांनी शर्तीचे प्रयत्न करून महिलेचा जिव वाचवला यामुळे कुटुंबियान मध्ये आनंदाच वातावरण दिसुन आले. यावेळी डॉ विवेक नरखेड़े, डॉ महेश कचोळे , डॉ. राहुल पाखरे, डॉ. नम्रता कचोळे यांनी महिलेचा जीव वाचवण्यात शर्तीचे प्रयत्न केले .

# सोयगाव तालुक्यात जमीन सुपीकता जागृती दिवस

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** कृषी विभागाच्या वतीने सोयगाव तालुक्यात 25 जून पासून 1 जुलैपर्यंत कृषी विभागाकडून तालुका कृषी अधिकारी मदन सिसोदिया व मंडळ कृषी अधिकारी बनोटी संपत वाघ यांच्या मार्गदर्शनाखाली प्रत्येक गावात सप्ताहातील प्रत्येक दिवशी विषयानुसार शेतकरी बांधवांना मार्गदर्शन करण्यात येत आहे त्याचेच औचित्य साधून मौजे अंजोळा येथे आज जमीन सुपीकता जागृत दिवस असल्याने शेतकरी बांधवांना जमिनीचे दिवसेंदिवस कमी होत चाललेले जमिनीतील सेंद्रिय कर्ब हे भविष्यातील शेती उद्योगासाठी चिंतेची बाब आहे म्हणून ते वाढवण्यासाठी शेतीत शेणखत तसेच हिरवळीचे खत यांचा वापर करणे अत्यंत गरजेचं आहे. त्याचप्रमाणे रासायनिक खताचा समतोल वापर व पिकांना खत देताना वेळेनुसार पेरूनच द्यावीत. जैविक खतांचा वापर करून उत्पन्नात वाढ करता येते. तसेच पावसाळ्यात होणाऱ्या जास्त पावसामुळे काही वेळेस जमिनीचा वरचा सुपीक स्तर वाहून जातो त्यामुळे उताराला आडवी पेरणी मृत चर काढणे इत्यादी विविध विषयांवर कृषी सहाय्यक सतीश बोरसे यांनी शेतकरी बांधवांना सविस्तर मार्गदर्शन केले. कार्यक्रमाला कृषी पर्यवेक्षक प्रदीप पाटील तसेच गावाचे सरपंच ,ग्रामपंचायत सदस्य व शेतकरी बांधव उपस्थित होते.

# भाजपाचे गटनेते करीम शेख यांचा तडकाफडकी राजीनामा

## खा. चिखलीकर गटाला गळती लागल्याची लोहा शहरासह ग्रामीण भागात चर्चा

आधुनिक केसरी न्यूज

**लोहा :** राजकीय घडामोडींना वेग आला असून लोहा न.पा. तील भाजपचे गटनेते करीम शेख यांनी गटनेते पदाचा तडकाफडकी ८ नगरसेवकांच्या उपस्थित जिल्हाधिकारी नांदेड यांच्याकडे राजीनामा दिला आहे. लोहा न.पा. त भाजपचे खा. प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या नियंत्रणाखाली भाजपची सत्ता २०१८ पासून आहे.

गेल्या दिड वर्षांपासून खा. चिखलीकरांना लोहा शहरात गळती लागली असुन त्यांचा एक -एक मोहरा बाजूला सारत आहे व त्यांच्यावर नाराज होत आहे. या अगोदर लोहा शहरातील व तालुक्यातील एक डॅशिंग युवा नेतृत्व म्हणून ओळखले जाणारे माजी उपनगराध्यक्ष शरद पाटील पवार हे उपनगराध्यक्ष पदाच्या वादावरून खा. चिखलीकरापासुन दूर गेले व खा. चिखलीकरांच्या आदेशानुसार त्यांनी व्हिप धुडकावला म्हणून त्यांचे पक्ष विरोधी कारवाई करीत त्यांच्या विरोधात जिल्हाधिकारी यांच्याकडे तक्रार करून त्यांचे नगरसेवक



पद ही बडतर्फ केले. तात्कालीन उपनगराध्यक्ष शरद पाटील पवार यांच्यावर अविश्वास ठराव पारित केल्यानंतर उपनगराध्यक्ष पदासाठी लोहा न.पा. तील भाजपचे गटनेते नगरसेवक करीम शेख यांचे नाव सर्वात आघाडीवर होते लोहा शहरांच्या इतिहासात अद्याप अल्पसंख्याक मुस्लिम समाजातील व्यक्ती उपनगराध्यक्ष झाली नाही . नगरसेवक करीम शेख हे जेष्ठ नगरसेवक व कामगार नेते समाजातील नेतृत्व असल्याने लोहा शहरातील कामगारांची व अल्पसंख्याक समाजाची ही मागणी होती की करीम शेख यांना लोहा न.पा.चे उपाध्यक्ष करावे पण पाणी कुठे मुरले पता नाही व नवखे पहिल्यांदा काठावर निवडून आलेले नगरसेवक दत्ता वाले यांच्या गळ्यात तिसऱ्या टर्मसाठी उपनगराध्यक्ष पदाची माळ पडली त्यामुळे नगरसेवक करीम शेख व शहरातील अल्पसंख्याक समाज हा खा. चिखलीकरांवर प्रचंड प्रमाणात नाराज आहे. खा. चिखलीकरांना आतापर्यंतच्या लोहा - कंधारच्या निवडणुकीत अल्पसंख्याक मतदारांनी भरभरून मतदान केले . उपनगराध्यक्ष पदी नगरसेवक करीम शेख यांना डावळल्यावर नगरसेवक करीम शेख हे सुद्धा अनेक दिवस खा. प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्यावर नाराज होते. ते खा. चिखलीकरां च्या अनेक कार्यक्रमांना गैरहजर राहू लागले सोशल मीडियावरील अनेक शुभेच्छा बॅनरवर खा. प्रतापराव पाटील चिखलीकर, प्रविण पाटील चिखलीकर, प्रणिताताई देवरे यांच्या फोटो टाकणा गेले नंतर काही दिवसांनी हे प्रकरण मिटले पण करीम शेख यांच्या मनातील खदखद ही त्यांना उपनगराध्यक्ष पदासाठी डावल्यामुळे जात नव्हती. त्यानंतर ही नगरसेवक करीम शेख खा. चिखलीकरांच्या कार्यक्रमाला दांडी मारु लागले. अखेर दि. २२ जून २०२३ रोजी नगरसेवक करीम शेख यांनी त्यांच्या भाजपाच्या लोहा न.पा. तील गटनेते पदाचा तडकाफडकी राजीनामा जिल्हाधिकारी नांदेड यांच्याकडे लोहा न.पा. चे उपनगराध्यक्ष दत्ता वाले, नगरसेवक केशवराव मुकादम सह ८ नगरसेवकांच्या उपस्थित दिला. त्यामुळे तर्क वितर्क यांना लोहा शहरात उधान आले आहे.



# सक्तीची वसुली थांबवा

आधुनिक केसरी न्यूज

**परतुर :** येथील गावभागातील बाजार पेठ ही परतुर नगर परिषद हद्दीत येत असुन तेथील छोट मोठ्या व्यापाऱ्यांना जागेचा कर नगर परिषदला द्यावा लागतो . तो कर वसुल करणे करिता परतुर नगर परिषदेने जाहीर निविदेद्वारे टेंडर काउले असून एका खाजगी व्यक्तीने ते टेंडर घेतले आहे मात्र तो व्यक्ती परतुर शहरातील मुख्य बाजारपेठेसह संपूर्ण शहरातील सार्वजनीक बांधकाम विभागाच्या हद्दीतील रस्त्यांवरील स्टॉल, हातगाडे, भाजीविक्रेते यांच्याकडुण जबरिणे कर आकारत असून जंगम पैसा लाटण्याचे काम करित आहे . तसेच नवा मोंढा भागात गेल्या कित्तेक वर्षोनुवर्षोपासुन परतुर येथील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या जागेवर बाजार भरत आहे. तेथील स्तिथीही अशीच तोच खाजगी व्यक्ती तिथे दादागीरी करत प्रत्येकी व्यक्ती विस रुपये प्रमाणे सक्तीने वसुली करतो मात्र याकडे कुणीही लक्ष का देत नाही, असा प्रश्न तेथील परिसरातील नागरिकांत उपस्थित होत होता.

# आषाढीच्या पूर्वसंध्येला वैजापुरात छोट्यांनी काढली विठ्ठल दिंडी

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** उद्या शासकीय सुट्टी असल्याने आषाढी एकादशीच्या पूर्व संध्येवर बुधवार( ता, २८ )रोजी विविध शाळेतील छोट्या मुलां-मुलींनी पायी दिंडी काढली या दिंडीत छोट्या मुलां-मुलीं विठ्ठल -रुखमाई च्या वेषात तर इतर मुलं वारकरी च्या रुपात दिसून टाळ वाजवीत व विठ्ठल! विठ्ठल !!उच्चरीत होते, छोट्यांच्या चेहऱ्यावर आनंद,उत्साह, विठ्ठल नामाचा गजराने प्रसन्नता दिसून येत होती. अशाच येथील न्यू सन्मित्र कॉलोनी च्या सिंगापूर इंटरनॅशनल किड्स प्री स्कुल शाळेतील दिंडीत माजी शिक्षणाधिकारी धोंडीरामसिंह राजपूत सहभागी होऊन त्यांनी दिंडीला ध्वज दाखविला या समयी त्यांच्या समवेत डॉ.ज्योती बबन मोहन, या शाळेच्या व्यवस्थापिका बरखा पाटणी व शिक्षिका रश्मी गुप्ता,सुषमा राजपूत, कविता त्रिंभुवन उपस्थित होत्या.



# 'सफायर सेल्स कॉर्पोरेशन'च्या भव्य दालनाचे उद्घाटन

## सॅनिटरी वेअर व बाथरूम फिटिंग उत्पादनांच्या वितरणाची गोयल ब्रदर्सची ३५ वर्षांची परंपरा

आधुनिक केसरी न्यूज





**पुणे :** गेल्या ३५ वर्षांपासून सफायर सेल्स कॉर्पोरेशन प्रा. लि. बाथरूम फिटिंग, तसेच सॅनिटरी व प्लम्बिंग उत्पादनाच्या वितरणाची विश्वासार्ह सेवा पुरवत आहे. आता 'सफायर'तर्फे कोंढवा येथे बाथरूम फिटिंगसह मॉड्युलर किचन, फर्निशींग्ज आणि डेकोरेटिव्ह लायटिंग चारही प्रकारच्या उत्पादनाचे वितरण करण्यासाठी सुशोभित भव्य दालन गंगाधाम-इस्कॉन मंदिर रस्ता, कोंढवा येथे ग्राहकांच्या सेवेत दाखल झाले असून, त्याचे उद्घाटन मंगळवारी झाले. 'सफायर'चे ज्येष्ठ संस्थापक व व्यवस्थापन सदस्य श्यामसुंदर गोयल यांच्या हस्ते उद्घाटन पार पडले. यावेळी गोयल ब्रदर्सपैकी किसन गोयल, राजेंद्र गोयल व संजय गोयल यांच्यासह नव्या पिढीतील अमित गोयल, अक्षय गोयल, आदित्य गोयल, अनुज गोयल, अंकित गोयल आदी उपस्थित होते. इंटेरियर डिझायनर मिलिंद चिंगळे, प्राची जैन, हुरी मेघानी, अखिल गुजराथी, आर्किटेक्ट विपीन बोरा, रश्मी बंब यांनी उपस्थित राहून शुभेच्छा दिल्या. पुण्याच्या दक्षिण-पूर्व भागात स्थित, घराच्या उत्तम व सुंदर अंतर्गत सजावटीसाठी आवश्यक अशा वरील चारही उत्पादनांचा पुरवठा करणारे हे एकमेव असे दालन असणार आहे. या तीन मजली दालनात बाथरूम फिटिंग, मॉड्युलर किचन, फर्निशिंग्ज व डेकोरेटिव्ह लाइटिंगची डिझायनर व नाविन्यपूर्ण अशी उत्पादने ग्राहकांना मिळणार आहेत. डिझायनर सॅनिटरी वेअर, टाईल्स, वॉटर सोल्युशन, मॉड्युलर किचन, होम अप्लायन्सेस, सिंक व फॉसेट्स, आकर्षक पडदे, ब्लाइंड्स, गाद्या, कार्पेट्स, वॉलपेपर आणि डेकोरेटिव्ह व आर्किटेक्चरल लाईट्स, डिझायनर फॅन्स अशा असंख्य वैविध्यपूर्ण भारतीय व विदेशी उत्पादनांची मालिका येथे उपलब्ध असणार आहे. याबाबत सविस्तर माहिती देताना अमित गोयल म्हणाले, "शामसुंदर, किसन, राजेंद्र आणि संजय गोयल या चौघा भावांनी १९८८ मध्ये बाथरूम फिटिंगचा व्यवसाय पुण्याच्या मध्यवर्ती म्हणजे स्वारगेट भागात ३५० स्केअर फूट जागेत सुरु केला. ग्राहकाभिमुख आणि विश्वासार्ह सेवेमुळे गेल्या ३५ वर्षात यशाची अनेक शिखरे गाठत गोयल बंधूनी हा उद्योग विस्तारला आहे. ग्राहक हा केंद्रबिंदु आणि त्यांचे समाधान हा उदात्त हेतू ठेवून बांधकाम क्षेत्राला लागणारे उत्तम प्रतीचे उत्पादन वितरित केले. त्यामुळे बांधकाम क्षेत्रात बाथरूम फिटिंगच्या उत्पादनांसाठी 'सफायर'चे नाव अग्रस्थानी आहे. बाथरूम फिटिंगच्या उत्पादनांसह तीन वर्षांपासून किचन सेवा, दोन वर्षांपासून फर्निशिंग्ज, तर यंदापासून लाइटिंग उत्पादने वितरित करण्याची सेवा सुरु करत आहोत. चार विभागांतील सर्व उत्पादने ही आंतरराष्ट्रीय दर्जाची आहेत. जवळपास १० हजार स्क्वेअर फुटांचे दालन असणार आहे. उत्पादनासोबत आता आम्ही कस्टमायझेशन सेवाही पुरविणार आहोत. पुढील काळात ग्राहकांना ही विश्वासार्ह सेवा देण्यावर आमचा भर असणार आहे, असे गोयल यांनी नमूद केले.



# आषाढीनिमित्त विद्यार्थ्यांची दिंडी

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** श्री अग्रसेन महाराज प्राथमिक व बालमंदिर येथील चिमुकल्या बालकांनी विठ्ठल रुक्मिणी वारकरी यांच्या वेशभूषा करून व डोक्यावर तुळस हाती टाळ घेऊन प्रभात फेरी काढण्यात आली परिसरातील विठ्ठल मंदिरात जाऊन दर्शन घेतले अशा प्रकारे आषाढी एकादशी उत्साहात साजरी करण्यात आली. याप्रसंगी बालमंदिर मुख्याध्यापिका सौ सुनीता शिरसाट, प्राथ. मुख्या. दिनेश मोरे सर, उप मुख्याध्यापक, श्री प्रणव कोठवाल सर, सोनार मॅडम, श्रीमती साळवे मॅडम, श्रीमती गावित मॅडम, श्रीमती नगराळे मॅडम, चौधरी सर, श्री सतीश चौधरी आदी उपस्थित होते.

# शाहू महाराज जयंती निबंध स्पर्धा

आधुनिक केसरी न्यूज



**लोणंद :** मांडकी, ता.पुरंदर येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत लोकराजे छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंती निमित्ताने सत्यशोधक बहुउद्देशीय सामाजिक संस्था ( महा. राज्य ) या संस्थेच्या वतीने छत्रपती शाहू महाराज या विषयावर निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी शाळेतील सर्वच विद्यार्थ्यांनी स्पर्धेत सहभाग घेत शाहू महाराजांच्या कार्याबद्दल निबंधातून अभिवादन केले. आरव रोहित भोसले, अनुष्का नामदेव जगताप, आर्या युवराज शेजाळ आदी विद्यार्थ्यांनी अनुक्रमे प्रथम, द्वितीय, तृतीय क्रमांकाचे यश मिळविले. विजेत्या स्पर्धकांना सत्यशोधक बहुउद्देशीय सामाजिक संस्थेच्या वतीने शालेय साहित्य भेट आणि सन्मानपत्र देण्यात आले. यावेळी निबंध स्पर्धेचे नियोजन करणारे मुख्याध्यापक सुभाष बोरकर, रवींद्र पवार, मोहन दुर्गाडे, नितीन दुर्गाडे, वासंती दुर्गाडे,पल्लवी भोसले, हेमलता शेटे तसेच सामाजिक कार्यकर्ते रमजान शेख, सत्यशोधक बहुउद्देशीय सामाजिक संस्थेचे संस्थापक अध्यक्ष विशाल धेंडे, सचिव राहुल गायकवाड तसेच सर्व विद्यार्थी उपस्थित होते. या परीक्षेबद्दल शालेय प्रशासनाने समाधान व्यक्त केले.



# खाऊ वाटपाने शाहू महाराज जयंती साजरी

आधुनिक केसरी न्यूज

**कोरेगाव :** ता.फलटण येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करून छत्रपती शाहू महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली.लोणंद ता.खंडाळा येथील हॉटेल चवदारच्या वतीने विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करण्याचा उपक्रम घेण्यात आला होता. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून आप्पा ठोंबरे उपस्थित होते. विद्यार्थ्यांना खाऊ वाटप केल्या बद्दल शाळेचे शिक्षक दत्तात्रय मसुगडे यांनी हॉटेल चवदारचे सुशिल गायकवाड यांचे विशेष आभार मानले. प्रमुख पाहुणे आप्पा ठोंबरे यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना खाऊ वाटप केले. सुशिल गायकवाड यांनी काही महिन्यांपूर्वी याच शाळेतील विद्यार्थ्यांना भारतीय संविधानाच्या उद्देशिका प्रत दिल्या होत्या. या बद्दल विद्यार्थ्यांनी स्वतःहून आठवण करून दिली.विशेष म्हणजे विद्यार्थ्यांना विचारण्यात आलेल्या संविधान विषयक सर्व प्रश्नांची उत्तरे विद्यार्थ्यांनी दिली.

छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंती निमित्त विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करत असताना पुन्हा एकदा संवाद साधण्याची संधी मिळाल्या बद्दल सुशिल गायकवाड यांनी शाळेचे शिक्षकवृंद मनोज चव्हाण आणि दत्तात्रय मसुगडे आदींचे विशेष आभार मानले.छत्रपती शाहू महाराज यांनी त्यांच्या राज्यात अनेकांना व्यवसाय करण्यासाठी आर्थिक मदत केली. विद्यार्थ्यांना शिकण्यासाठी शिष्यवृत्ती दिली. वंचित घटकांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी शाहू महाराज यांनीच आरक्षणाची निर्मिती केली. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी शाहू महाराजांचा हाच आदर्श घेऊन आरक्षणाची अंमलबजावणी संविधानातून केली. शाहू महाराज आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार आणि कार्य हे समजाला पोषक असल्याचे सुशिल गायकवाड यांनी म्हटले. या उपक्रमावेळी विद्यार्थ्यांशी संवाद साधत असताना विद्यार्थी अगदी हुशारीने प्रत्येक प्रश्नाचे उत्तर देण्यासाठी तयार असल्याचे दिसून आले.विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरील समाधान आणि आनंद हेच खरे शिक्षण असल्याचे सुशिल गायकवाड यांना या उपक्रमातून जाणविले. हा उपक्रम शाळेत यशस्वी पणे राबविण्यासाठी शाळेचे शिक्षकवृंद मनोज चव्हाण आणि दत्तात्रय मसुगडे यांचे मोलाचे सहकार्य लाभले. या बद्दल सुशिल गायकवाड यांनी धन्यवाद दिले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक आणि आभार प्रदर्शन शिक्षक दत्तात्रय मसुगडे यांनी मानले.



# शिक्षण नीती बहुजनांचे हक्क डावलणारी

**प्रा. प्रतिमा परदेशी**

आधुनिक केसरी न्यूज



**पुणे :** नव्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामध्ये कमी पटसंख्या असलेल्या महाविद्यालयाचे क्लस्टर तयार करून त्या मोठ्या शिक्षण संस्थाच्या अधिपत्याखाली आणण्याचा प्रयत्न सुरु झाला आहे. पुण्यातील मोठ्या शिक्षण संस्था क्लस्टरच्या नावाखाली छोटी महाविद्यालय गिळंकृत करतील. हाच राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचा प्रमुख गाभा असून एक प्रकारे बहुजनांच्या संघर्षातून उभ्या राहिलेल्या सर्व शिक्षण संस्था मोडीत काढण्याचे यंत्र म्हणजे हे धोरण आहे, असे मत विद्रोही साहित्य संमेलनाच्या संयोजक प्रा. प्रतिमा परदेशी यांनी व्यक्त केले.

राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या १४९ व्या जयंतीच्या निमित्ताने अखिल भारतीय समाजवादी शिक्षण हक्क सभेने डॉ. प्रवीण बनसोड लिखित शिक्षणाची फसवी नीती या पुस्तकाचे प्रकाशन प्रा. प्रतिमा परदेशी आणि डॉ. रजिया पटेल यांचे हस्ते केले त्यावेळी त्या बोलत होत्या. यावेळी अखिल भारतीय समाजवादी शिक्षण हक्क सभेचे अध्यक्ष प्राचार्य रमेश पाटील, कार्याध्यक्ष डॉ. शरद जावडेकर, सुरेखा खरे, वर्षा गुप्ते, प्राचार्य अनिल अडसूळ इत्यादी मान्यवर उपस्थित होते. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामध्ये राजर्षी शाहू महाराजांनी जे शिक्षणासाठी काम केले, त्याचा कुठेही दाखला मिळत नाही. अल्पसंख्याकाचे साक्षरतेचे प्रमाण वाढावे यासाठी शाहू महाराजांनी प्रयत्न केले होते. तसे नव्या धोरणात काहीच होताना दिसत नाही. शाहू महाराज यांनी खेड्यापाड्यात शाळा काढल्या आणि आताचे सरकार २० पटसंखेपेक्षा कमी पटसंख्या असलेल्या शाळा बंद करीत आहे. राजर्षी शाहू महाराजांनी मंदिर, मस्जिद चर्चेस इत्यादी ठिकाणच्या संपत्तीचा वापर शिक्षण, आरोग्य इत्यादीसाठी केला होता. भारतातील एकात्मतेचे उदाहरण देताना शाहू महाराजांनी सम्राट अकबराचा दाखल दिला होता. सध्याचे सरकार अभ्यासातून संशोधकांचा इतिहास काढायला निघाले आहे. त्यांना खरेच शाहू महाराज कळले का, असा प्रश्न पडतो असे डॉ. रजिया पटेल म्हणाल्या. लेखक डॉ. प्रवीण बनसोड यांनी पुस्तकाची भूमिका मांडताना, शिक्षण क्षेत्रापुढील आव्हानांचे वास्तव मांडून शासनाची शिक्षणाकडे बघण्याची फसवी नीती असून यात प्रामुख्याने या देशातील सामान्य बहुजन वर्ग भरडला जात आहे, असे सांगून राजर्षी शाहू महाराज यांनी संस्थानाच्या उत्पनाच्या ६ टक्के निधी शिक्षणावर खर्च करण्याचा आदेश काढला होता. भारतात गेल्या ७५ वर्षांत भारत सरकारचा व राज्य केंद्र सरकारचा शिक्षण खर्च राष्ट्रीय उत्पनाच्या ३ ते ३.५ टक्क्याच्या वर गेला नाही. शिक्षणाची आव्हाने पेलताना शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाबरोबर शिक्षणाचे राष्ट्रीयीकरण करण्याची गरज आहे. असे ते म्हणाले. शिक्षण हक्काची चळवळ ही सामाजिक आणि राजकीय चळवळ आहे असे कोणीही मानत नाही आणि म्हणूनच आज दुर्दैवाने कोणत्याही राजकीय अजेंड्यावर शिक्षण हा विषय दिसत नाही. शिक्षणाला एक बाजारू स्वरूप आले आहे आणि त्यामुळे विद्यार्थी आणि पालक हतबल झालेला दिसतो असे मत त्यांनी मांडले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुरेखा खरे यांनी केले तर आभार वर्षा गुप्ते यांनी मानले.




# वह्या वाटप करुन भाकपने साजरी केली लोकराजा छत्रपती शाहू महाराज जयंती

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजी महाराजनगर :** 14 एप्रिल 023 रोजी भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंतीच्या पैठणगेट येथील भाकपच्या स्टेजवर लोकांनी दान केलेल्या आणि त्यानंतरही व्यक्तीशः कार्यालयात आणुन दिलेल्या 88 डझन वह्यांचे वाटप प्रत्येकी एक डझन या प्रमाणे 88 वंचित व गरजु विद्यार्थ्यांना सिल्लेखाना येथील गांधी भवन मध्ये लोकराजा शाहु महाराजांच्या 149 व्या जयंती निमित्त करण्यात आले.

याबाबत असे की, यावेळची भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंती वंचित व गरजु विद्यार्थ्यांसाठी भाकपच्या पैठणगेट येथील स्टेजवर वह्या दान करा, असे आवाहन भारतीय कम्युनिस्ट पक्षातर्फे करण्यात आले होते. त्यास प्रतिसाद मिळाला होता. त्याठीकाणी व त्यानंतरही कार्यालयात जमा झालेले 88 डझन वह्या 88 वंचित व गरजु मुला मुलींना प्रत्येकी एक डझन या प्रमाणे लोकराजा शाहु महाराजांच्या 149 व्या जयंति निमित्त गांधी भवन, सिल्लेखाना, औरंगाबाद येथे बी एस एन एल एम्लॉइज युनियनचे नेते कॉ रंजन दाणी, अंधश्रद्धा निर्मुलन समितीच्या डॉ रश्मी बोरीकर व गांधी भवनचे डॉ मच्छिद्र गोराडे यांच्या हस्ते वाटप करण्यात आले. यावेळी इंडीयन पिपल्स थिएटर असोसिएशन (इप्टा) चे डॉ समाधान इंगळे व कॉ अमरजित बाहेती व सहकार्यांनी वामनदादा कर्डक यांचे वंदन माणसाला, शाहीर सचिन माळी यांचे साऊ पेटती मशाल, ज्योती म्हापसेकर यांचे शिक्षणाची गाडी चालली आणि करू पहिलं नमन जोतिबाला, शाहीर द. ना. गवाणकर यांचे धरतीची आम्ही लेकरं, कवी चारुल विनय यांचे मंदिर मस्जिद गिरीजाघर में, शाहीर संभाजी भगत यांचे शिकणाऱ्या भावा रं, समाधान इंगळे यांचे शाहू राजा राजऋषी, गीत गा रहे है आज हम इ गाण्यांनी कार्यक्रमाची सुरुवात झाली. कार्यक्रमाचे प्रास्ताविकात भाकपचे शहर सचिव ॲड अभय टाकसाळ यांनी शालेय साहीत्याच्या महागाई व शिक्षणाच्या बाजारीकरणाबद्दल चिंता व्यक्त केली व खोकडपुरा मनपा शाळा तसेच गांधीनगर येथील मनपा शाळा पुर्ववत सुरु करुन त्या सीबीएसई पॅटर्न करण्याची मागणी लावुन धरण्याचेही आवाहन उपस्थित पालकांना केले, विद्यार्थ्यांनी शाहु महाराज व डॉ बाबासाहेब आंबेडकरांचा आदर्श डोळ्यासमोर ठेऊन अभ्यास करावा, त्यासाठी आणखी वह्या जमा करुत असेही म्हणाले.

# सुलतानपूर शाळेत भरला संतांचा मेळा

आधुनिक केसरी न्यूज

**सुलतानपूर :** आषाढी एकादशीचे महत्त्व शाळांमधील चिमुकल्यांनाही समजावे, या उद्देशाने केंद्रीय शाळा सुलतानपूर शाळांमध्ये आषाढी एकादशी साजरी करण्यात आली. वृक्षदिंडी, रिंगण असे अनेक उपक्रम यावेळी राबविण्यात आले. चिमुकल्यांनी विठुनामाचा जयघोष करीत त्यात उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. शाळेच्या पटांगणात ज्ञानोबा-माऊलींच्या गजरात विलोभनीय दिंडी सोहळा साजरा करण्यात आला. शाळेतील सर्व विद्यार्थी या सोहळ्यात सहभागी झाले होते. मुलांनी फेर धरून, फुगड्या खेळून आनंद व्यक्त केला. विद्यार्थी पताका हाती घेऊन सामील झाले होते, तर विद्यार्थिनींनी डोक्यावर तुळशी वृंदावन घेऊन सहभागी झाल्या होत्या, या सोहळ्यात पालक वर्गासहित शाळेतील मुख्याध्यापक सुरेश राहणे, संजय बुचुडे, मिलिंद गिरधारी, सविता राऊत, वैशाली कंकाळ, रेखा खरात, कविता चव्हाण, वर्षा चव्हाण, सविता वेताळ उपस्थित होते.



हिवराळे क्लिनिक ॲण्ड हर्बल हेल्थ केअर
9130174444
डॉ. के.बी. हिवराळे
आयुर्वेद जनरल फिजिशियन, ॲक्युपंक्चर तज्ज्ञ
B.A.M.S., N.D.,C.M.S.& Ed(MUMBAI)
R.No.2366/12/2000
एमसीए/2022/10/बी/000839 बॉम्बे नर्सिंग होम परवाना क्र.218, औरंगाबाद
उपलब्ध सुविधा
• जुनाट सांधे दुखी (गुडघे दुखी) • त्वचा व गुप्त रोग • वजन वाढविणे
• आम वात उदर रोग • स्त्रीयांचे आजार • वजन कमी करणे
• दमा व ॲलर्जी (जुनाट) • स्थूलपणा, मूळव्याध • केसांच्या सर्व तक्रारी
• चिकन गुनिया • वंध्यत्व, संतती प्राप्ती • लहान मुलांची
• मनोकयीईक आजार • कॅन्सर सल्ला, मुतखडा • स्मरणशक्ती वाढविणे
पंचकर्म सुविधा (मुख्यकार्य) 1) वमन, 2) विरेचन, 3) बस्ती, 4) नस्य, 5) रक्तमोक्षन
अजिंठा रोड, सारा कॉलनी, फुलंब्री, ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद

# अनधिकृत वाराई, तोलाई व हमाली विरोधात प्रहारचे आंदोलन

आधुनिक केसरी न्यूज

**निफाड :** नाशिक जिल्ह्यातील विविध बाजार समित्यांकडून कांदा व इतर भुसार शेतमालासाठी अनधिकृतपणे वाराई, हमाली व तोलाई ही वसुल केली जात आहे. या अनधिकृत वसुलीच्या विरोधात प्रहार जनशक्ती पक्षाने आंदोलन उभे केले असल्याची माहिती प्रहार जनशक्तीचे उत्तर महाराष्ट्र संपर्कप्रमुख दत्तु बोडके यांनी दिली. या अनुषंगाने प्रहार संघटना जिल्ह्यातील सर्वच बाजार समित्यांना निवेदन देऊन शेतकऱ्यांकडून बेकायदेशीर वाराई, हमाली व तोलाई वसुल करू नये अशी मागणी करणार आहे. बाजार समित्यांमध्ये बहुतांशी कांदा उत्पादक शेतकरी हॅड्रोलीक ट्रॉलीमध्ये मोकळ्या स्वरुपात कांदा विक्रीसाठी आणतात. या ट्रॉलीतुन आपोआप कांदा खाली होतो त्यामुळे हमालांचे काहीच काम पडत नाही. शेतकरी हमाल बांधवांची मदत न घेता सर्व काही कामे स्वतः करुन घेत असल्याने काम नाही तर दाम नाही या नियमानुसार कांदा ऊत्पादक शेतकऱ्यांचे हिशोबपट्टीतुन हमालीची रक्कम आकारणी बंद करणे गरजेचे आहे. बहुतांशी कृ.ऊ.बा.समितीच्या मालकीचे वजनकाटे हे बंद अवस्थेत असल्याने कांदा ऊत्पादक शेतकरी लिलावानतंर स्वखर्चाने खाजगी वजनकाट्यावर वजन करतो तरीही शेतकऱ्यांच्या हिशोबपट्टीतून तोलाईची रक्कम कापली जाते. त्यामुळे ज्या कृ.ऊ.बा. समितीकडून शेतकऱ्यांचे शेतमाल वाहनांचे वजन केले जात नाही त्या शेतकऱ्यांच्या हिशोबपट्टीतुन तोलाईची रक्कम आकारणी त्वरीत बंद करावी तसेच करोडो रूपये उत्पन्न असलेल्या कृ.उ.बा. समित्यांनी बंद वजन काटे तात्काळ सुरु करावे. लिलावाचेवेळी वाहनांच्या फाळक्यातुन खाली पडलेला कांदा भराईसाठी एकतर वेगळे पैसे द्यावे लागतात किंवा स्वतःला कांदे भरून घ्यावे लागतात.

या सर्व मागण्यांची कृषी उत्पन्न बाजार समित्यांनी तातडीने दखल घेऊन बेकायदेशीर हमाली, तोलाई, वाराई ची रक्कम आकारणी बंद करुन शेतकऱ्यांना न्याय द्यावा अशी मागणी प्रहार जनशक्ती पक्षाच्या वतीने करण्यात आली आहे.

> जिल्ह्यातील बऱ्याच बाजार समित्यांच्या निवडणूका नुकत्याच झाल्या असून नवनिर्वाचित संचालक मंडळाने शेतकरी विरोधी व अन्यायकारक वसुली बंद करावी व निवडणूकीत आश्वासन दिल्याप्रमाणे संचालक मंडळाने शेतकऱ्यांच्या पाठीशी उभे राहून बळीराजाला दिलासा द्यावा.
>
> **दत्तु बोडके, उत्तर महाराष्ट्र संपर्क प्रमुख, प्रहार**

महिला व पुरूषांमध्ये निर्माण होणाऱ्या समस्या
स्त्रीयांना होणाऱ्या समस्या
✲ मासिक पाळी अनियमित असणे
✲ हॉमॉन्स चे असंतुलन
✲ मासिक पाळी अंगावरुन कमी किंवा जास्त जाणे
✲ PCOD बीज तयार न होणे किंवा न फुटणे
✲ मासिक पाळी बंद होणे
✲ वारंवार गर्भपात होणे
✲ श्वेत प्रदर (पांढरे जाणे)
पुरूषांना होणाऱ्या समस्या
✲ शुक्राणु कमी असणे
✲ शुक्राणुची गती कमी असणे
✲ शुक्राणु स्खलन
✲ स्वप्न दोष
✲ सेक्स इच्छा कमी होणे इ.
फीस - 300 रू.
संपर्क - डॉ मनोज जोशी 9822341176 (25 वर्षांचा अनुभव)
ऑनलाईन कन्सल्टींग उपलब्ध
पत्ता : आयुर्वेदीक दवाखाना
सुपारी हनुमान रोड, छत्रपती संभाजीनगर.

# आष्टी शहरात घाणीचे साम्राज्य

## आरोग्य धोक्यात : ग्रा.पं.ला नालेसफाई करण्याचा पडला विसर

आधुनिक केसरी न्यूज

**परतूर :** आष्टी शहरातील नालेसफाई होत नसल्याने पावसाळ्यात पुन्हा मलेरिया सह जलजन्य आजारांची भिती नागरिकांत निर्माण झाली आहे. तर आषाढी एकादशी व ईद च्या पार्श्वभूमीवर आष्टी येथील ग्रामपंचायतला नालेसफाई करण्याचा विसर पडलेला दिसतो.गावातील अनेक भागात पावसाचे पाणी साचून घाणीचे साम्राज्य पसरले आहे. ग्रामपंचायतच्या कामकाजावर नागरिकांतून संताप व्यक्त करण्यात येत आहे. याकडे लक्ष देऊन स्वच्छता मोहीम राबवावी अशी मागणी होत आहे. मागील काही महिन्यांपूर्वी गावात घाणीचे साम्राज्य वाढल्याने डासांचा प्रादुर्भाव वाढला होता. त्यामुळे गावात डेंग्यूसदृश तापाचे रुग्ण वाढले होते. काहीनी इतर जिल्ह्यांच्या ठिकाणी तपासणी केली असता त्यांना डेंग्यूसदृश आजारांची लागण झाल्याचे निष्पन्न झाले होते. यात एका रुग्णांचा मृत्यू झाल्याची घटना घडली होती. या घटनेची जखम ताजी असतानाही आष्टी येथील ग्रामपंचायत मात्र पुन्हा नालेसफाई कडे दुर्लक्ष करत असल्याने नागरिकांतून ग्रामपंचायतीच्या कामकाजावर संताप व्यक्त केला जात आहे. शहरातील आई तुळजा भवानी मंदिराकडे जाण्याच्या मार्गावर घाणीचे साम्राज्य होऊन नाल्याचे साडपाणी रोडवरून वाहत आहे आई तुळजा भवानी मंदिराकडे देवीच्या दर्शनाला जानार्या भाविकांना त्रास होत असल्याचे दीसुन होत आहे तर बागवान गल्ली, महावीर चौक, आझाद चौक आदी रस्त्यावर सफाई अभा घाणीचे साम्राज्य पसरले आह यामुळे या भागात पुन्हा डेंग्यूचा प्रादुर्भाव वाढू नये यासाठी ग्रामपंचायतीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी नागरिकांतून करण्यात येत आहे.



# अमली पदार्थ विरोधात पोलिसांकडून जनजागृती

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील सावळदबारा येथील जय कालिंका देवी शिक्षण संस्था संचलित शिवाजी विद्यालय व उच्च माध्यमिक कै.लक्ष्मणराव भिमराव कोलते पाटील विद्यालय येथे जागतिक अमली पदार्थ विरोधी दिनानिमित्त फर्दापूर पोलीस ठाण्याच्यावतीने सोमवारी दि.२६/६/२३ रोजी गावातून जनजागृती रॅली काढण्यात आली. तसेच आरक्षणाचे जनक छत्रपती शाहू महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन सचिव रत्नाताई पंजाबराव कोलते पाटील यांच्या हस्ते पुष्पगुच्छ अर्पण करून अभिवादन करण्यात आले.आणि पुढील कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.शिवाजी महाविद्यालयात 'मानवी शरीरावर होणारे दुष्परिणाम' विषयावर प्राचार्य पंजाबराव कोलते पाटील यांनी व्याख्यान व निंबध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. सिल्लोड उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. दिनेशकुमार कोल्हे, सपोनि भरत मोरे फर्दापूर यांच्या मार्गदर्शनाखाली येथील शिवाजी विद्यालय व उच्च माध्यमिक महाविद्यालयातून गावात जनजागृती रॅली काढण्यात आली. यावेळी अंमली पदार्थ सेवनाने मानवी शरीरावर होणारे दुष्परिणामवर सखोल अशे मार्गदर्शन प्रा.जीवन कोलते पाटील सामाजिक कार्यकर्ते यांनी केले.शिक्षकवृंद यांनी विद्यार्थ्यांकडून अंमली पदार्थ सेवनाने मानवी शरीरावर होणारे दुष्परिणाम व्याख्यान व निबंध स्पर्धा घेण्यात आली.याप्रसंगी शिवाजी विद्यालयाचे अध्यक्ष भाऊराव कोलते पाटील, विकास पाटील, विजयसिंह राजपूत, भास्कर खमाट, पोपटराव सोनवणे, भूषण देसले,सुदाम राठोड, मुकुंदा व्यवहारे, अजाबराव राजपूत,शाम जाधव,प्रा.पंजाबराव शेळके,प्रा.मदन डोखळे,प्रा.गजानन चव्हाण आदींसह शिक्षकवृंद, पत्रकार बंन्धू व विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी होऊन उपस्थित झाले होते.



# जि.प. शाळेत अवतरली सूर्यमाला

## बबलू कराळे यांचा नावीन्यपूर्ण नवोपक्रम

आधुनिक केसरी न्यूज

**अमरावती :** जिल्हा परिषद उच्च प्रा. शाळा मल्हारा पंचायत समिती अचलपूर येथील उपक्रमशील शिक्षक बबलू कराळे यांनी विद्यार्थी यांना सूर्यमालेचे प्रत्यक्ष माहिती व्हावी याकरिता तंत्रज्ञानाच्या साह्याने प्रत्यक्ष वर्गामध्ये सूर्यमाला अवतरली, अणाकलनीय गोष्टी आज तंत्र समजणे खूप सोपे झाले आहे. रोजच प्रत्येक शाळेत विविध तंत्रज्ञानाचे प्रयोग केले जातात त्यामुळे विद्यार्थ्यांना प्रत्येक घटक जवळून पाहण्याची संधी उपलब्ध झाली आहे त्यामध्ये जंगलातील प्राणी प्रत्यक्ष वर्गात दाखविणे, सूर्यमाला दाखविणे नोटावर प्राणी जिवंत करणे असे नानाविध प्रयोग आहेत. या तंत्रज्ञानाच्या प्रयोगाने अनेक शाळेला जणू वेडच लावले आहे ते म्हणजे सूर्यमाला. सूर्यमाला प्रत्यक्ष वर्गात दाखविणे आयएसओ जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा मल्हारा. पंचायत समिती अचलपूर येथे राज्यतंत्रनेही शिक्षक बबलू कराळे यांनी हा प्रयोग यशस्वीपणे केला. विद्यार्थी यांना सूर्यमाला हा घटक उत्तम रित्या समजला.

# फार्मर कप खरीप लागवड कृषिजागर दिंडी सोहळा

आधुनिक केसरी न्यूज

**माडग्याळ :** येथे आज समता शेतकरी गटाच्या वतीने खरीप हंगाम पूर्वतयारी दिंडी सोहळा आयोजित करण्यात आला. यामध्ये गटशेती चळवळ, फार्मर कप याबद्दल लोकांना माहिती व्हावी, जनजागृती व्हावी हा गटाचा उद्देश होता. अतिशय उत्साहाच्या वातावरणात गटातील महिला भगिणी -पुरुष तसेच शाळेतील विद्यार्थी यांनी सहभाग घेऊन गावात एक उत्साहपूर्ण वातावरण तयार केले.

माडग्याळ गावात प्रथमच समता महिला तुर उत्पादक गटाच्या अध्यक्षा सौ अनिता माळी यांनी गट शेतीसाठी ट्रॅक्टर घेतला तर गत वर्षी बाजरी गटातून राज्यस्तरीय स्पर्धेत पारितोषिक पटकावलेल्या बक्षीस रकमेतून सहभागी शेतकऱ्यांनी बीबीएफ पेरणी यंत्र घेऊन दिले. ट्रॅक्टर व BBF यंत्राचे पूजन तालुका कृषी अधिकारी मा. श्री. वेताळ साहेब यांच्या हस्ते करण्यात आले त्यानंतर तालुका कृषी अधिकारी वेताळ साहेब यांनी गटातील शेतकऱ्यांना कमी क्षेत्रात व कमी पाण्यात जास्त कसे उत्पन्न घेता येईल याबाबत मार्गदर्शन केले. यावेळी त्यांनी शेतकऱ्यांनी आधुनिक शेतीबरोबरच सेंद्रीय शेती, व बाजारपेठेत मागणी व चांगले दर मिळणाऱ्या पिकांचे उत्पन्न घेण्याचे व महिलांनी देखिल शेती कडे वळून आपले कौटूंबीक आर्थिक स्थिती सुधारण्याचा सल्ला दिला. माडग्याळचे कृषी सहाय्यक मा. श्री. लहू कांबळे यांनी शेतकऱ्यांना शासनाच्या शेतीविषयक विविध योजनांची माहिती दिली. तसेच गेल्या वर्षी समता शेती गटातून शेती करणाऱ्या व चांगले उत्पन्न मिळवून राज्यस्तरीय व विभागीय स्पर्धेत क्रंमाक पटकावणाऱ्या शेतकऱ्यांचे कौतूक केले. तसेच शेतकऱ्यांनी आधुनिक शेती बरोबरच सेंद्रीय शेती करण्याचा सल्ला दिला.

यावेळी माडग्याळचे लोकनियुक्त सरपंच सौ. अनिताताई माळी, उपसरपंच सौ. सविता सावंत समता शेतकरी गटाचे प्रमुख श्री. महादेव माळी, पाणी फाऊंडेशनचे प्रतिनीधी अवधूत गुरव, कृषी उत्पन्न बाझार समितीचे माजी तज्ञ संचालक विठ्ठल निकम, लिंबाजी माळी, तुकाराम कोरे श्रावणकुमार कोरे सर, अंबू कांबळे, ग्रा. प. सदस्य बाळासाहेब सावंत, निर्मला कोरे, जेटलिन कोरे बळवंत जाधव, गटातील शेतकरी व विविध बियाणे कंपनीचे प्रतिनीधी व इतर मान्यवर उपस्थित होते.



गुप्तरोगाबाबत
काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट

महावीर
घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118
राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118

www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर